# माणूस


१ डिसेंबर १९६५ ● ३०पैसे



☐ शिलंगणाचं सोनं – ब. मो. पुरंदरे यांच्या कथेचा उत्तरार्ध

☐ स्वरश्री लता मंगेशकर – एक मुलाखत

# येथेही गर्दी यांचीच आधी !






वर्ष पाचवे : अंक तेरावा : १ डिसेंबर १९६५
किंमत तीस पैसे : वार्षिक वर्गणी आठ रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.

---

## वेगळे स्वरूप

दिवाळी अंकाची पुरवणी हे या अंकाचे स्वरूप.

त्यामुळें विविधता कमी. नेहमीच्या सदरांना काट.

श्री. पुरंदरे यांची ऐतिहासिक दीर्घकथा या अंकात पूर्ण केल्याने 'नाझी भस्मासुर' या लेखमालेचा पुढचा हप्ता देता आला नाही. या लेखमालेचे अद्याप तीन ते चार लेखांक बाकी आहेत. पुढील अंकापासून (१५ डिसेंबर) हे लेखांक नेहमीप्रमाणे ओळीने प्रसिद्ध होतीलच.

**—संपादक**

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.
ललित साहित्यांतील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.




# पुण्यातील एक ' सवाई ' कार्यक्रम

## कुंदगोळकर पुण्यतिथी

### कै. सवाई गंधर्व – १३ वा स्मृतिदिन

: समीक्षक :

प्रकाश साठे



**एम्.** इ. एम्. मुलींच्या शाळेचे आवार. भव्य सुशोभित मंडप नुसता फुलून गेला आहे. दिव्यांच्या झगझगाटात सर्व काही खुलून दिसते आहे. मांडव माणसांनी गच्च भरून उतू जातो आहे. दर्दी जाणकारांपासून तो नुसती आवड असणारांपर्यंत तऱ्हेतऱ्हेची माणसं आणि निम्मा स्त्रीसमुदाय. कुठे अत्तराचे फाये कानांतनं बाहेर निघतात. सुवास वाटला जातो. पुन्हा गप्पा सुरू. सगळीकडे हालचाल, गडबड आणि उत्साह दिसतो आहे.

सर्वांच्या नजरा व्यासपीठाकडे लागलेल्या आहेत. चांगले लांबरुंद व्यासपीठ. मागच्या पडद्यावर खाँसाहेब मरहूम अब्दुलकरीम खाँ आणि कै. सवाई गंधर्वांचे फोटो. घमघमीत हार. धावपळ सुरू आहेच.

दि. ४–११–६५–ठीक नऊ वाजता स्पष्ट शब्दांत घोषणा होते (मराठीतून !–छान !)– माना उंचावल्या जातात (–आणि त्या तशाच तीन दिवस उंचावलेल्या राहतात.) आणि सुंद्रीवादनाने कार्यक्रमास सुरवात होते. शामराव लोणकर सुंद्री वाजवतात आणि जातात ! (कारण कुणाचंच तिकडं लक्ष नसतं !) सौ. लीला जळगावकरांचं तेच होतं !

कार्यक्रमास खरी सुरवात होते ती मधुकर गोळवलकरांच्या तार–शहनाईवरच्या ठुमरीने ! मजा येते. चंद्रकांत कामत साथही छान करतात. नंतर गातात मीरा खिरवाडकर. दिल्लीच्या पाहुण्या पहिल्यांदा मारू बिहाग व नंतर खमाज ठुमरी गातात. म्हणण्याची पद्धत खास करून लक्षात राहते. वाघ मागे लागल्यासारख्या घाईत दिसल्या.

–मग येतात हिराबाई ! आपल्या नेहमीच्या संथ पद्धतीने त्या जयजयवंती आळवतात. विशेष रंगत चढत नाही. आवाजही चांगलासा लागत नाही. स्वयंवरातल्या " रूपबली का–" पदानंतर त्यांचे गायन संपते.

**थरकत जियरा**

हिराबाई सेवा रुजू करून गेल्यावर नंतर घोषणा होते–" आता मुंबईच्या कलाकार सौ. निर्मला अरुण यांचे गायन होईल. तबला-साथ पं. सामताप्रसाद. " उत्कंठा

सळसळत जाते. मग निर्मला अरुण येतात. वेगळ्या पद्धतीचं नेसणं, चेहऱ्यावरचा भाव प्रसन्न. त्या गायला सुरवात करतात आणि पहिल्याच क्षणापासून श्रोत्यांची मनं काबीज करून त्यांना जमिनीवरून उचलून नेतात. पहिल्यांदा त्यांनी वसंत राग ऐकवला. अतिशय आत्मविश्वास आणि कौशल्य क्षणाक्षणाला दिसतं. भलताच गोड आणि कसदार आवाज! नखरेल आणि लयबद्ध हातवारे गायनाला शोभा आणतात. 'विलंबित' मध्येच वाहवा मिळवून द्रुतलयीत त्या तराणा गातात. त्यात काही कमी? छे:! वरचा सूर असा लागतो, की मन थरकून जातं. वरच्या पट्टीत नी पर्यंत जातात! [आदल्याच दिवशीचा 'महाराष्ट्र टाईम्स'मधला रिपोर्ट मला आठवतो-"त्यांचा आवाज म्हणजे वेलची घातलेली मिठाई-केशर भरपूर."] तानांची भेंडोळी सरसर सरसर निघतात. विलक्षण सहजता हा आणखी एक विशेष. ख्यालाला भरपूर टाळ्या घेतल्यानंतर त्यांच्या खऱ्या गायनाला सुरवात होते ती ठुमरीने! त्यांच्या ठुमरीचे वर्णन करणे केवळ शब्दातीत! दर क्षणाला दाद घेत त्या ठुमरी संपवतात. मग पेटी पुढे ओढतात आणि सुरू करतात-

"हाये, निन्दिया न आयी सारी रैन,
सैंय्या, तेरे बिन पाऊँ कैसे चैन."

उलट अर्थ, सर्वोत्किट गायन, यामुळे रसिकांची मनं फुलून येतात.

"तूने तो सजना मेरी कदर ना जानीं
मैंहू दीवानी सैंय्या फिरभी तुम्हारी
राहतके दोनों नैन"

त्या आळवतात आणि पहिलं गीत संपून दुसरं कधी सुरू होतं ते कळत नाही.

"हंगामे गमसे तंग आकर,
इजहारे मुसर्रत कर बैठे
मशहूर थी अपनी जिन्दादिली
दानिस्ता शरारता कर बैठे!"

साथीबद्दल प्रश्नच नसतो. गीत रंगतरंगत जाते.

"वीरानीये दिल जब हृदसे बढे, घबराके मुहब्बत कर बैठे"

शेवटी होतो नटराज गोपीकृष्णांच्या नृत्याचा कार्यक्रम! लोकांना फार उत्कंठा लागलेली असते, पण प्रत्यक्षात नृत्यातलं काही कळत नाही. परिणामी २॥ तासांतला शेवटचा अर्धा तास चित्तथरारक वाटतो. मुद्राभिनय चांगला-(राधेचे लाजणे.) पं. सामताप्रसाद आणि नटराज-दोघेही जिद्दीला पेटतात. या वीस मिनिटांत कितीवेळा टाळ्यांचा कडकडाट होतो, ते मोजता येणं कठीण असतं. दोघांचंही सारखंच कौतुक होतं.

बघता बघता गोपीकृष्ण नमस्कार करतात आणि पहाटे ५। वा. पहिल्या दिवसाचा कार्यक्रम संपतो. आज सगळयांच्या मनात घोळत असतात निर्मला अरुण यांचे आर्त सूर !

## थेट अमीरखाँ

दि. ५–११–६५–कालच्या मैफिलीचा रंग अजून उतरलेला नाही. सूर मनात घोळताहेत. वातावरण रंगातच असते. देवळणकर बंधू सनईवर राग मारुबिहाग वाजवत आहेत. नंतर दत्तोपंत देशपांडे राग बिहाग व 'स्वकुलतारकसुता' गातात.

बरोबर १०॥ वाजता चंद्रकांत कपिलेश्वरी येतात. बाळकृष्णबुवांचे चिरंजीव म्हणून अपेक्षा उंचावलेल्या. समोर येतो अगदी तरुण मनुष्य !–आणि तुम्हाला सांगतो, हा मनुष्य पुढे फार गाजणार ! पुढच्या पिढीला ज्या काही थोडया फार आशा आहेत, त्यांत यांचा नंबर फार वरचा ठेवा. काय आवाज आहे ! कमावलेला, गोड आणि दळदार–थेट अमीरखाँसारखा. ताना–आवाज आत ओढून घेतोय त्या भीमसेनसारख्या. सुरेख हरकती आणि सूर पण असा लागतोय्–वा: ! चाळीस मिनिटांचा चंद्रकंस संपल्यावर टाळयांचा कडकडाट होतो.

सौ. नालिनी मुळगावकरांची स्टाईल हिराबाईसारखी. 'नटचंद्रा' पेक्षा 'भैरवी-ठुमरी' चांगली होते–"प्यारबीन लागे न मोरी आँखियाँ."

मग येतात सौ. सरस्वती राणे ! आपल्या नेहमीच्या गोड आवाजात त्या 'बसंतबहार' ऐकवत आहेत. शेख दाऊदखाँची वजनदार साथ चांगलीच रंगत आणते. नंतर प्रथमच भावगीताचे स्वर कानांवर पडतात–आल्हाद वाटतो–"जा घेऊनि संदेश पाखरा"–१५ मिनिटं कशी जातात कळत नाही.

मग आतून तबला-डग्गा येतो आणि बाजूला बसण्याऐवजी मध्ये बसतो–त्याच्या मागे दिसतात ते जेरी मॅसी ! सामताप्रसादचा हा शिष्य तबल्याचा प्रोफेसर आहे म्हटल्यावर माणसं सावरून बसली. तो पेश करणार असतो "त्रिताल–बनारसी बाज़." नंतरची ४५ मि. सर्वांचं लक्ष समोर आणि मंडपात शांतता असते. विलक्षण सहजतेने तबल्याशी खेळल्यासारखं वाटतं. खरा कलाकार आहे. चेहऱ्यावर भाव कलंदराचा. आज ज्यांनी तबला ऐकला, त्यांनी खरा तबला ऐकला.

आता चार भारी कलाकार उरतात–सिप्रा बोस, पं. बलराम पाठक, पं. जसराज, आणि गिरिजादेवी.

सिप्रा (क्षिप्रा) बोस कलकत्त्याच्या ! तरुणच आहेत. निर्मला अरुणइतका आवाज गोड आणि बारीक नसला तरी तयारी कमी नाही. कसदार आवाज–वैशिष्टय–बारीक. अवघड जागा. श्रोत्यांना थक्क करतात. आवाजात विलक्षण फिरत आहे. मग ठुमरी–"जियरा चुराये लिया जाय सखीरी." मग खालच्या सुरात एक गीत. कौतुक मिळवून त्या गेल्या.

तीन वाजून पस्तीस मिनिटांनी पं. बलराम पाठकांचं सतारवादन (रागरागेश)

सुरू झालं. पुरी ३५ मिनिटं आलापी झाली. ती संपल्यावर पं. सामताप्रसादांनी बाह्या वर सारल्या आणि नंतर काय झालं ते समजलंच नाही. सतारीला गोडवा कमी, पण सगळी करामत समेत होती. सतारवादन झालं नाही–जुगलबंदीच झाली, पण आनंद वाटला. नंतर चांगल्यापैकी ठुमरी होतीच.

पाच वाजता पं. जसराज गायला बसले. बहुतेकांना यांचं गाणं माहीतच आहे. राग नटभैरव सुरेख गायला. अत्यंत शांत, संथ पण तितकंच प्रभावी असं त्याचं वर्णन करता येईल. आवाज भरदार, मांडणी जोशपूर्ण. पलटे थोडेच पण लालित्यपूर्ण.

नंतर शेवटचा कार्यक्रम ! सकाळचे सहा ! श्रोत्यांचे चेहरे दमलेले असले तरी मने तृप्त आहेत. भीमसेन स्वतः तंबोरा जुळवतात आणि गिरजादेवी गायला सुरवात करतात. बिलासखानी तोडी. सहजसुंदर गाणं. नंतर गांधारी बहार आणि शेवटी "बाबुलमोरा." ठुमरी रंगते–पं. सामताप्रसाद रंगतात. पाच मिनिटं मागून येऊन तबला वाजवतात. बघताबघता ७॥ वाजतात आणि गाणं थांबवावं लागतं.

## कण....

* खुर्च्यांवरचे लोक अजीबात दाद देत नाहीत. तसं जनता–वर्गातील लोकांचे नव्हते. दिलखुलास दाद. काय असेल ते असो, पण खुर्चीवरचे लोक परके वाटतात ! लाकडावरची लाकडी माणसे.
* दुसऱ्या दिवशी गिरिजादेवी भैरवी गात असताना हशा उसळला. लोक मागे पाहतात तो शाळेच्या मुलींची फाईल लागलेली. गिरिजादेवींना वाटलं–गायचं की नाही, पण भीमसेन म्हणाले, "मुलींना तरी 'बाबुल मोरा' कधी ऐकायला मिळायचं ? म्हणून आणखी दहा मिनिटं गायला हरकत नाही."
* तिसऱ्या दिवशी मी ७॥ वाजता मंडपात गेलो तर तिथे काही महाचतुर लोक सातलाच खांब अडवून बसल्याचे पाहून गार झालो.
* भीमसेन, सिप्रा बोस व प्रेक्षकांतील उत्स्फूर्त स्वयंसेवक यांनी झोळ्या फिरवल्या. रु. १५०१ जमा झाले–राष्ट्रीय संरक्षण निधीकरता.
* सौ. गंगूबाई हनगलांच्या तंबोरा-साथीला असलेल्या मागच्या मुलीकडेही सगळ्यांचे लक्ष गेले. तिची आवाजी गंगूबाई हनगलनाही कौतुकास्पद वाटत होती. सर्वांच्या आवडत्या गायिका सौ. माणिक वर्मांची मुलगी कु. भारती वर्मा.
* पर्विन सुलताना गाऊन गेल्या असे महाराष्ट्र टाईम्समध्ये वाचले. मला त्या गाताना दिसल्या नाहीत. वेष पालटून आल्या असल्या तरी ओळखल्या असत्या.

## भीमसेनचा भास

दि. ६-११-६५–" बावुलमोरा " संपून अवघे बाराच तास झाले आहेत. आजचा तिसरा-शेवटचा-बहारदार कार्यक्रम आहे. आजचे मुख्य मानकरी आहेत, रामकृष्ण पटवर्धन, सौ. गंगूबाई हनगल, वसंत रानडे, वंदना सेन, संगमेश्वर गुरव, वसंतराव देशपांडे आणि शेवटी स्वत: पं. भीमसेन जोशी.

खळदकरांचं सनईवादन आणि सौ. वत्सलाबाई जोशींचं गायन उरकलं आणि–

१०॥ ला रामकृष्ण पटवर्धन गायला आले आहेत. पहिलाच सूर झकास लागतो. संपूर्ण घाटणी भीमसेनची. ताना तर अगदी तशाच. राग दरबारी. साथ चंद्रकांत कामत. " झनझनकवा " द्रुत सुरू होते आणि भीमसेनचाच भास होतो. सर्वजण खूष.

मग आजचा मोठा मानकरी येतो–सौ. गंगूबाई हनगल. राग कलावती. यांच्या गायनाबद्दल मी पामरे काय लिहावे ? पुरी ५५ मिनिटं ! खरी रंगत म्हणजे काय ते आज कळलं. दाऊदखाँ तर कमालच करत होते. अत्यंत वजनदार, कौशल्यपूर्ण तबला. खरी साथ अशी असावी. नंतर १५ मिनिटे अडाणा. धन्य जाहले सकल जन.

हे आले वसंत रानडे. व्हायोलिन, राग झिंजोटी, साथीला पं. सामताप्रसाद. त्यांनी व्हायोलिनच वाजवलं. जुगलबंदी नाही केली. विजेवर चालणारा बोदेखील इतक्या जलद नाही चालायचा. सुरवात निराशाजनक झाली, पण ठुमरीच्या वेळी हत्यार मुलायम झाले. फार महत्त्वाची गोष्ट म्हणजे सामता प्रसादना त्यांनी चकवलं. एकदा नाही दोनदा.

वंदना सेनचा नृत्याचा कार्यक्रम कोणीच मनावर घेतला नाही. कारण तो चुकीच्या ठिकाणी ठेवला होता. त्यांची कला कमी नव्हती; परंतु नीट दिसण्यासाठी प्रेक्षकांचा खर्ज लागला होता.

आवर्जून उल्लेख करायला हवा तो संगमेश्वर गुरव यांच्या गायनाचा. मंद झुळकीसारखं यांचं गाणं, नाजुक पीस गालावरून फिरवावं तसं. मनाला स्पर्शून गेलं. आवाज गोड. नंतर " आधार संसार " पद. नाटकातल्या त्यांच्या गाण्याचं वर्णन एकच–गोड, गोड, गोड.

मग एकदम आले चिन्मय लाहेरी. सिप्रा बोस, परवीन सुलतानाचे गुरू, त्यांनी ' वसंत मुखारी ' राग गायला. परंतु ठुमरीच्याच अंगानं. स्थूल गृहस्थ, अस्सल बंगाली मुद्रा, भरीव आवाज, ठाशीव गाणं पुढे मांडल्यासारखं श्रोत्यांना पसंत पडलं. नंतरची ठुमरी मात्र खरी ठुमरी होती ! " काहेको अखियाँ मिला ली. ' दाऊदखाँच्या साथीचा निश्चितच उल्लेख हवा.

डॉ. पाटणकरानंतर फिरोज दस्तूर ! आजचं आणखी एक मोठं आकर्षण. पारशी नाक, राग ललत. " रैनका सपना " अतिशय गोड, परंतु टप्प्याटप्प्यानं मांडल्यासारखं. मात्र आवाज आज लागत नव्हता. लोकांनी अधिक म्हणायचा

आग्रह केला. दस्तूर म्हणाले, ' गोपाला आज आवाज नाही. पण जी चांगली वस्तू आहे, तिला खराब कशाला करायची. ' मग जोगिया ठुमरी गायले.

डॉ. वसंतराव देशपांडे म्हटल्यावर लोकांनी टाळ्या वाजवल्या. गाणं चटकदार. छान ! शिवनटभैरव आणि खट गायले.

## कुठला मी इथे आलो !

७। वाजले आहेत. उत्कंठा शिगेला पोहोचली आहे. श्रोत्यांच्या मनात सर्वोच्च स्थान मिळवणाऱ्या भीमसेनचं गाणं व्हायचंय्.

टाळ्यांच्या पावसात ते येतात. व्यासपीठावर उभे राहतात आणि आग्रहाने एकेकाला बोलावून घेतात. हळूहळू सबंध व्यासपीठ भरून जातं. ते समाधानाने खाली बसतात. फिरोज दस्तूर आणि वसंतराव तंबोरे जुळवतात. १० मिनिटं नुसता तंबोऱ्याचा आवाज वातावरण गहिरं करत असतो. इतक्यात येतात गंगूबाई. चटकन उठून भीमसेन त्यांच्या पाया पडतात. उजव्या बाजूला त्या. डाव्या बाजूला वसंतराव, शेख दाऊदखाँ. जळगावकर आणि रामकृष्ण पटवर्धन तंबोऱ्याला.

पहिल्यांदा भीमसेन बोलतात—दोनच गद्य वाक्यं–' कुठला मी इथे आलो–इथे मला काय मिळाले तर सवाई गंधर्वांची पुण्यतिथी. जास्ती काही सांगणं मला शक्य नाही. गाणं सुरू करतो. ' एक मिनिट शांतता.

मग खाली मान घालून पहिला सूर लावतात—डोळे मिटून राग आसावरी तोडी. यांच्या गाण्याचं वर्णन करण्याची जरूरी नाही. ते सर्वांनाच माहीत आहे. एक सांगितलं म्हणजे पुरे—ज्यांना भीमसेनचं सर्वोत्कृष्ट गाणं ऐकायचं असेल, त्यांनी या कार्यक्रमाला यायला हवं होतं !

भैरवी संपते आणि सवाई गंधर्वांच्या भैरवीची रेकॉर्ड लागते. सर्वजण उभे असतात. सर्वांच्या मनात भावनोत्कटता. रेकॉर्ड संपते. श्रोते जड अंतःकरणाने वळतात. बाहेर पडताना मी सुस्कारा सोडतो. समोर एक वर्षाचा विरहकाल उभा असतो !

● ● ●

**ता. क.**

एक गोष्ट सांगायलाच हवी, की कार्यक्रमाचे नियोजन अधिक समाधानकारक हवे. कार्यक्रमात विविधता आणण्याचा हव्यास टाळणे आवश्यक आहे व या दृष्टीने नृत्याचा कार्यक्रम ठेवूच नये असे वाटते. १०,००० प्रेक्षकांपुढे नृत्य हे काहीसे चमत्कारिकच. ना कलाकाराचे समाधान, ना प्रेक्षकांचे ! आणि समाधान न झाल्यामुळे प्रेक्षकाला ' गोपीकृष्णा 'पेक्षा ' झोपी कृष्ण ' होणे बरे वाटले तर नवल काय !


शिलंगणाचं सोनं
ब.मो. पुरंदरे

# शिकंगणाचं सोनं



**दिवाळी अंकांत प्रसिद्ध झालेल्या दीर्घकथेचा**

## उत्तरार्ध

झुंजारराव आणि गोजाऊ परत सावंगीला गेले.

झुंजारराव आणि हैवतराव यांच्यातील वैर संपलं आणि सारं जांभूळ-खोर सुखावलं. नारंदी नदीच्या पलीकडे झुंजाररावांची गावं होती आणि अलीकडे हैवतरावांची गावं होती. सरहद्दीवरची दोन्हीकडची गावं नेहमीच चिंतेत बुडलेली असायची. दोन देशमुखांच्या आपसातल्या वैरात ही बिचारी मावळी माणसं उगीचच पोळून निघत, पण दीपाऊचं आणि सर्जेरावाचं लगीन ठरल्याच्या बातम्या पसरल्या आणि सर्वांपेक्षा ह्या गावांना जास्तच आनंद झाला.

झुंजारराव घरी परतले चंद्रावका आपल्या लेकीची वाट बघत होती, पण दीपा आलीच नाही. चंद्राक्कानं गोजाऊला पुसलं,

" वैन्सं, एकल्याच आलात ! दीपाला न्हाई आनलं ? "

" अग काय सांगू वैन्ये, तुझ्या दिवटीनं सासऱ्याला चेटूक केलं ! मेला असा खवीस व्हता, की त्येच्या डोक्शावरून उडत उडत जायला कावळचाला बी धीर व्हत नव्हता. पर ह्या पोरटीनं चेटूक केलं ग चेटूक केलं ! आवा करनार न्हाई, अशी माया करतोय त्यो सासरा ! "

चंद्राक्काला केवढं अपरूक झालं. लेकीच्या कौतुकाने तिचा शब्द जड झाला. दीपेच्या सासरच्या दिशेला बघत आणि जणू दीपेच्याच गालाकानशिलावरून दोन्ही हात फिरवीत तिने स्वत:च्या कानशिलावर बोटं मोडली अन् कसंबसं

पुटपुटली,

" माझी गुनाची– "

दुपार टळली आणि समशेरगडावरचा स्वार सुभेदाराच्या पत्राची थैली घेऊन आला. झुंजाररावांनी थैली घेतली. सुभेदारानं त्यांना गडावर लगोलग बोलावलं होतं. झुंजाररावांनी स्वाराला पुसलं,

" हैबतराव हिम्मतबहाद्दराकडबी थैली गेलीया का ? "

" जी व्हय. आत्ताच गेलीया ! "

झुंजारराव लगेच निघाले. फक्त दोनच स्वार त्यांनी बरोबर घेतले. पूर्वी कुठंही जायचं झालं, तरी पन्नास–साठ स्वार दिमतीला घेतल्याबिगर ते जात नसत. पण दीपाऊचं लगीन झाल्यापासून त्यांना एकटंदुकटंही कुठं जायला भय वाटेनासं झालं होतं. ते गडाच्या पायथ्याशी पोहोचले. गडाचा चढाव चढू लागले. तेवढ्यात मागच्या बाजूने टापा ऐकू येऊ लागल्या. झुंजाररावांनी वळून पाहिलं. तीन–चार स्वार दौडत येत होते. त्यांत हैवतराव होते. झुंजारराव थांबले. हैवतराव जवळ येऊन पोहोचल्यावर ते दोघेही बोलत बोलत गड चढू लागले.

गडावर पोहोचल्यावर दोघेही बरोबरच सुभेदाराच्या भेटीस गेले. सुभेदार आणि सुलतानराव बालेकिल्ल्यावर खलबतखान्यात होते. दोघेही अतिशय गंभीर दिसत होते. हे व्याही–व्याही कुर्निसात करीत पुढं गेले. कुणीच बोललं नाही सुभेदाराने खूण केली 'बसा' म्हणून. दोघेही बसले. दोघेही सुभेदाराकडे काहीशा उत्सुकतेने बघत होते. सुभेदाराने आपल्याला कशाला बोलावलं हे जाणण्याची त्यांना उत्सुकता होती. सुभेदार हुक्काही पीत नव्हता. तो कसल्यातरी चिंतेत बुडाला होता. तो सुलतानरावाकडे मान वळवीत आणि हैवतराव–झुंजारराव यांच्याकडे हात करीत म्हणाला,

" इनको कहीये सबकुछ, किलेदार ! "

" जी सरकार ! "

अन् सुलतानरावाने हैवतराव व झुंजारराव यांना काही सांगावयास सुरवात केली.

" नुसत्या जांभूळखोऱ्यापुरती नाही, तर सगळ्या मावळपट्टीतली मदार तुम्हा दोघांवर आहे. वखत मोठा अवघड आला आहे. दिल्लीकराच्या फौजा चमेल उतरून बुऱ्हानपुराकडे दौडू लागल्या आहेत. अशी फौज आजवर कधीही दख्खनवर चालून आली नव्हती. फौजेचा दर्या येतोय. एक लाखाच्यावर घोडदळ आहे. अर्ध्या लाखाच्यावर पायदळ आहे. शिवाय तोफखाना जंगी आहे. चिलखताचे हत्ती पाचशेच्या वर आहेत. पाच हजार उंट, सात हजार बैल, खेचरं आणि नोकरचाकर वेगळेच. शाहजहान बाद-

शाहा अशा इरेसरीनं निघाला आहे. सारी दौलत कबजा करायचा त्याचा पक्का इरादा आहे. त्याच्या सैन्यांत पठाण आहेत, अरब, कझाकी, उझबेगी, मोंगल, तुर्की, राजपूत असं बेमुर्वत हत्यारांचे दीड लाख मर्द आहेत. शिवाय वाटेत सामील होणारी माणसे आहेतच. आज ताजी खबर अशी आली आहे, की गोवेकर फिरंगी, जंजिरेकर सिद्दी आणि चांद्याचे गौंड राजे मोंगलांना सामील होणार आहेत ! सांगा आता हैबतराव, झुंजारराव, ह्या दळबादळापुढं आपल्या अन्नदात्याचं बळ किती ? आपलं लष्कर किती ? तोफखाना किती ? –"

" नसंल नसंल मोंगलाइतका तोफखाना आन् लस्कर. पर आमची मावळी हत्यारं मोगलाच्या तोफाबंदुकाला भारी हैती ! सरकारानी समदा मावळमुलूख झाडून हुबा करावा. आमचा येक येक गडी धा-धा मोगलाला लोळवील. दिल्लीवाला आमच्या खावंदाचं तख्त बुडवाया येतोय म्हनं. यऊ द्या की ! आम्ही काय बांगड्या भरल्या हैती व्हय ? ह्या शाजान बाच्छावाच्या बाला आन आजाला आमची बाच्छाई बुडीवता आली न्हाई ती काय ह्यो बुडिवतोय व्हय ? "

हैबतराव इरेसरीने बोलत होते. न कळत सुभेदाराची नजर हैबतरावांवर खिळली होती. हैबतराव बोलतच होते,

" सरकार, तुमी काय बी फिकीर करू नगा. जिथं अवघाड वाटत असंल, तिथं आमची फौज हुबी करा. जर मोगलाची सावली आपल्या आदलशाही रियासतीवर पडली, तर अस्सल मराठ्याची औलाद सांगणार न्हाई आम्ही. येकदा आमच्या तलवारीचा कडाका बघाच. का वो झुंजारराव ? "

" तर वो ! आजवर केवढाली झुंजं बाच्छावांनी आमच्या बळावर जितली हैती. आम्ही मऱ्हाठ्याची मानसं येक बळानं मनात आनू तर आपल्या बाच्छावाचा झेंडा दिल्लीवर नेऊन लावू. "

झुंजाररावांच्या तोंडचं हे वाक्य ऐकल्यावर सुभेदार मनातल्या मनात चमकलाच. त्याला ते खरोखर पटलं. वजीर खवासखानालाही मराठी माणसांच्या कर्तबगारीबद्दल अशीच खात्री वाटत होती. सुभेदाराला बरं वाटलं. त्याला उत्साह आला. मोगली आक्रमणाच्या भयानक बातम्यांनी त्याच्या अंतर्मनावर आलेलं सावट वितळून गेलं; पण झुंजाररावांच्या बोलण्याने तो जरा बिचकलाही. जर खरोखरच ही मराठ्यांची माणसं एकबळाने मनात आणतील, तर दिल्लीवर झेंडा नेऊन लावतील– मग जर एकबळानं ही माणसं बादशाही अमलाविरुद्ध उठतील, तर स्वतःचं राज्यही उभं करतील की !

"–सरकार, ह्या जांभूळखोऱ्याची तर चिंताच धरू नगा. म्या आन् झुंजार-

राव दोघंबी आहूत, झाडून सारा लढता गडी बाच्छावांच्या हुकमासरशी आनून हुबा करू. का वो झुंजारराव ? ”

“ तर वो ! ज्याची भाकर खाल्ली; ज्याच्या अन्नपान्यावर ह्यो द्येह पोसला, त्या अन्नदात्यावर संकट पडल्यावर जांभूळखोरं मागं न्हाईल व्हय ? कोन न्हाईल ? ह्ये इमान मऱ्हाठ्याचं हाये ! ”

हे सारं ऐकत असताना सुभेदार खुषही होत होता आणि दचकतही होता. मदतीला अशी हुकमी माणसं उभी असलेली पाहून त्याच्या मनात एक विचार डोकावत होता, की ही शक्ती अखेरपर्यंत आपल्याच लगामी लावण्याचं सामर्थ्य आणि कौशल्य बादशाहांपाशी आहे, तोपर्यंतच ही मराठी माणसं बादशाहांकरिता निष्ठेनं प्राण देतील. पण ज्या दिवशी यांना जाणीव होईल, की आपण बादशाहाचे ‘ गुलाम ’ आहोत, त्या दिवशी ही माणसं बंडाचा विचार करू लागतील अन् जर यांनी बंड केलं तर— ? तर शाहीसत्तेला सुरुंग लागेल ! जे दुसऱ्याच्या बादशाह्या निष्ठेने जगवतात, वाढवतात, त्यांना स्वतःचीच बादशाही निर्माण करणं कठीण आहे ? कोणताही बादशाह मराठी मुलखात टिकून आहे, तो मराठ्यांच्या आंधळ्या स्वामिनिष्ठेवर, मराठ्यांच्या आत्मघातकी दुर्गुणावरच !

सुभेदारापुढं हैबतराव व झुंजारराव बसले होते. दोन प्रचंड सामर्थ्यं आपल्या समोर आहेत, हे पाहून सुभेदाराला आनंद होत होता, पण ही प्रचंड सामर्थ्यं पचवायला अवघड आहेत, हे जाणताच तो क्षणभर गोंधळून गेला होता. पण वरचढ अम्मलदारीचा तोरा आणि रुबाब सांभाळीत त्याने त्या दोघांनाही, जांभूळखोऱ्यातला जास्तीत जास्त कडबा, जास्तीत जास्त धान्य, तेल, गूळ वगैरे दाणागोटा समशेरगडावर साठवून ठेवण्यासाठी खरेदी करण्याचा हुकूम दिला. दोघांनीही तावडतोब होकार दिला.

निरोप घेऊन दोघेही घरी जाण्यासाठी उठले.

* * *

मोंगली फौजेने नर्मदा ओलांडली. दीड लाख फौजेचा अफाट पसारा कोसावारी दाट रांग धरून चालला होता. तोफांचे गाडे कराकरा वाजत चालले होते. त्या गाड्यांना बैल जुंपलेले होते. काही गाड्यांना उंट, तर काहींना घोडे आणि खेचरं जुंपली होती. काही तोफा एवढ्या अगडबंब होत्या, की त्यांना हत्ती जुंपले होते. घोडदळ, उंटदळ, पायदळ, हत्तीदळ वगैरे सैन्यविभाग इतके मोठे होते, की ते पाहूनच छाती दबत होती. पहिला प्रश्न मनात उभा राहत होता, की ह्या आडमाप वऱ्हाडाला रोजचं खाणं किती लागत असेल ?

खरोखर रोजचा खर्च अमाप होता. छावणी पडे तेव्हा वाटे, की हे एक प्रचंड शहरच आहे.

अगदी आघाडीवर बादशाही झेंडे हत्तीवर फडकत होते. मागोमाग हत्तीवरती नौबत दणाणत होती. त्यामागे स्वारांची पंचवीस हजार फौज़. त्यामागे एक हत्ती डौलात चालत होता. त्यावर सोन्याची अंबारी होती. अंबारीत खासा बादशाह शाहजहान बसला होता. शाही हत्तीच्या भवती भाले घेतलेले स्वार चाललेले होते. त्या मागोमाग अंबाऱ्या असलेले अनेक हत्ती चालले होते. ह्या सर्व अंबाऱ्यांना सर्व बाजूंनी पडदे सोडलेले होते. हे हत्ती शाही–जनान्याचे होते. बादशाहाच्या हत्तीच्या मागच्याच हत्तीवरच्या अंबारीत होती शहाजहानची प्राणप्रिया बेगम मुमताज. अंबारीत सावरीच्या गाद्या, लोड, उशा आणि गिरद्या होत्या. ती त्यावर पहुडली होती. ती खूप शिणलेली दिसत होती. जवळच एक दासी बसलेली होती. ती मुमताजला वारा घालीत होती. ह्या हत्तीच्या गळयात घंटाघुंगरं घातलेली नव्हती. आवाजाने बेगमेला त्रास होऊ नये, म्हणून ही काळजी घेतलेली होती. अंबारीत गुलाबपाण्याचा सुरेख सुगंध दरवळत होता. हत्ती मोठा हुशार होता. तो अगदी बिनझोल चालला होता. त्याच्या चालण्यात अशी खुबी व डौल होता, की वरच्या अंबारीला अजीबात हिसके-हेलकावे बसत नव्हते. बेगमेची तबियत फारच नाजूक झालेली होती. तिची मन:स्थितीही फार हळुवार बनली होती. तरीही ती ह्या युद्धावर निघालेल्या शाहीस्वारीत नवऱ्याबरोबर निघाली होती. एक क्षणही नवऱ्यापासून दूर राहण्यास तिचं मन तयार नव्हतं. तिचं रूप अलौकिक होतं, पण एक प्रकारचा फिकटपणा तिच्या चेहऱ्यावर आलेला होता. अंगावर दागिन्यांचं ओझही तिला सोसवत नव्हतं. ती फार मलूल दिसत होती, पण हे सारं स्वाभाविकच होतं. कारण ती गरोदर होती. तिचे दिवस अगदी भरत आले होते. आता होईल ते तिचं चौदावं बाळंतपण होतं ! आतापर्यंतच्या तेरा बाळंतपणांतून ती सुखरूप सुटली होती. ह्या चौदाव्या खेपेला मात्र ती मनाने जरा अस्वस्थ झालेली होती.

शाहजहान दिल्लीहून दख्खनवर निघाला होता, तो अशा निश्चयाने, की सारी दख्खन मोंगल साम्राज्यात दाखल करायचीच. दख्खन जिकण्याची महत्त्वाकांक्षा त्याच्या बापाच्या आणि आजोबाच्याही मनात होती, पण वर्षन् वर्ष प्रयत्न करूनही त्यांना दख्खनच्या सुलतानांची राज्यं बुडविता आली नाहीत; कारण ह्या सुलतानांच्या फौजांत चिवट आणि तिखट मराठे होते. पण यावेळी मात्र तो अफाट बळ घेऊन स्वत: येत होता.

पावलापावलाने बुऱ्हाणपूर जवळजवळ येत होतं. बादशाहाने मुमताजची

उत्कृष्ट बडदास्त ठेवलेली होती. प्रवासात किंवा मुक्कामात तिला त्रास होऊ नये, म्हणून तो फारच जपत होता, पण तरीही तिला ही दगदग झेपत नव्हती. होणारा त्रास बोलूनही न दाखवता ती निमूटपणे सहन करीत होती. हा त्रास ती केवळ नवऱ्याच्या सहवासात राहता यावं, म्हणून झेलीत होती. हे उघड दिसत होतं, की तिचं बाळंतपण ह्या स्वारीतच होणार. स्वारी किती दिवस चालेल, हे कुणालाच सांगता येत नव्हतं. कदाचित वर्ष, कदाचित दोन वर्षं, कदाचित जास्तही वेळ लागण्याची शक्यता होती. दख्खनमध्ये आपल्याला कमालीचा प्रतिकार होणार, हे शाहजहान जाणून होता.

वाटेत मुक्काम पडत होते. बादशाह आणि मुमताज यांच्यासाठी खासे शामियाने होते. त्यांत सर्व सुखसोयी सज्ज असत. बादशाह मुमताजपाशी जास्तीत जास्त वेळ राहत होता. हकीम, वैद्य, सुइणी प्रवासात बरोबरच होत्या. एक दिवस शाहजहान मुमताजला म्हणाला की ' मुमताज, ह्या स्वारीची दगदग तुला झेपत नसेल, तर तुझी इथंच उत्तम व्यवस्था करतो. तू बरी होईपर्यंत मीही तुझ्यापासून हलणार नाही. '

ती हसून म्हणाली की ' मला दगदग होत आहे, हा विचारही मनात आणू नका. तुमची महत्त्वाकांक्षा पूर्ण करा. मला काहीही त्रास होत नाही. थांबू नका. पुढे चला. मी तुमच्यामागे सावलीसारखी आहे. माझी तबियत उत्तम आहे. '

–आणि एके दिवशी बुऱ्हाणपूरच्या खाणाखुणा दिसू लागल्या. बुऱ्हाणपूर हे मोंगली हद्दीतील सर्वांत मोठं शहर होतं. जवळच अशीरगड नावाचा किल्ला होता. बुऱ्हाणपूरला फार मोठं शाही लष्करी ठाणं होतं. शहराजवळ फौजा पोहोचल्या. शहराबाहेरच तंबू, राहुट्या व शामियाने पडले. शाही शामियाना उभारला गेला. हत्ती शामियान्यापुढे आला आणि बसला. शाहजहानने स्वतः हाताचा आधार देऊन मुमताजला शामियान्यात नेलं.

—मोंगल बादशाह बुऱ्हाणपुरात दाखल झाल्याच्या खबरा विजापुरात आणि साऱ्या आदिलशाहीत पसरल्या. गडकोटांचा कसोशीने बंदोबस्त करण्यात आला. रोजी नव्या नव्या बातम्या येत होत्या. एके दिवशी बातमी आली, की शाहजहानची बेगम मुमताज बुऱ्हाणपुरास प्रसूत झाली. तिला मुलगी झाली.

मुलीचे नाव ठेवण्यात आलं गोहरआरा. मुमताजची सुखरूप सुटका झाली, याचा शाहजहानला फार फार आनंद झाला. त्याने मशिदीत प्रार्थना केल्या. खूप दानधर्म केला. तोफा उडवल्या.

मुमताजची सुटका झाली, पण तिची प्रकृती ढासळतच चालली. उपचार सतत चालू होते. तिची ती विकल स्थिती पाहून शाहजहानला फार फार

दु:ख होत होतं. तो अगदी व्याकूळ झाला होता. मुमताज अतिशय अशक्त आणि मलूल झाली होती, पण तिला स्वतःच्या यातनांपेक्षा नवऱ्याच्या मनाचीच जास्त काळजी वाटत होती. ती स्वतःच त्याला धीर देत होती. मुमताजच्या कोसळलेल्या प्रकृतीमुळे शाहजहानच्या तुफानी महत्त्वाकांक्षेची चाल थबकली होती. त्याचं कशातही लक्ष लागत नव्हतं. तो खिन्न झाला होता.

हकीम व वैद्य सारी धडपड करीत होते. मुमताज खंगत चालली होती. बादशाह व्याकूळ नजरेने तिच्याकडे बघत बसत होता. एकदा तर त्याने हकिमांच्या पुढं पदर पसरला. त्याला बोलवेना. तो कसंबसं म्हणाला–

" कुच भी करो...मेरी मुमताज..."

त्याच्या डोळयांतून अश्रू घळघळले.

आणि एके दिवशी दिवा विझला ! मुमताज अबोल झाली. शाहजहान पोरका झाला. दु:खाचा आक्रोश उठला. मुमताज गेली. शाहजहानचं हृदय त्याला सोडून गेलं. लहान मुलासारखा तो ढसढसून रडू लागला. सारं जग त्याला उदास दिसू लागलं. साऱ्या दिशा त्याला वाळवंटाप्रमाणे रुक्ष, रखरखीत, भयाण वाटू लागल्या. आता त्याच रखरखीत वाळवंटातून आयुष्याचा उरलेला प्रवास त्याला एकटयाला करायचा होता. त्याच्या आयुष्यातला सारा आनंद संपला. त्याच्या उत्साहावर, महत्त्वाकांक्षेवर कुऱ्हाड पडली.

बुऱ्हाणपूरपासून शाहजहान बादशाहाने दिल्लीकडे तोंड वळवले. त्याने दिल्लीची वाट धरली. बादशाह परत फिरला. त्याच्या डोळयांतून आसवं ओघळत होती. प्रत्येक आसू टाहो फोडीत होता, ' मुमताज ! मुमताज !'

बादशाह शाहजहान बुऱ्हाणपूरपासूनच दिल्लीला माघारी फिरल्याच्या बातम्या विजापूरला आल्या. सर्वत्र पसरल्या. मुहम्मद आदिलशाहने सुस्कारा टाकला. शिक्यावर टांगला गेलेला त्याचा जीव स्थिरावला. एकदम पन्नास मणांचं ओझं डोक्यावरून खाली उतरवलं गेलं.

समशेरगडावर ही बातमी आली आणि अत्यंत गंभीर बनलेल्या सुभेदाराच्या काळचाकभिन्न मुद्रेवर गुलाबाची टवटवी चढली. त्याने एकदम गुडघे टेकले आणि हाताची ओंजळ करीत डोळे मिटले. मस्तक भुईवर टेकवले.

रात्री अत्तरमहाल रंगून गेला

सुलतानराव मात्र जरा आतल्या आत हिरमुसला. सुभेदाराला आणि बादशहाला आपली निष्ठा आणि कर्तबगारी दाखविण्याची त्याने केलेली कोशीस फुकटच गेली होती. तो गडाच्या ढाल्या बुरुजावर उभा होता. खाली दरवाजातून झुंजारराव व हैबतराव हसत-बोलत गडात प्रवेश करीत होते. हैबतरावांचा हात झुंजारावांच्या खांद्यावर होता. उंच बुरुजावरून सुलतानराव

बघत होता. तो पुटपुटत होता,
• " हे काय बरं झालं नाही ! "

* * *

लढाईचं वातावरण तापलं तापलं आणि एकदम आपोआप थंड झालं. लढाई-वर जायच्या तयारीत असलेल्या जांभूळखोऱ्यातल्या मावळी गड्यांनी ढालीतलवारी खुंटीवर ठेवल्या. खळ्यावरची उरलीसुरली कामं संपलेली होती. गावोगावच्या जत्रा रंगत होत्या. भैरोबाची जत्रा तर दरवर्षीहूनही गाजली. नायकिणीचा माळ फुलून गेला. जांभूळखोरं माळावर जमा झालं. फडांनी माळ रंगवला. झुंजारराव आणि हैबतराव हे दोघंही एका जाजमावर शेजारी शेजारी बसून पानाला चुना लावीत होते.

– गोजाऊआक्काचा झुंजाररावांच्या मागं लकडा लागला होता, की आपण सारी जेजुरीला जाऊन येऊ. नवस फेडू. तिचा नवस होता ना, की माझ्या दीपाऊला तालेवार नवरा मिळू दे...... ! आता मिळाला होता. अखेर झुंजाररावांनी मनावर घेतलं. त्यांनी हैबतरावांनाही जेजुरीचा बेत सांगितला. त्यांनीही मोठ्या हौसेनं ' हो ' म्हटलं.

पंचवीस-तीस बैलगाड्या जुतल्या गेल्या. घंटाघुंगरांच्या रिमझिमाटात आणि हसण्या-बोलण्याच्या खळखळाटात जांभूळखोऱ्यातल्या बैलगाड्यांची रांग जेजुरीच्या रस्त्याला लागली. मागोमाग पन्नास-साठ घोडी टापा टाकीत निघाली. घोड्यांवर होते खासे व्याही. व्याही पण नुसते व्याही नाही; नवरा-नवरीही. सर्जेराव हैबतरावांच्या आणि दीपा झुंजाररावांच्या पुढ्यात बसली होती. वाटेत मुक्काम पडत होते. लगीन रंगलं नाही, अशी ही जेजुरीची वारी रंगत होती. आता मागे कसली कामं नव्हती. रुखरुख नव्हती. हैबतरावांनी आपल्या घरचा बारदाना रावजीअप्पांच्या अंगावर टाकला होता. झुंजार-रावांनी आपला बारदाना गडीमाणसांवर टाकला होता. गाड्या–घोडी

*With Best Compliments*
FROM
**SHAH SUPPLY AGENCY**
*Baroda Street*
*Carnac Bridge*
**BOMBAY–9**

चालली होती. घोड्यावर बापाच्या पुढ्यात दीपा बसली होती. बसल्या बसल्या ऊस खात होती अन् चोयट्या नेम धरून नवऱ्याला मारीत होती. तेव्हा हैबतराव म्हणाले,

" का ग ए पोरी, नवरा गरीब मिळाला म्हणून का ? "

" बरा गरीब असंल ! नाठाळ खोंडावानी हाये ! "

" आँ ? काय केलं ग माझ्या पोरानं ? "

" जाता-येता हुंदाडतो ! "

आणि मग हैबतराव अन् झुंजारराव खदखदून हसले. पोरंही हसली. सर्जेराव दिसत होता मोठा रुबाबदार. लगीन झाल्यापासून दीपा चिरडी नेसू लागली होती. चिरडी म्हणजे तिच्या मापाची लहानशी साडी. त्या चिरडीचा घोळ आणि एवढ्याशाशा डोक्यावरचा पदर सावरण्याचा तिचा आव अगदी मोठ्या बायकांसारखा होता. हैबतरावांनी तिच्या मापाचे डागिन मुद्दाम घडवून घेऊन तिच्या अंगावर घातले होते. हातांत गोटपाटल्या, दंडांत येळा, गळ्यात पुतळ्या, साज, डोरलं आणि काळी पोत, कानात बुगड्या, भोकरं. नाकात सुरेख सरजाची नथ, पायात तोडे, बोटांत जोडवी, मासळ्या आणि कमरेला कमरपट्टा. खरोखर दीपा मोठी छान दिसत होती. तिच्या गोऱ्या अंगकांतीला हिरवी साडीचोळी खुलून दिसत होती. भाळावरची कुंकवाची चीर सुरेख दिसत होती. ती लाजायची, रुसायची, हसायची अन् मग गोड दिसायची. सर्जेरावाचा थाट पेहेलवानी होता. पायात मावळी चिमुकल्या वहाणा. नेसायला पोटऱ्यापर्यंतचा मांडचोळणा. अंगात चुणीदार अंगरखा. गळ्यामधे काळ्या गंड्यात गुंफलेली सोन्याची पेटी. मनगटात गंडा. कानांत सोन्याच्या बाळ्या. उजव्या हातात चांदीचं कडं. डोक्याला डाळिंबी शेमला अन् डोळ्यांत खट्याळ कुर्रा ! दिवसातून दहादा तो दीपाला बजावीत होता,

" म्या तुजा नौरा हाये नौरा ! इसरू नगस ! "

जेजुरीचं शिखर दिसायला लागलं. गाडीत बसलेल्या बायामाणसांचे हात जोडले गेले. पोरांचा गलगा सुरू झाला. गडीमाणसांनी उगीचच बैलांच्या शेपट्या पिरगाळल्या आणि गाड्या धडाधडा धावत सुटल्या. आतल्या माणसांची हाडं खिळखिळी होऊ लागली. घोडेही दौडत निघाले. धूळ उठली. हा हा म्हणता जेजुरीच्या पायथ्याशी माणसं पोहोचली. गाडीतून उतरल्याबरोबर गोजावकानं खंडोबाच्या गडाला दंडवत घातलं. तीन महिन्यांच्या आतच पुन्हा जेजुरीला येणं घडलं, याचा तिला मोठा आनंद होत होता. नवस फेडायला मणभर भंडारा ती घेऊन आली होती. गाड्या सुटल्या. राहुट्या ठोकल्या जाऊ लागल्या. पुरणावरणाचा स्वयंपाक व्हायचा होता. गडीमाणसं कामाला लागली. बाकीची सारी जेजुरीचा गड चढू लागली. वाघेमुरळ्या आडव्या

येत होत्या. गात होत्या. नाचत होत्या. गर्जत होत्या–' जय येळकोट मल्हाऽऽर ! '

सर्जेरावाच्या हातात पेटलेली दिवटी दिलेली होती. एका गड्याहाती तेलाची बुदली होती. हैबतराव व झुंजारराव सर्जाच्या आणि दीपेच्या शेजारून गड चढत होते. नवरानवरी जोडीने देवाच्या पाया पडायला चालले होते.

गडावर चौघडा झडत होता. सारेजण गडावर पोहोचले. मणभर भंडाऱ्याच्या आणि खोबऱ्याच्या पराती घेऊन गडी मागोमाग होते. देवाच्या समोर असलेल्या अंगणात सारे पोहोचले. समोर खंडोबा गाभाऱ्यात उभा होता. नंदादीप तेवत होते. झुंजाररावांनी दोन्ही हातांनी भंडाराखोबरं घेतल आणि ते मोठ्याने गरजले,

" मल्हारी म्हाळसाकांताचाऽऽऽऽ ! "

" येऽऽऽळकोऽऽट ! "

सर्वांनी झुंजाररावांना साथ दिली अन् ह्याच अखंड गर्जनांत एक मणाचा भंडारा उधळला गेला. उन्हाच्या किरणात भंडारा उधळला जात होता. तो चमकत होता सोन्याच्या किसासारखा. सारं आसंमत पिवळंधमक होऊन गेलं होतं. सर्वजण नखशिखांत पिवळे झाले होते. नंतर सारे देवळात गेले.

झुंजारराव देवापुढं उभे राहिले. मस्तकावरची घंटा घणघणली. त्यांना आठवत होता तीन महिन्यांपूर्वीचा प्रसंग. हीच घंटा घणघणावीत ते गरजले होते, हैबतरावाचं मुंडकं वर्षाच्या आत ह्या उंबरठ्यावर आणून वाहीन म्हणून ! हैबतरावांनाही ही त्यांची प्रतिज्ञा समजली होती. दोघांनीही एकमेकांकडे पाहिलं आणि दोघेही न बोलता हसले. पोरांची गडबड आणि बायकांची गजबज चालू होती. नवरानवरीला बरोबर घेऊन गाभाऱ्यात गोजाक्काने देवाचा कबजा घेतला होता ! झुंजाररावांनी बाहेर हात जोडले होते. हैबतरावांनी देवापुढं उंबरठ्यावर डोकं ठेवलं होतं अन् झुंजारराव म्हणत होते,

" व्याही, आमचा नवस फिटला बरं का ! "

सर्वांच्या हसण्याने सारं देऊळ गदगदून गेलं होतं. गोजाक्काचा नवस फिटला होता. सर्जेराव आणि दीपाने देवापुढं जोडीने डोकी टेकवली होती. गोजाक्का मोठ्याने म्हणत होती,

" देवा खंडेराया, माझ्या लेकरांना सुखात ठीव ! "

बाहेर उंबरठ्यापाशी असलेले हैबतराव आणि झुंजाररावही हेच म्हणत होते मनोमन.

चार दिवस जेजुरीला सर्वांचा मुक्काम होता. हे चार दिवस कसे संपले, हे कुणाला समजलंही नाही.

परतीचा प्रवास सुरू झाला आणि हसता-खेळता प्रवास केव्हा संपला,

तेही समजलं नाही. मंडळी आपापल्या घरी परतली.

पावसाळा अगदी तोंडावर आला होता. पावसाळ्याच्या आधीची शेतीची कामं उरकण्यात जांभूळखोरं मग्न होऊन गेलं. पाऊस सुरू झाला. पहिल्या पावसात दीपा आणि सर्जेराव चिंब भिजून गेले.

* * *

दीपा सासरीच होती. श्रावणसरी सरसरत होत्या. फक्त एकच दिवस नागपंचमीला दीपा माहेरी गेली होती. दुसऱ्याच दिवशी सकाळी हैबतरावांनी मेणा पाठवला आणि दीपाला परत आणलं. त्यांना दीपावाचून करमतच नव्हतं.

असंच एखादा दिवस दीपा माहेरी जाऊन येत होती. गौरीगणपती झाले. आश्विन आला. नवरात्र बसलं. एखाद्या जाणत्या बाईसारखी दीपा घरात वावरत होती. घरात कामंधामं तिला करावी लागत नव्हतीच. नोकरचाकर आणि कुळंबिणी कामाला होत्या.

दसरा आला. घरात पुरण झालं. वरण झालं. फुलांचं तोरण लागलं. दिवस कलंडला आणि शिलंगणासाठी सारा गाव हैबतरावांच्या वाड्यापुढं जमा झाला. वाजतगाजत शिलंगणाची मिरवणूक निघाली. सर्जेराव एका घोड्यावर स्वार झाला होता. दीपा बघत होती माडीवरच्या खिडकीतून. मिरवणूक वेशीबाहेर अर्धा कोस पुढं गेली. अमृतेश्वराच्या देवळापर्यंत दरसालप्रमाणे मिरवणूक गेली. शमीपूजन झाले. बकरा उडाला. बंदुकांच्या फैरी झडल्या. अंधार पडत चालला होता. मिरवणूक गावाकडे परतायच्या बेतात होती, एवढ्यात सावंगीच्या बाजूने सात–आठ घोडे दौडत येताना दिसले. हैबतराव थांबले. स्वार जवळ आले. बघतात तो खुद्द झुंजारराव सहा–सात स्वारांनीशी येत होता. झुंजारराव घोड्यावरून उतरले. हसत हसत पुढे आले. हैबतरावही चार पावलं सामोरे गेले. झुंजाररावांनी शिलंगणाचं सोनं हैबतरावांना दिलं आणि आलिंगन देऊन भेट घेतली. व्याहीव्याही सुखावले. हैबतरावांनी सर्जेरावाला हाक मारली,

"सर्जा पोरा, सोन्याची पानं दे मामासाहेबानला."

सर्जानं सोनं झुंजाररावांना दिलं आणि त्यांच्या पावलांवर डोकं ठेवून नमस्कार केला. झुंजाररावांनी सर्जाला एकदम उचलून हृदयाशी धरलं. हैबतरावांनी झुंजाररावांना घरी चलण्याचा आग्रह केला, पण ते म्हणाले,

"नग नग, व्याही. सारा गाव माझी वाट बघत थांबलाय. शिलंगण गावात फिरायचंय्. म्या हातूनच निरोप घेतो."

हैबतरावांना पटलं. त्यांनी त्यांना निरोप दिला. झुंजारराव माघारा वळले

आणि सावंगीच्या रोखाने दौडत सुटले. मागोमाग त्यांचे स्वारही.

समशेरगडावरही दसरा झाला. किल्लेदार सुलतानराव सदरेवर बसला होता. गडावरचे मराठी शिपाई मुजरा करीत होते. त्याला सोनं देत होते आणि मुजरा करून परतत होते. सांज टळली आणि वर्दळ कमी झाली. बराच वेळ कुणीच आलं नाही. शेवटी एकच माणूस आला. त्याला पाहून सुलतानरावाच्या मुद्रेवर जरासा आनंद उमटला. दौलूने सोन्याची चार पानं किल्लेदाराच्या हाती दिली. चार त्याच्या पागोट्यावर टाकली आणि डोकं टेकवून नमस्कार केला. किल्लेदार सुलतानरावाने दबल्या आवाजात पुसलं, "काय खबर दौलू ?"

"हैवतरावांना सोनं द्यायला झुंजारराव सवता जातीनं कळशाला गेलं होतं. आमरूतेसराच्या देवळापाशीच गाठीभेटी झाल्या. सोनं दिलं-घेतलं."

ही बातमी ऐकून सुलतानरावाच्या कपाळावर नापसंतीच्या आठ्या उमटल्या. तो फार बोललाच नाही. त्याने विचारलं,

"आणखी काय नवी–जुनी खबर ?"

"चार दिसांमागं वाईच्या कोर्टात गेलो हुतो. तथं कानांवर आलं, की मिरजेच्या सुभेदारानं येका कुरकळन्याची सून धरून आणली. त्या सुनंच्या सासऱ्यानं सुभेदाराच्या वाड्याम्होरं डोस्कं आपटून जीव दिला."

सुलतानरावाच्या चेहऱ्यावर काहीही परिणाम झाला नाही. दौलू पुढं सांगू लागला,

"आन् धनी, आसंबी कानावर आलं हाये, की तकडं कानडी मुलखात वाच्छाव खावंद कामगिरी काढनार हायेत अन् तकडं जांभूळखोऱ्यातली मानसं रवाना व्हनार हायेत. तुम्हास्नीबी हुकूम येनार हाये म्हनं!"

"कुणी सांगितलं तुला ?"

"रह्यमतपुराला गेलो व्हतो वाईहून. कालच आलो. तथं रनदुलखानाचा कारकून म्हनत व्हता."

"असं ?"

*With Best Compliments*

**FROM**

**SANJIT INDUSTRIES**

*Cadell Road, Dhuru Wadi,*

**DADAR, BOMBAY-29**

" जी ! "

ही बातमी ऐकल्यावर मात्र सुलतानराव बेचैन झाला. समशेरगड सोडून दगदगीच्या स्वाऱ्या– शिकाऱ्या करायला त्याचं मन नाराज असे. अशी कुठं जायची पाळी आली, की तो फक्त सुभेदार सिद्दी सलाबत रेहानला कळवीत असे. मोठ्या आबदार भाषेत तो सुभेदाराला प्रत्यक्ष सांगे किंवा पत्राने कळवी की–

'...... माझी नेमणूक दरबारानं अमुक ठिकाणी केलीय् म्हणून समजतं. सरकारच्या हुकमाची विनाकसूर अंमलबजावणी करणं, हे माझं काम. आम्ही चाकरमाणसं म्हणजे चुलीची लाकडं. सरकार ज्या चुलीत घालतील, तिथं निमूटपणे जळत ऱ्हायचं एवढंच ह्या बंद्या गुलामाचं कर्तव्य. मग पायाकडून पेट घेतलाय, की डोक्याकडून घेतलाय, हेही बघणे नाही. खावंदांचे अन्न शिजावे, एवढीच इच्छा आणि काळजी. जांभूळखोऱ्यावर सख्त नजर ठेवणारा, समशेरगड प्राणापलीकडे सांभाळणारा दुसरा कोणीही किल्लेदार गडावर आला, तरी चाकरास आनंदच आहे. जांभूळखोऱ्यातील माणसे म्हणजे रानटी जनावरांसारखी शूर. त्यांना जरबेत ठेवून सरकारी चाकरीवर इमानात राखले म्हणजे ह्या बंद्यास समाधानच आहे. हे काम ह्या बंद्या चाकरानेच केले पाहिजे, असा हट्ट नाही. दुसऱ्या कोणीही करावे. चोख झाले म्हणजे झाले...'

हे असं म्हटलं, की सुभेदाराला कळून चुके, की इथं समशेरगडावर हा इमानी आणि अनुभवी सुलतानरावच हवा ! सुभेदार हरप्रयत्न करून सुलतानरावाच्या नव्या नेमणुकीचे आणि बदलीचे हुकूम फिरवून घेई. समशेरगडावर सुलतानरावाची पकड कायम राही. याही वेळी त्याने तेच करायचं ठरवलं. दौलूला तो काहीही म्हणाला नाही, पण बेत तोच ठरवला. प्रसंगी सुभेदाराला कसं खूष करायचं, तेही तंत्र त्याला पूर्णपणे माहीत होतं. अत्तरमहाल उभा होताच !

सुलतानरावाने त्याच रात्री सुभेदाराला सविस्तर पत्र लिहिलं आणि दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने शिरवळला सुभेदाराकडे थैली रवाना केली. थैलीचे जबाब येईपर्यंत सुलतानरावाचं लक्ष कशातही लागणार नव्हतं, लागत नव्हतं.

दोन दिवस गेले. तिसऱ्या दिवशी सुभेदाराची थैली एका अरब स्वाराबरोबर आली. सुलतानरावाने अधीरपणे ती वाचली. त्यात सुभेदाराने लिहिलं होतं, की 'विजापुराहून दोन स्वाऱ्या कर्नाटकात रवाना होणार आहेत. एक स्वारी रणदुल्लाखानाच्या हुकमतीखाली निघणार आहे, ती बेल्लारीवर जाणार आहे. त्या स्वारीत रणदुल्लाखानाच्या फौजेत तुमची नेमणूक करण्यात आली आहे व दुसरी स्वारी फत्तेखानाच्या हुकमतीखाली

तेलंगणात कर्नूळ प्रांतात जाणार असून, त्यात फत्तेखानाच्या हाताखाली हैबतराव हिम्मतबहाद्दराची नेमणूक झाली आहे. पण मी रणदुल्लाखानाच्या हाताखाली तुमच्याऐवजी झुंजाररावाची नेमणूक होईल, अशी तजवीज केली आहे. समशेरगडावरून तुम्हाला 'हलविले जाणार नाही, ही काळजी मी घेईन.'

हे वाचत असताना सुलतानरावाचा जीव भांड्यात पडत होता. इतकंच नव्हे, तर त्याला आनंदाचं भरतं आलं होतं. का ? कारण जांभूळखोऱ्यातली, झुंजारराव अन् हैबतराव ही दोन जबरदस्त माणसं जांभूळखोऱ्यातून बाहेर फेकली जाणार होती. हे दोन वाघ जरबेत ठेवणं, ही एक अवघड कामगिरी सुलतानरावाला करावी लागत होती. ह्या दोन वाघांचा सुलतानरावालाही वचक होता. ही ब्याद जर कर्नाटक-तेलंगणात जात असेल, तर जांभूळखोऱ्यात आपल्याला कुणाचीही भीती उरणार नाही, हे गोड स्वप्न त्याला आतापासून पडत होतं. तो खूष झाला होता. सुभेदाराने पत्राच्या अखेरीस लिहिलं होतं, 'मी समशेरगडावर चार दिवसांनी येत आहे. अत्तरमहाल तयार ठेवावा !' अन् खरोखरच चार दिवसांनी सलाबत समशेरगडावर दाखल झाला. त्याच-वेळी विजापूरहून आलेले दोन सांडणीस्वार जांभूळखोऱ्यात दौडत आले. एक वळला सावंगीकडे. दुसरा वळला कळशाकडे. बादशाहाचे हैबतरावांना व झुंजाररावांना हुकूम होते नव्या मोहिमेचे. असे हुकूम काही त्यांना प्रथमच येत होते असं नाही. नेहमीच दूरदूरच्या मोहिमांवर त्यांना जावं लागत असे; पण कर्नाटक आणि तेलंग प्रांतात कामगिऱ्या असल्या, की त्या किती दिवस चालतील आणि घराबाहेर किती दिवस राहावं लागेल, याचा नेम नसायचा. दोघांनाही प्रथम विजापुरात दाखल होण्याचा हुकूम होता. तेथून नंतर फौजा कर्नूळ–बेल्लारीकडे कूच करणार होत्या.

हैबतराव आणि झुंजारराव निघण्याच्या तयारीला लागले. त्यांची आप-आपली फौज तयार होऊ लागली. हैबतरावांना एकाच गोष्टीचं वाईट वाटत होतं. त्यांना आपल्या लाडक्या दीपाऊपासून दूर जावं लागत होतं. किती दिवसांनंतर दीपाऊ आणि सर्जा पुन्हा भेटतील, हे सांगता येत नव्हतं.

झुंजाररावांनी व हैबतरावांनी एकदमच विजापुराकडे कूच करायचा बेत योजला. हैबतरावांनी रावजीअप्पांना सारं सांगितलं. नेहमीप्रमाणे सर्व व्यवहार, हिशेब आणि वाडा अप्पांच्या हवाली त्यांनी केला. कूच करायचा दिवस उगवला. सकाळपासून ते दीपाऊशीच बोलत होते. तिला समजणाऱ्या आणि न समजणाऱ्याही गोष्टी तिच्याशी बोलत होते. रिवाजाप्रमाणे त्या दिवशी कुळधर्म–कुळाचार साजरे होत होते. हैबतरावांची तलवार देवापुढं चौरंगावर ठेवून तिची पूजा करण्यात आली होती. पुरणाचा नैवेद्य झाला होता.

त्यांच्या खाशा स्वारीच्या घोड्याची दसऱ्याच्या दिवसाप्रमाणे पूजा करण्यात आली. तिकडे सावंगीतही झुंजाररावांच्या घरी कुळधर्म झाला होता. झुंजारराव प्रथम कळशाला येऊन दीपाला अन् सर्जेरावाला भेटणार होते व मग व्याही-व्याही तेथूनच कूच करणार होते. दुपारचा सूर्य जरासा कलला आणि झुंजारराव आपल्या फौजेनिशी हैबतरावांच्या वाड्यापुढं दाखल झाले. ते वाड्यात आले. दीपाऊला आणि सर्जेरावाला भेटले. दोघांशीही ते बोलत होते. तेवढ्यात हैबतराव देवापुढं गेले. त्यांनी देवावर बेलभंडार उधळला. स्वतःच्या भाळी लावला आणि मोठ्याने गरजले,

"तुळजाभवानीचा उदो उदो ! जय येळकोट मल्हार ! माझ्या सर्जादीपाऊला सांभाळा ! औक्षवंत करा !"

त्यांनी डोकं देवापुढं व तलवारीच्या पात्यावर टेकवलं. तेवढ्यात दीपाऊला घेऊन झुंजारराव देवापाशी आले. तिनं चौरंगावरची तलवार उचलली आणि म्यानात घालून हैबतरावांच्या कमरेला लटकावली. देवापुढच्या तबकात औक्षणासाठी निरांजन तेवत होतं. तिनं तबक उचललं. सासऱ्याच्या आणि बापाच्या कपाळाला कुंकवाचा टिळा लावला. ओवाळलं. हैबतरावांनी तिला हसत हसत उचललं. दाटून आलेला गहिवर मोठ्या कष्टाने त्यांनी आवरला. रावजीअप्पांच्या पुढ्यात तिला उतरवीत हैबतराव म्हणाले,

"अप्पा, पोरांना सांभाळा! तुमच्या हाती देतोय. तुम्हीच त्यांचं आईबाप. तुम्हीच त्यांचं सासूसासरं !"

"धनी, अगदी काळजी करू नका ! निर्धास्त जा !"

"होय होय अप्पा, तुम्ही त्यांना आईबापाहूनबी मायेचे आहात ! मला चिंता न्हाई. येतो आम्ही !"

झुंजारराव व हैबतराव निघाले. दीपाऊच्या कानाशी अप्पा काही तरी पुटपुटले. ती त्यांच्या मागोमाग पावलं टाकीत म्हणत होती,

"दाजी, आबा, येशवंत व्हा ! येशवंत व्हा ! येशवंत व्हा ! येशवंत व्हा ! येशवंत व्हा !......"

व्याही-व्याही अंगणात उतरले. एकदम शिंगाची ललकारी उठली. दोघांनी पोरांच्याकडे मायेने पाहिलं. त्यांनी घोड्यावर टांगा टाकल्या आणि लगाम खेचले. हैबतरावांनी एकदा वळून बघत मोठ्याने म्हटलं,

"दीपाऊऽऽ येतोऽ !"

घोडे दौडत सुटले. धूळ उसळली. काही क्षणांतच फौजा दिसेनाशा झाल्या.

समशेरगडाच्या टेहेळणी बुरुजावर सुलतानरावाशेजारी सुभेदार सलाबत उभा होता. जांभूळखोऱ्यातून पूर्वेकडे भरधाव सुटलेला धुळीचा लोट गडावरून दिसत होता. सुभेदाराने किंचित हसून सुलतानरावाकडे पाहिलं आणि त्या

धुळीकडे बोट केलं. सुलतानरावाने कृतज्ञतेने सुभेदाराला कुर्निसात केला.

* * *

रावजीअप्पांना स्वतःच्या संसाराकडे बघायला फारसा वेळही मिळत नव्हता. देशमुखीचा कारभार आणि हैबतरावांचा संसार तेच बघत होते. सर्जा आणि दीपा त्यांच्या भवतीभवतीच असत. सकाळी गड्याबरोबर सर्जा तालमीत जात असे. हत्यारांचे हात शिकत असे. घोड्यावरून रपेट करीत असे. दीपाऊही अप्पांच्या मागे हट्ट धरीत होती घोड्यावर बसण्याचा. अप्पा मग तिला घेऊन जात. सर्जा तर साऱ्याच बाबतीत चपळाईने तयार होत होता.

आठवडे उलटत होते. महिने उलटत होते. कधी तरी हैबतराव व झुंजारराव यांचं पत्र येत होतं. खुशाली समजत होती. स्वाऱ्यांत ते गुंतले होते. अप्पाही पत्र पाठवीत होते. खुशाली कळवीत होते. कर्नाटकाच्या व तेलंगणाच्या मुलखातील पाळेगार नायकांच्या बंदोबस्तात शाही फौजा गुंतल्या होत्या.

समशेरगडावर सुलतानरावाचा कारभार ताठ्यात होता. आता वारंवार अत्तरमहालात इष्क आणि शराब अम्मल गाजवीत होती. दौलू मधूनमधून गडावर येत होता. पागेतून हिंडत होता. जनावरांच्या तक्रारी हशमांकडून ऐकत होता. काहीतरी औषध देत होता. कधी गुण येई, कधी न येई. त्याच्या अंगावर आता भारी कपडे, चौकडे आणि बसायला उत्कृष्ट घोडे आले होते. त्याला आता काही कमी पडत नव्हतं. सुलतानराव पैशाची थैली हळूच काढून त्याच्या हाती द्यायचा. दौलू हळूच पुढं झुकून कानाशी पुटपुटायचा.

" धनी, त्या अमूक गावाच्या अमक्याची सून ! लई देखनी हाये ! ..."

" धनी, त्या तमक्या गावच्या तमक्याची लेक माहेराला आलीया. सुभेदार खूष व्हतील ! ......"

मग त्या पत्त्यावर रात्री–अपरात्री दरोडा पडलाच ! खून, कापाकाप, जाळपोळ, लूट अणि पळवापळवी ! बिनबोभाट !

सुलतानगडावर अरब, पठाण आणि सिद्दी हशमांचाच भरणा सर्वांत जास्त झालेला होता. बालेकिल्ल्यावर तर सारे तेच होते. बंदोबस्त चिरेबंदी होता. अत्तरमहालाभोवती कडक पहारे होते.

आणि मग मावळातल्या मुलींची बिनबोभाट रवानगी होत होती जंजिरेकर सिद्द्याच्या दंडाराजपुरीला. गुलामांची जहाजं सुटत. कधी दमास्कसकडे. कधी हबसाणाकडे. कधी मिसरकडे. कोण वाली ?

एक वर्ष भुर्रकन् उडालं.

अन् एके दिवशी खासा सुभेदार सलाबत समशेरगडावर आला. सुलतान-

राव दरवाजापर्यंत नेहमीप्रमाणे सामोरा गेला. त्याने सलाबतला कुर्निसात केला. सलाबतने कमरेच्या दुपट्ट्यात खोचलेली थैली काढली आणि सुलतान-रावाकडे भिरकावली. ती त्याने झेलली. अधीरतेने त्याने ती उघडली. त्यात बादशाहाचं फर्मान होतं. बादशाहाने मेहेरबान होऊन सुलतानरावाला मावळ-पट्टीची अमीनदारी बहाल केली होती. सुलतानराव ' अमीन ' झाला. आता जांभूळखोऱ्यावर त्याचा प्रत्यक्ष अधिकार सुरू होणार होता. आतापर्यंत तो फक्त समशेरगडचा गडकरी होता. आता तो अमीन झाला. हैबतरावांना आणि झुंजाररावांना आता त्याचे ' हुकूम ' मानावे लागणार होते. विशेष म्हणजे अमिनाचे दप्तर आणि कचेरीचे ठाणे समशेरगडावरच राहणार होते ! सुलतानरावाची ' सेवा ' सफल झाली होती !

ही बढतीची बातमी कावेरी–गोदावरीच्या मुलखात स्वाऱ्यांवर असलेल्या हैबतरावांना व झुंजाररावांना समजली. दोघांनाही बरं वाटलं. सुलतानराव हा एक लाख मोलाचा माणूस आहे, असं दोघांनाही मनापासून वाटत होतं.

दोघेही व्याही-व्याही मोहिमांत इतके गुंतले होते, की त्यांची घरी पाठवणी कधी होईल, हे सांगता येत नव्हतं. हैबतरावांची तर येळूरच्या किल्ल्यावर नेमणूक झाली होती. झुंजारराव छावणीत होते.

दिवस भराभरा उलटत होते.

साडेतीन वर्षं उलटली.

एके दिवशी समशेरगडावर अमीनसाहेब सुलतानराव यांना खबर आली, की दिल्लीचे मोंगल आणि आपले विजापूरकर बादशाह यांचा तह झाला आहे. मोंगलांशी असलेला तंटा मिटला आहे. विशेष म्हणजे सर्वच बादशाह्यांशी फटकून वागणारे आणि वेळप्रसंगी बंडाळीस कमी न करणारे पूर्वीचे निजामशाही सरदार शहाजी राजे भोसले आता विजापूर दरबारचे सरदार झाले आहेत. बारा हजारांची मनसब त्यांना बहाल झाली आहे आणि त्यांची रवानगी बादशाहांनी कर्नाटकात केली आहे–पण ही बातमी ऐकून सुलतानरावाला सुखही झालं नाही अन् दुःखही झालं नाही.

आठ दिवस उलटले आणि दौलूनं एक खबर आणली.

" धनी, त्या शहाजी भोसल्याची बायकू अन् पोरगा पुन्याला ऱ्हायला आल्याती. पुन्यातच ऱ्हानार हायेत म्हनं. दादाजी कोंडदेव कारभारी म्हनून संगती आलाय. "

ही बातमी ऐकून मात्र सुलतानराव जरा चमकला. कारण दादाजीपंत कसा तिखट कारभारी आहे, हे त्याला माहीत होतं. आता पुण्याच्या कर्यात मावळात काहीही गडबड करून चालणार नाही, हे त्याने ओळखलं. त्याने लगेच दौलूला म्हटलं,

" दौलतराव आता पुण्याच्या बाजूला जरा जपूनच! पचणार नाही ! "

--पुण्यात दादाजी कोंडदेव एका मेण्यासह दाखल झाले. घोडेस्वारांची व सांडणीस्वारांची तुकडी थांबली. मेणा उतरला गेला. मेण्यावरचा पडदा दूर सरकला आणि सकल सौभाग्यसंपन्न जिजाबाईसाहेब लहानग्या शिवबा-सह मेण्यातून बाहेर आल्या. पुण्याची ती भयंकर अवकळा त्यांना पाहवेना. जिकडे तिकडे निवडुंग, पडक्या व जळक्या घरांची खिंडारं आणि माजलेलं रान पाहून त्यांनी विचारलं,

" पंत, हेच पुणं का ? "

" होय राणीसाहेब ! बादशाहाच्या अम्मलदारांनी सहा वर्षांपूर्वी पुण्या-वरून गाढवांचा नांगर फिरवला. आगी घातल्या. कत्तली केल्या. त्यामुळं ही अवकळा आली ! "

" शिव शिव ! "

शिवबाराजे खिन्न नजरेने ती वाताहत बघत होते. जिजाबाईसाहेब काही वेळ तशाच उभ्या होत्या. त्यांच्या मस्तकात वादळ उठलं होतं. त्यांच्या मुद्रेवरचं औदासीन्य विरत विरत गेले. निर्धार आणि करार त्यांच्या डोळ्यांत तळपू लागला. त्या पंतांना म्हणाल्या,

" पंत, ह्या स्मशानाचंच नंदनवन फुलवून दाखवू आपण ! शिवबा, हे रूप तू बदलवून दाखव. अशी दैना केवळ पुण्याचीच झालेली नाही बाळा, अवघ्या मराठी मुलखाची अशीच दैना आहे. आजची मायबहीण उद्या कोणा सैता-नाची बटीक केली जाते आहे. देवळात देव टिकत नाही. कसा टिकावा ? आमच्या हृदयातच तो टिकत नाही तर – ! पंत, इथं देवदर्शन करूनच आपण मुक्कामाच्या घरात प्रवेश करू. "

" क्षमा असावी महाराज ! इथं देव आणि देवळं उद्ध्वस्त झाली आहेत. "

" शोध करा पंत ! देव सापडेल. आज देवदर्शन घेतल्याशिवाय अन्नग्रहण करणे नाही ! "

पंत देव शोधायला निघाले आणि पंतांना देव सापडला ! एका उघड्या


*With Best Compliments*

FROM

**SHRINIWAS INDUSTRIAL ENGINEERS**

*Dr. D'silva Road, Dadar,*

**BOMBAY-28**

बखळीत एका कोनाडचात मंगलमूर्ती गजाजन उन्हातान्हात बसले होते. पंत धाई घाई गेले. आईसाहेबांना घेऊन आले. त्या गवतासराटचांतच गणरायापुढं सर्वांची दंडवतं पडली. आईसाहेबांनी पदर पसरला. त्या म्हणाल्या,

" पंत, श्रीगजाननाचं देऊळ बांधा. "

* * *

दीपाऊ आता मोठी झाली होती. आता तिला समजू लागलं होतं. नवरा म्हणजे काय ! सर्जेराव आता उंचावला होता. काही एक न्याराच ढंग त्याच्या मुद्रेवर उमलला होता. आधीच मोठा खटचाळ. आता त्याच्या खटचाळपणाला नेमके अर्थ आणि हेतू होते.

रावजीअप्पा सर्जेरावाला देशमुखीच्या गावांना पाठवीत. कधी त्याच्या बरोबर जात. देशमुखीच्या कामकाजांची माहिती देत. तो कुठं गावाला जायला निघाला, की दीपा म्हणे,

" आम्ही यावं का संगं गावाला ? "

" तथं काय भाकऱ्या भाजायच्या हैत ! "

" थांब्रा वाईच ! दाजी घरी आलं म्हंजी सांगत्ये समदं. "

" समदं म्हंजी काय काय ? "

अन् मग मात्र दीपा विलक्षण लाजे. पळूनच जाई. हसण्याखेळण्यात दिवस भराभरा जात होते. सर्जेरावाच्या गोठचात गाईची एक सुरेख जोडी होती. दीपाचा त्या गाईंना फार लळा होता. त्यांच्या मुखी पहिला घास दिल्याखेरीज ती जेवत नसे. एकदा सर्जेरावाला कुरणगावला जायचं होतं. तो निघाला होता. हिची मात्र त्या गाईंची सेवाचाकरी चालली होती. शेवटी तो ओरडला,

" यवढी चाकरी ? हकडे नौरा ठनाना वराडतोय आन् बायकू तकडं गोठचात गायाबैलांची शेवा करतीया. दिवटे, तुला म्होरल्या जलमी बैलच नौरा मिळेल बग. "

" ह्या जल्मीच मिळ्ळ्या की या– "

तिकडे रावजीअप्पांना एकदम ठसका लागला ! अन् मग दोघंही लाजून जे पळाले ! अप्पांना मात्र हसू झाकता झाकवेना.

एके दिवशी अचानक सांडणीस्वार वाडचाशी आला. अप्पांनी पत्राची थैली घेतली. थैली हैबतरावांची होती. अप्पांनी वाचली आणि त्यांनी मोठचाने हाक मारली,

" दीपाबाई ऽ अहो दिपाऊसाहेब ! "

अप्पा पत्र घेऊन मधल्या चौकाच्या ओसरीकडे वळले. दीपा समोरून पदर सावरीत येतच होती. तिने उत्सुकतेने पुसले ! –

" जी अप्पा ! थैली कुनाची ? "

" अग तुझ्या दाजींची आणि आबांचीही ! मुली, अग येत्या गोरीगणपती-पर्यंत ते दोघेही घरी परत येताहेत. "

" खरं अप्पा ? "

" खरंच ! यंदा आनंदीआनंद पोरी तुझ्या सासरी-माहेरी ! "

दीपा आनंदानं हरकून गेली. ती एकदम धावत माघारी वळली. धावता धावता म्हणाली,

" थांबा अप्पा ! "

" अग सर्जेराव ना ? तो नाही घरी ! "

" जा बाई ! तुम्ही पन थट्टा करता ! "

ती पळत पळत देवघरात गेली. एक वाटी घेऊन परत आली. तिने अप्पांच्या हातावर खडीसाखर ठेवीत म्हटलं,

" तोंड गोड करा अप्पा ! "

सांडणीस्वाराचं पोट गोडघडाने टंच भरलं त्या दिवशी. वाड्यात काही न्यारंच चैतन्य उचंबळलं. ओचे खोवून दीपा साऱ्या कुळंबिणीच्या सांगाती वाडा आवरू-सावरू लागली. जणू तिची दिवाळी जवळ आली. सर्जेरावालाही आनंद झाला. दीपा त्याला म्हणाली,

" दाजी मला वळखतील का वं ? म्या केवढी मोठी झालेय. "

" न वळखाया काय झालं ? "

" स्वारीवर गेले तवा त्यांनी मला कडेवर उचलून घेतलं व्हतं. केवढीशी व्हते तवा मी. "

" मंग आता दाजी येत्याल तवा म्या तुला कडेवर घेऊनशानी जातो सामूरा, म्हंजी वळखतील ! "

" व्हय ! त्येवढं बळ हाये तुमच्या अंगी ! "

ती श्रावणाची पुनव होती. चार–दोन दोस्तांच्या संगतीने सर्जेराव रोहीड-खोऱ्यातल्या रायरेश्वराच्या दर्शनाला निघाला होता. घोडी अंगणात उभी होती. सर्जेराव निघाला, तेव्हा दीपा म्हणाली,

" माघारा लौकर यावा. लई रात नगा करू. "

" जी रानीसाहेब ! "

* * *

दौलू मुलतानरावाला खबर देत होता,

"धनी, हैबतराव आन् झुंजारराव गावाकडं माघारा यायला निघाल्याती, पर हैबतराव येकलंच म्होरं येत्याती. मिरजंपावतर आल्याती. गौरीगनपतीला घरला येत्याल."

"होय ? अन् झुंजारराव ?"

"त्ये मुधोळापासनंच फुटलं"

"फुटले ? फुटून निघाले ?"

"तसं नव्हं जी धनी. फुटून कसं निघत्याल. आता त्येंची फाटाफूट न्हाई व्हयाची. अक्षी येकजीव झाल्याती. फुटलं म्हजी इजापुराला येकलंच गेलं. बाच्छावाच्या पायाशी गेलंत झुंजारराव !"

"ते कशाला ?"

"त्ये न्हाई ठावं, पर कायसा अर्ज जातीनं कराया गेल्याती."

"कुणी सांगितलं तुला हे सारं ?"

"सासवडाला जगताप देसमुखाचा सांडणीस्वार भेटला व्हता. त्योबी मुधोळाकूनच आला. त्येची सांडण बीमार झाली, तवा आला व्हता माझ्याकडं !"

"अस्सं ! पुण्याकडची खबर ?"

"शहाजीराजांच्या पोराच्या नावानं समदा कारभार त्यो म्हातारा दादाजी बगतुया. त्या पोराची आई लई तिखट हाये धनी ! पुन्याच्या लालमहालामंदी तकडल्या मावळातली मानसं गोळा व्हत असत्यात. अक्षी बाच्छावानी अम्मल चाललाय, पर इजापूरच्या बाच्छावाचं नाव कुनी घेत न्हाई."

"अस्सं ! एकूण झुंजारराव विजापूरला गेलेत काय ?"

"जी व्हय !"

झुंजारराव विजापूरला गेले. हैबतराव मुधोळापासून थेट जांभूळखोऱ्याच्या रस्त्याला लागले. झुंजारराव विजापूरला गेले होते एकाच हेतूने. तो हेतू ते कुठेच बोलले नव्हते. तो हेतू मनात ठेवून ते गेले होते. ते जाताना एकापाशी ओझरतं म्हणाले,

"दरबारात जरा देसमुखीच्या वतनाबद्दलचं काम हाये."

इकडे हैबतराव चढत्या वेगाने गावाकडे येत होते. उत्सुकता उतू जात होती. आपली दीपा आता केवढी झाली असंल आणि सर्जेराव कसा दिसत असंल; गावाचं आणि देशमुखीचं रंगरूप कसं असंल, याचीच चित्रं रंगवीत ते दौडत होते. जांभूळखोरं जवळ येत होतं.

सर्जेराव रायरेश्वराहून वद्य प्रतिपदेच्या रात्री गावाकडे परतला, पण तो अगदी भारावला गेलेला होतो. मंत्र टाकावा तशी त्याची अवस्था झाली



**रायरेश्वरी रंगलेली स्वराज्याची स्वप्ने**

होती. त्याच्या डोळ्यांपुढं रात्रीचा तो सारा प्रसंग, सारी माणसं आणि सारं वातावरण उभं राहून होतं. तो काहीसा गंभीर झाला होता. त्याचं लक्ष समशेरगडाकडे जाताच त्याच्या कपाळाला आठी पडत होती. त्याला गडावर फडकत असलेला तो बादशाही झेंडा आता बघवत नव्हता. आजपर्यंत त्याच्या मनात असे विचार कधी आले नव्हते, आपण ह्या बादशाहाचे गुलाम, बंदी आहोत, असं त्याला कुणीच म्हटलं नव्हतं. रामाच्या अन् मारुतीच्या, भीमाच्या अन् कौरवांच्या कथा नव्या अर्थाने कुणीच सांगितल्या नव्हत्या. आपणच ह्या मुलखाचे मालक आहोत, असं त्याला कधीच वाटलं नव्हतं. उलट बादशाह म्हणजे मायबाप, अन्नदाता आणि आपण म्हणजे त्याच्या पायाचे दास, असंच दाजींच्या तोंडून त्याने ऐकलं होतं. त्याच्या काळजाचा त्या तेजस्वी शब्दांनी ठाव घेतला होता. ती तेजःपुंज मूर्ती पहिल्याच दर्शनाने त्याच्या काळजात जाऊन बसली होती. प्रत्येक व्यक्तीविषयी, प्रत्येक वस्तू-विषयी आता त्याच्या मनात वेगळेच विचार येऊ लागले होते.

सर्जेराव घरी आला. त्याच्या वागण्यात, हालचालीत पूर्वीचीच तडफ होती, पण बोलण्यात मात्र एकदम गांभीर्य आलं होतं. तो अप्पांशी रोज खूप बोलायचा, पण आज मोजकंच बोलला. रायरेश्वराच्या देवळात गर्दी

कशी होती, अमूक अन् तमूक. त्याने दीपेला सांगितलं, पण रायरेश्वरालगतच्या डोंगरातल्या गुहेत आपल्याला कुणी नेलं, तिथं कोण कोण होतं, काय काय झालं, कोण काय बोललं, हे मात्र त्यानं दीपाला सांगितलं नाही. दोन दिवसांनी पुन्हा जायचंय्, हेही तो बोलला नाही.

दोन दिवसांनी तो एका दोस्ताबरोबर रात्री निघाला. त्या दोस्ताचं नाव होतं येसाजी. तो रोहीडखोऱ्यातीलच होता. तो तर मुद्दाम सर्जेरावाला न्यायला आला होता. तो गुपचूप कळशाबाहेरच्या अमृतेश्वराच्या देवळात लपून राहिला होता. सर्जेराव आल्यावर तो देवळातून बाहेर पडला. आडबाजूला सोडलेल्या घोड्यावर तो स्वार झाला. दोघंही दौडत सुटले. सर्जेराव असा कुठं गेला आहे, हे फक्त दीपाला माहीत होतं, पण नेमकं कुठं, हे तिलाही माहीत नव्हतं.

सर्जेराव आणि येसाजी ऐन मध्यान रात्री रोहीडखोऱ्यातील त्या डोंगराच्या गुहेशी पोहोचले. बाहेरून तर ती गुहा दिसतही नव्हती. तिचं तोंड अरुंद होतं. तोंडाशी कारवीचं रान माजलेलं होतं. हे दोघंही आत गेले. पाच–सात तरुण मावळी पोरं बसली होती. हेही त्यांत सामील झाले. थोडा वेळ गेला आणि तो पाणीदार डोळ्यांचा तरुण तेथे आला. सर्वच चटकन् उठले. त्यांनी त्या तरुणाला मुजरे केले. तो बसला. सारेजण त्याच्या भवती बसले. तो बोलत होता. मावळपट्टीत आपले कोण, परके कोण, आडवं कोण येईल, मदतीला कोण येईल, याचा विचार सुरू होता. सर्जेरावाच्या डोक्यात वादळ उठलं होतं. आपले वडील काय करतील ? बादशाहाविरुद्ध बंड करायला ते ह्या जन्मी तरी तयार होतील का ? छे ! अशक्य !. बादशाहा म्हणजे त्यांना देव वाटतो. आपले सासरे झुंजाररावही अगदी तसेच. तो जरा खिन्न झाला. प्रसंगी प्राण द्यावा लागला तरी देऊन एखादं काम तडीला नेलं पाहिजे, असं त्या तरुणानं म्हणताच येसाजी चटकन् म्हणाला,

" शिवबा, तुम्ही सांगावं आन आम्ही करावं. तुमचा शब्द खाली पडायचा न्हाई ! "

येसाजीच्या ह्या बोलण्यानेच सारे थरारले. प्रत्येकाला वाटू लागलं, की आत्ता सांगा, आत्ता उडी घेतो !

बोलता बोलता रात्र संपली. बाहेर उजाडत चाललं. पूर्ण उजाडायच्या आतच सारे बाहेर पडले. आठा वाटांनी आठहीजण फुटले. इथं कुणी रात्रभर जमून खलबतं करीत होते, याचा मागसुद्धा कोणाला लागणे शक्य नव्हते.

★ ★ ★

दुपारी मध्यान्हीच्या सुमाराला सर्जेराव घरी आला. दीपाने त्याला विचारलं,

"कुठं जात असता रातीचं!"

आता काय सांगायचं? तो मोघमच म्हणाला,

"आपल्याच कामाला!"

"खरं?"

"दीपा, म्या तुला कंदी बी फसवणार न्हाई. माझ्यावर इस्वास हाये ना?"

"असलं कसलं पुसनं तुमचं? पर मन येडं असतं!"

"दीपा, तुझ्या गळ्याची आन; म्या आपल्या कामालाच जातो. देवा-धर्माचं, सर्वांच्या कोटकल्यानाचं काम!"

"म्हंजी?"

"आता इचारू नगस. येळ आली, की म्या समदं सांगेन! पर दीपा, कुटं काय बोलू नगस."

दीपाने मानेने नाही म्हटलं, पण तिच्या मनात चिंता आणि कुतूहल भरून गेलं.

भादव्याची आवस उलटली आणि दुसऱ्याच दिवशी सकाळी हैबतरावांचा स्वार आनंदाची बातमी सांगायला आघाडीला दौडत आला. बातमी होती, की दोन प्रहरांत हैबतराव येऊन दाखल होत आहेत.

दीपाने सारं घर लख्ख करून ठेवलं होतं. सडे रांगोळ्या तिने घातल्या. सर्जेराव आणि रावजीअप्पांचीही धांदल उडाली. दीपाला दोन प्रहर दोन वर्षांसारखे वाटत होते. अप्पा आणि सर्जेराव सांगाती स्वारशिपाई घेऊन हैबतरावांना सामोरे निघाले.

हैबतराव दौडत आले. अमृतेश्वरापाशी बापलेकांची भेट झाली. केवढा आनंद तो. अप्पांनाही हैबतराव भेटले. हसत-बोलत सर्वजण गावाकडे निघाले. दीर्घ काळानंतर आलेल्या हैबतरावांची नजर सर्व बाजूंना भिरभिरत होती. त्यांनी घोड्यावरून उतरताच सर्जेरावाला मिठी मारून पहिला प्रश्न विचारला होता—

"दीपा कशी आहे?"

हैबतराव घरी आले. दीपा दाराशी ओवाळायला उभी होती. मोठ्या झालेल्या आपल्या सुनेकडे ते आनंदाने बघतच राहिले. दीपाने त्यांना ओवाळले. तिने त्यांच्या पायावर ठोकं ठेवलं. सासऱ्याचा अन् सुनेचा कंठ दाटून आला. तिने मग पुसलं,

"आबा आले?"

"न्हाई! ते बाच्छावाच्या भेटीला गेल्याती."

"ते कशाला?"

" मला त्येनी सांगितलं न्हाई, पर येत्यालच. "

सणासारखा तो दिवस गाजला. नव्याने आणलेल्या साड्या दीपाला फार आवडल्या. देशमुखीचा सारा चोख आणि भरमराटीचा कारभार पाहून हैबतराव अप्पांवर फार फार खूष झाले.

दुसऱ्या दिवशी हैबतराव समशेरगडावर सुलतानरावाच्या भेटीसाठी गेले. त्याने त्यांचे स्वागत केलं. त्यात सुलतानराव एकदम आनंदित झालेला दाखवायचा, पण उगीचच एकदम खिन्न होऊन सुस्कारा टाकायचा. हैबतरावाबद्दल तो अतिशयच माया व कळकळ दाखवीत होता, पण झुंझाररावांचा उल्लेख आला, की स्वतःच्या चेहऱ्यावर गांभीर्य आणून सुस्कारा टाकायचा. हैबतरावांच्या नजरेतून ते सुटत नव्हतं. शेवटी तर म्हणाला,

" हैबतराव, गेले दोन महिने मला तुमची काळजी लागून राहिली होती. सुखरूप आलात आणि राम अयोध्येला आल्यासारखं वाटलं. "

" म्हंजी काळजी कशाची ? "

" आता कशाची ! काळ हा असा. कोण कुठं कसा वागेल, दगा करील याचा काय नेम ? "

" म्हंजी ? मला न्हाई उमगलं ! काय म्हनताय तुम्ही ? "

" कुठं काय ? काही नाही ! पण तुमच्याविषयीच्या मायेपोटी जीव तगमगतो. दुसरं काही नाही. "

हैबतरावांचं समाधान झालं नाही, पण जास्त त्यांनी हट्टही धरला नाही. हैबतराव झुंजाररावांचा उल्लेख करीत म्हणाले,

" आमचं झुंजारराव इजापुराला गेल्याती. "

" होय, समजलं मला ! "

" समजलं ? कुनी सांगितलं ? "

" हैबतराव, ही सरकारी कचेरी आहे. इथं बातम्या असतातच. "

गणगोताच्या गाठीभेटीत आठ दिवस उलटले. तेवढ्यात झुंजाररावही परतले. सावंगीला आनंद उसळला. ते दीपाला भेटायला आले. लेकीची अन् जावयाची भेट झाली. मुलांच्या थोरावलेल्या तबियती पाहून झुंजारराव सुखावले.

आणि एके दिवशी हैबतरावांच्या लक्षात आलं, की सर्जा रात्रीचा घरी नाही ! सकाळी त्यांनी दीपाला पुसलं. आता काय सांगायचं ? ती म्हणाली,

" आपल्याच देसमुखीच्या गावाला ग्येल्याती. " सर्जा आला. त्यांनी त्याला विचारलं. तो म्हणाला,

" दाजी, कसलाऽ वाघ ! "

" वाघ ? कुठं रं ? "

" नांदुर्खीच्या वाडीला ! तिकडं गेलो हुतो ! "

" व्हय? मारला का ? "

" न्हाई ! बकरं खाऊन निसटला ! "

सर्जा चक्क खोटं बोलत होता.

चार-आठ दिवस गेले. सर्जेरावाला पुण्याला जाणं जरूर होतं. लाल महालात सारी जमणार होती, पण आठ दिवस बाहेर जाणं पचावं कसं ? अन् आल्यापासून हैबतरावांचं त्याच्यामागं टुमणं लागलं होतं.

" सर्जा, आता तू मोटा झालास. ही देसमुखी तुला सांभाळायची हाये. देशमुखाहूनबी मोठा हो. सुभेदार हो. विजापुराला जानं-येनं, गाठीभेटी, नजर-नजरानं, स्वाऱ्या—मोहिमा करत जाया हव्या. मायबाप बाच्छाव आपल्या कुळावर लई लई माया करतात. वजीर बी लई चांगला मानस हाये. आता सरकार—दरबारी तुझा वग हवा. "

हे ऐकून सर्जेरावाचं डोकंच चढलं ! त्याला विजापूरला नव्हतं जायचं. पुण्याला जायचं होतं. तो म्हणाला,

" दाजी, जाईन की म्या, पर आता आधी अनेगावच्या पट्ट्यात चार दिवस जाऊनशानी येतो. मंग– "

" बरं जा. लौकर ये. "

" आठा दिसांत माघारा ! "

दुसऱ्याच दिवशी सर्जा निसटला. थेट पुणं गाठलं त्यानं.

—समशेरगडावर दौलू सुलतानरावाच्या कानाला लागला,

" धनी, ह्या दादाजी कोंडदेवाचं लक्षान धड न्हाई ! त्या शिवाजी भोसल्याच्या नावानं काय बी करतोय. पोराच्या नावाचा शिक्का—मोर्तबबी त्यानं केलाया ! येकांद्या राजावानी सनदापत्रं देतोया तो. बंडखोरांची औलाद हाये ती. हुशारीत ऱ्हावा धनी. तकडल्या मावळातलं सारं देसमुख-देशपांडं त्याच्या पायाशी एका निरोपानं जमा व्हत्यात. उंद्या हकडलं बी देसमुख हाजर व्हत्याल त्येच्या पायाशी ! "

*With Best Compliments*

FROM

**J. B. LALIT & Co.,**

*233-E, Govt. Gate, Parel,*

BOMBAY-12 Phone: 75021

सुलतानरावाने नुसतं 'हूं' केलं, पण हेच विचार त्याच्या डोक्यात केव्हापासूनच घोळत होते.

दुसऱ्याच दिवशी त्याला बातमी कळली, की कोकणातून फिरंग्यांकडून तीनशे बंदुका खरेदी करून, एक अधिकारी त्या बंदुका बैलांवर घालून विजापूरला नेत होता, पण शिरूरच्याजवळ कोणा दरोडेखोरांनी छापा घालून त्या सर्व कोऱ्या बंदुका पळवल्या ! सुलतानरावाला शंका आली शिवाजी भोसल्याची ! त्याला भय वाटू लागलं, की हे विषारी बेणं जांभूळखोऱ्यात आलं अन् पसरलं तर ? हे एकजीव होऊन भावाभावांसारखे वागणारे हैबतराव-झुंजारराव त्या भोसलेशाहीत सामील होतील ! ह्या दोघा हाडवैराची नातीगोती आपणच जुळवून दिली त्यावेळी. बेमालूमपणे पुन्हा वैर पेटवून दिलं, तर ते दोघं आपापसात झुंजत राहतील, तर मात्र जांभूळखोरं टिकेल ! हैबतराव येण्याच्या आधीच सुलतानरावाने सर्व योजना उत्तम प्रकारे तयार करून ठेवली होती. झुंजाररावांच्या नावाने बादशाहाला लिहिलेली बनावट पत्रे त्याने तयार केली होती. त्या पत्रांत हैबतरावांच्यावर अनेक भयंकर आरोप केलेले होते. हैबतरावांना उखडून काढण्यासाठी कारस्थानेही झुंजाररावांनी चालविली असल्याचा मजकूर त्या बनावट पत्रांत सुलतानरावाने घातला होता ! हा सारा बनावट बनाव सुलतानरावाने तयार केला होता. अगदी अशाच तऱ्हेची झुंजाररावांच्या विरुद्ध लिहिलेली, हैबतरावांच्या नावची पत्रे तयार करून ठेवली होती. आता हा दारूगोळा सुलतानराव ह्या दोन घराण्यांत विष कालवण्यासाठी वापरणार होता !

सुलतानरावाने लगेच दुसऱ्या दिवशी दुपारी आधी हैबतरावांना तातडीचा निरोप धाडला, की असाल तसे एकटे गडावर या !

हैबतराव ताबडतोब निघाले. ते निघताना दीपाला म्हणाले,

" दीपाऊ, जरा गडावर जाऊन येतो. "

हैबतराव गडावर आले. बालेकिल्यात सदरेवर सुलतानराव एकटा सचिंत बसला होता. हैबतराव येताना दिसताच तो उठून धावत गेला आणि त्याने हैबतरावांचे पाय धरले ! त्यांना याचा अर्थच समजेना. आपल्या बऱ्यासाठी झटणारा हा आपला वरिष्ठ अंमलदार एकदम पाय का धरतो आहे, हेच त्यांना समजेना. त्यांनी त्याला उठवीत उठवीत म्हटलं,

" सुलतानराव, उठा उठा, हे काय ! "

" हैबतराव, मला माफ करा. मी तुमचा फार मोठा गुन्हा केला आहे ! "

" म्हंजी ? "

" तुम्हाला खरं वाटणार नाही, तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवणार नाही, पण जे घडतंय ते भयंकर आहे ! "

" म्हंजी ? काय, झालं तरी काय ? "

" तुम्ही मोहिमेवरून परतल्यापासून सारखा विचार करतोय मी, बोलू की नको, बोलू की नको याचा ! एकदा वाटे बोलू नये, पण तुमच्याबद्दलची माया गप्प वसू देईना ! अखेर ठरवलं—!"

" बोला ना, बोला बोला सुलतानराव ! काय झालं तरी काय ? "

" बोलूच का ? "

" नका ताण देऊ ? जहर असलं तरी सांगा ! "

" जहरच आहे ! तुमच्यासारख्या सरळसीध्या सज्जनाशी ही दगेबाजी ? सांगायला शरम वाटते. "

" कोणी केली दगेबाजी ? "

" तुमच्या व्याह्याने ! झुंजारराव सरदेशमुखांनी !! "

" काय बोलताय तुम्ही ? "

" खरं तेच सांगतोय ! झुंजाररावांनी तुमचा सर्वनाश आणि स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी करू नये ते प्रकार त्यांनी तुमच्याविरुद्ध केले. तुमची सारी देशमुखी जप्त केली जावी, तुम्हाला कैद करण्यात यावं, यासाठी हे तुमचे व्याही विजापूरला बादशाहांना गुप्तपणे भेटून विनंती करायला गेले होते ! ती गोष्ट मला लगेच समजली होती. परंतु तुम्हाला कशी सांगावी, याच चिंतेत मी होतो. तुमच्या देशमुखीच्या गावावर त्यांचा डोळा आहे ! ती सारी जप्त करण्याची त्यांनी खाविंदांना विनंती केली होती ! "

" आ ? "

हैबतरावांना खरं वाटलं ! कारण झुंजारराव ज्या वेळी विजापूरला गेले, त्याचवेळी त्यांना अगदी ओझरतं समजलं, की काही तरी देशमुखी वतनासाठी हे विजापूरला जात आहेत ! दहादा विचारलं तर झुंजारराव म्हणत, " थोडंस हाये काम ! "

" आणि हैबतराव, काय सांगू, ह्या इसमाने तुमच्यावर ' तख्ताशी बेइमानी ' केल्याचा आरोप केला हो ! "

" मी बेइमान ? "

" होय, झुंजारराव म्हणतात हैबतराव बेइमान ! "

अन् लगेच, अगदी हलक्या आवाजात सुलतानरावाने विचारलं,

" हैबतराव, ' येळूरच्या किल्ल्याचा ताबा जर आम्हाला द्याल, तर रोख पन्नास हजार होन देऊ, ' असं तुम्हाला गोवळकोंडेकर कुतूबशहाने म्हटले होतं का ? काही गुप्त पत्र तुम्हाला आली होती का ? "

" आली व्हती ! पर म्या ती जाळून टाकली व्हती. मी फितुरी कशी करंन ? "

"पण हेरंबपट्टणचे ठाणे पैसे खाऊन तुम्ही सोडले हा आरोप खरा आहे का ?"

"न्हाई न्हाई ! ते ठाणं 'सोडून द्या,' असं फत्तेखानसाहेबांनीच मला कळवलं. पैसा कसा खाईन ?"

"नाही खाणार, पण ह्या माणसाला कुठंय् माणसाची किंमत ? त्याने बादशाहांना कळवलं, की हैबतराव पैसे खाऊन ठाणी सोडतात ? विश्वास बसणार नाही तुमचा ! हे बघा प्रत्यक्षच ते पत्र !"

आणि सुलतानरावाने एक पत्र गादीखालून काढून त्यांना दाखवलं. हैबतराव थक्कच झाले. विशेष म्हणजे येळूरच्या व हेरंबपट्टणच्या ठाण्याविषयीची हकीकत अगदी गुप्त असूनही बाहेर झुंजारावाला किंवा इथं सुलतानरावाला कशी कळली, हे हैबतरावांना समजेना.

स्वारीहून सावंगीला परतल्यावर, झुंजारावांनी हैबतरावाविरुद्ध बादशाहाकडे कशी पत्रे रवाना केली आणि त्या पत्रांत किती बदनामीकारक मजकूर आहे, हेही सुलतानरावाने हैबतरावांना तपशीलवार सांगितलं अन् शेवटी झुंजाररावांची ती पत्रेच त्याने गादीखालून काढून हैबतरावाना दाखविली !

हैबतरावांची आता मात्र खात्रीच झाली. त्यांच्या शिरा उडू लागल्या. डोळे लालावत चालले. सुलतानराव त्या आगीत तेल ओतीत होता. अनेक पुरावे देत होता. बारीकसारीक तपशिलासह पुरावे देत होता. त्यामुळे हैबतरावांना ते पटत होतं. सुलतानरावाचं बोलणं ऐकता ऐकता अखेर दात खाऊन हैबतराव म्हणाले,

"अखेर पिढ्यान्‌पिढ्याची दगाबाजी हा सैतान विसरला न्हाई येकून ! आमची देसमुखी बघवत न्हाई याला !"

"काय सांगू हैबतराव, त्या वेळी केवळ बादशहांच्या हट्टासाठी ह्या नादान माणसाची पोर तुमच्या घरात आणायला लावली मी ! हैबतराव, जपून असा. घरातच दगाफटका होईल हो !"

हैबतराव एकदम उठले. सुलतानराव लगेच म्हणाला,

"थांबा थांबा हैबतराव. रागाच्या भरात वेडंवाकडं काही करू नका ! झुंजाररावांच्या भेटीगाठी घेण्याच्या भानगडीत पडू नका ! दगा होईल ! जपा ! अगदी खरं अन् स्पष्ट बोलायचं म्हणजे तुम्ही ती त्यांची पोरगीही घरात ठेवू नका ! तिला सुखरूप परत माहेरी पाठवा. नसती विषाची परीक्षा आता तरी बघू नका !"

हैबतराव ताड ताड ताड बाहेर पडले. त्यांनी कळशाकडे घोडा पिटाळला. सूर्य मावळतीला ढळला होता. त्यांचा घोडा बेभान दौडत होता. ते रागानं धुंद झाले होते.



दैव फिरलं ?

ते कळशाला वाड्याशी आले. थडथडत त्यांचा घोडा थांबला. त्यांनी घोड्यावरून उडी टाकली आणि झप झप झप पावलं टाकीत ते ओटीच्या पायऱ्या चढत ओरडले,

" दीपे ऽऽऽ ! "

अशी हाक आजपर्यंत त्यांनी कधीच मारली नव्हती. ती भयंकर आवाजातील हाक आतून दीपेने ऐकली. ती तर दचकलीच. ती धावत बाहेर आली.

" काय दाजी ? "

" दीपे ऽ अवदसे– "

हैवतरावांनी तिला मनगटाला धरून उंबऱ्यातून खसकन् ओढलं ! ती भयंकर घाबरली. हैववरावाने कडाडकन् तिच्या मुस्कटात भडकावली. ती कळवळून ओरडली,

" दाजी ऽऽ दाजी ऽ ! "

" चालती हो माझ्या घरातून ! जा मर तुझ्या बापाच्या घरी ! हरामखोराची औलाद ! वैऱ्याची कारटी ! सापाची पोर घरात घेतली मी ! "

त्यांनी तिला तडातड लाथा घालण्यास सुरवात केली. सारे नोकर–चाकर लांब लांब घाबरून उभे होते. कुणालाच ह्या भयंकर प्रकाराचा अर्थ कळत

नव्हता. पुढं होऊन दीपावहिनीला सोडवायची एकाच्याही अंगी हिम्मत नव्हती. मोठं माणूस कोण असणार ? रावजीअप्पा होते ते परगावी गेले होते. सर्जेरावही आठ दिवसांनी परतणार होता. ती ओरडत होती,

" दाजी, दाजी, अहो मी काय केलं ? नका मारू ! कुठं चुकलं माझं ?"

" तुझं न्हाई चुकलं ! आमचंच चुकलं ! हो चालती बापाकडं ! कोन हाय रे तकडं ? अर्ज्या, सुभान्या, विठ्या, घेऊन जा हिला सावंगीला आत्ताच्या आत्ता. चला लौकर ! तिला वाड्याच्या दाराशी सोडा अन् तडक माघारा या. पायी न्या अवदसेला ! निघा आत्ताच्या आत्ता ! तू आमची कुनी नव्हंस ! सून नव्हंस !

दीपा टाहो फोडून रडत होती. विनवीत होती. पाया पडत होती. आर्जव करीत होती, पण सासरा एक शब्द ऐकत नव्हता. त्यांनी तिला फरफटत खाली अंगणात आणून टाकलं आणि ते ओरडले,

" आत्ताच्या आत्ता घेऊन जा तिला ! व्हा चालते !"

धाडकन् दार लावून घेऊन हैबतराव देवघरात गेले. देवापुढं गेले आणि देवाकडे बघत म्हणाले,

" शेन खाल्लं आम्ही ! वैऱ्याची पोर लक्षिमी म्हनून घरात घेतली. वैरी सापासारखा उलटला !"

गडीमाणसं इतकी घाबरली होती, की त्यांनी एकही अक्षर न बोलता दीपाला 'चला वहिनीबाई,' म्हणत बाहेर आणलं. नेहमी मेण्यातून जाणारी–येणारी दीपा पायीपायी निघाली. ती रडत होती. लाथा बसल्यामुळे तिला चालताही येत नव्हतं. एकदम वीज पडून दाणादाण उडावी, तशी तिची गत झाली होती. तेवढ्यात एका गड्याने पळत जाऊन स्वतःच्या घरचं घोडं आणलं. ती नको नको म्हणत होती, तरी तिला घोड्यावर बसवलं. सावंगीच्या रस्त्याला ते लागले. तिला या प्रकाराचा काहीच अर्थ लागत नव्हता. ती अशा सांजवेळी माहेरी हाकलली गेली होती.

याच वेळी सावंगीच्या वाड्यातून सुलतानराव बाहेर पडून गडाकडे दौडत गेला होता. सुलतानरावाचं बोलणं ऐकून झुंजारराव सुन्न झाले होते. हैबतराव गडातून बाहेर पडल्यावर लगेच स्वतः सुलतानराव सावंगीला आला. झुंजाररावांना तो एकांतात भेटला. म्हणाला,

" झुंजारराव, भारी भारी दुःख होतं ! तुमच्या सोन्यासारख्या पोरीचं मी नुकसान केलं. मी तुमची पोर त्या राक्षसाच्या तावडीत दिली !"

" अवं काय बोलताया ह्ये ! सुलतानराव, दहा लाखांत असं सासर गवसायचं न्हाई. सोन्याच्या देवघरातली लक्षिमी सोभतीय माझी दीपा."

" नाही झुंजारराव, पुन्हा आग उसळलीय् हैबतरावांच्या काळजात. तुमची

सारी देशमुखी खलास करून आपल्याला द्या, असे अर्ज केले आहेत त्यांनी. तुमच्यावर नाही नाही ते आरोप केले आहेत त्यांनी. तुमच्या घरादाराचा, बायकापोरांचा सत्यानाश केल्याशिवाय त्यांचा आत्मा थंड नाही होणार. त्यांनी तुमच्याविरुद्ध दरबारकडे पाठवलेली पत्रं वाटेतच सुभेदाराने थांबवली. ही, ही ती पत्रं."

रुमाल उलगडीत सुलतानरावाने त्यातील पत्रं बाहेर काढीत त्यांना दाखविली. झुंजारराव सुन्न झाले. हे अचानक एकाएकी काय झालं, हे त्यांना समजेना. हे जर सारं खरं असेल, तर दीपाचं काय, असा प्रश्न त्यांच्या डोळ्यांपुढं आला. ते म्हणाले,

"दैवच फिरलं असंल तर कोन काय करनार? पर हैबतराव आमचं व्याही हैत. माझी पोर नांदतीय तथं. म्या कंदीबी त्येंच्याशी वैर करनार न्हाई. त्यानला काय हवं? आमची मुंडकी? - तोडा म्हनावं अन् जा घेऊनशानी! म्या आत्ता जातो त्येंच्याकडं आन् पदर पसरतो–"

"नको नको झुंजारराव! हा वेडेपणा करू नका. तुमच्या पोराबाळांसाठी तरी असा अविचार करू नका! नक्की मारले जाल. आपण बघू पुढंमागं बोलणी करून. आत्ता ते धगधगले आहेत. तुम्ही जवळही जाऊ नका! मी बोलेन त्यांच्याशी. पण मला एक गोष्ट सांगा झुंजारराव, तुम्ही विजापूरला कशाला गेला होता?"

"अवो, दीपा माझी लेक. तिच्या लग्नात तिची कायबी हौसमौज झाली न्हाई. साडीचोळी झाली न्हाई. तवा एकच विच्छा हाये, की आमच्या देसमुखीच्या मिळकतीपैकी दहा गावं सर्जेरावाच्या नावाने करून घ्यावीत, आमची दहा गावं त्यांच्या नावावर फिरवावीत आणि बाच्छावाची नवी सनद करून घ्यावी, असा मनसुबा मनी धरून गेलो व्हतो. म्हनलं, औंदाच्या दिवाळीपावतर दरबारच्या सनदा येत्याल अन् त्या मंग सर्जेरावाला द्याव्यात. त्याला शेला–पागोटं बांधावं......"

झुंजाररावांचा विजापूरला जाण्यात हा हेतू होता, हे समजताच सुलतानराव जरा चमकलाच. दोन घराण्यांत आग धुमसत राहिली पाहिज, ती विझता कामा नये, हा त्याचा संकल्प होता. त्या संकल्पाला ही झुंजाररावांची उदार वृत्ती बाधकच ठरेल अन् जर आपला खोटेपणा आणि आगलावेपणा उघडकीस आला, तर ही घराणी पुन्हा एक तर होतीलच, पण आपली मात्र गडावर राहण्याची हिम्मतच उरणार नाही, हे तो ओळखून होता. आता एकच दक्षता घेणं त्याला आवश्यक होतं. ती म्हणजे ह्या दोघा व्याह्याव्याह्यांची भेट होता कामा नये. झुंजाररावांचं प्रामाणिक मन हैबतरावला कळता कामा नये, म्हणूनच तो आग्रह करीत होता.



## सासर – माहेर ?

" झुंजारराव, सध्या तुम्ही स्वतः हैबतरावांना भेटायला जाणं म्हणजे आगीत उडी घेणं आहे ! नका जाऊ !"

आपण खेळत असलेला हा डाव घडपणे तडीला कसा जाईल, याच चिंतेत तो होता. म्हणूनच तो आगीत तेल ओतायचा सतत प्रयत्न करीत होता. परस्पर घराण्यात समजुती बोलणी होण्यापेक्षा घातपात होत राहावेत, हीच त्याची इच्छा व योजना होती.

सुलतानराव गडाकडे परतला. सुलतानराव नको म्हणाला, तरीही आपण हैबतरावांना भेटायला जावं, असं झुंजाररावांना वाटत होतं. सांज टळली होती. अंधार वाढत होता. ते आपल्या सदरेवर चितामग्न बसले होते. गोजाक्का आणि चंद्राक्का चारदा येऊन विचारून गेल्या, की कशाची एवढी चिंता धरलीया ! काय सांगायचं ? काही नाही, कसली नाही, हेच त्यांचं उत्तर होतं.

ते विचार करीत बसले होते, की असं आमच्याविरुद्ध एकदम राग धरण्यासारखं हैबतरावांचं आम्ही काय वाकडं केलं ?––अन् नेमका असाच विचार करीत हैबतराव आपल्या सदरेवर बसले होते !

पाऊण–एक तास गेला अन् वाड्याच्या दरवाजावर काही गलबल ऐकू आली. झुंजारराव उठले. तेवढ्यात दरवाजातून हाक उठली,

"आबा ऽ! आई ऽ! आत्या ऽ!"

आवाज दीपाऊचा होता. ती ढसढसून रडत होती. झुंजारराव धावतच अंगणात गेले. तिला अशा कातरवेळी रडत येताना पाहून त्यांचं काळीज चरकलं. ते धावले. तुळशीपाशी तिने त्यांना मिठीच मारली. ती रडत होती.

"दीपा, काय झालं ग पोरी? अशी कशी आलीस तू ह्या वख्ताला?"

"आबा, म–मला दाजींनी मारलं! लई मारलं!"

"मारलं? का, का मारलं? काय चुकलं तुझ्या हातून?"

"काय बी न्हाई! बाहेरून घरी आले ते रागे रागे आले. मला बाहेर ओढलं आन् लाथाबुक्क्या घालून म्हनाले, वैऱ्याची पोर, सापाची पोर, हो चालती तुझ्या बाच्या घरी! तू आमची सून नव्हंस! मर तिकडं, असं म्हनत म्हनत मारून काढलं मला. लई संतापल्याती दाजी. माझं काय बी चुकलं न्हाई आबा!"

दीपा ढसढसून रडत होती. आई आणि आत्या आल्या. त्यांनी तिला पोटाशी धरलं. तिची कहाणी ऐकून त्याही रडू लागल्या. झुंजाररावांची खात्री झाली, की सुलतानरावाने सांगितलं तेच तंतोतंत खरं. ते दीपाच्या पाठीवरून हात फिरवीत होते. आई आणि आत्या दीपाला घरात नेऊ लागल्या, तेव्हा झुंजारराव एकदम म्हणाले,

"थांब दीपा–आक्का, तिला घरात नेऊ नका."

"आन् मग रं आबा?"

"तिला हळदकुकू लावा अन् करा पाठवनी सासरला!"

"आरं असं कसं? पोरीचा जीव––"

"न्हाई आक्का, तिला तिच्या घरला जाऊ दे! दीपा, माझ्या बाळा, जा, तुझ्या घरला तू जा!"

चंद्राक्कानं तिला हळदकुंकू लावलं. झुंजारराव म्हणाले,

"दीपा, पोरी तुझ्या वरातीच्या येळी म्या तुला सांगितलं त्ये इसरू नगस. तू आद्गूगर सून हायेस हिम्मतबहाद्द्रांची, मंग लेक हायेस झुंजाररावाची! तुझ्या घरची तू लक्षिमी झाली हायेस. आता जगायचं, मरायचं ते हिम्मतबहाद्द्रांच्या इभ्रतीसाठी, कीर्तीसाठी. ह्ये तुझं माहेर आता एखाद्या सनासुदीला. इथं तुझा मान माहेरवासनीचा. पर मानाची लक्षिमी हायेस त्या घरची. त्या घराचं कल्यान चिंतायचं. तथंच मरायचं वरं पोरी. जा, तुझ्या हक्काच्या घरी नांद! मारलं, हानलं तरीबी नांदायचं!"

झुंजाररावांचा गळा दाटून आला. दीपा नमस्कारला वाकली. तिनं त्यांच्या पावलांना हात लावून नमस्कार केला. दीपाबरोबर आलेले गडी दारापासूनच परत गेले होते. झुंजाररावांनी आपल्या गड्यांना मेणा तयार करण्यास

सांगितला.

मेण्यात दीपा बसली, निघाली. माहेरवाशीण सासरी निघाली, झपझप झपझप मेणा निघाला.

मेणा कळशाला वाड्याच्या दरवाजात आला. दरवाजा बंद होता. ती उतरली. मारामुळं पाऊल टाकवत नव्हतं. गड्यांनी तलवारीच्या मुठी दरवाजावर आपटल्या. आतून विचारणा झाली,

"कोन हाये ?"

"आम्ही ! दरवाजा उघडा !"

सदरेवर हैबतराव जागे होते, ते कमालीचे भडकले होते. त्यांच्या डोक्यात एकच सवाल नाचत होता, ह्या झुंजाररावानं दगाबाजी आमच्याशी का म्हनून करावी ?

दरवाजा वाजताच ते स्वत: उठले. भराभर आले. दरवाजाची दिंडी उघडली होती. दीपा वाकून दिंडीतून आत पाऊल टाकत होती. तेवढ्यात हैबतराव आले. दीपाला पाहून त्यांचं मस्तक भडकलं. त्यांनी तिच्या छातीवर लाथ हाणली. तशीच मागच्या मागे दीपा पडली. रडू लागली. तिने केविलवाणी हाक मारली,

"दाजी ऽ !"

"मर ! कशाला आलीस ? हो चालती !"

"कुठं जाऊ ? हेच माझं घर ! दहा गावांच्या साक्षीनं मी तुमची सून झाले. आता माझं जगनं—मरनं हतंच !"

मेणा घेऊन गडी माघारी निघून गेले होते. हैबतरावांनी दिंडी बंद केली, पण ते थबकले. बाहेर दाराशी डोकं टेकून दीपा रडत होती. म्हणत होती,

"दाजी, मला घरात घ्या !"

ते आत उभे होते. आपण जरी 'आपली ही सून नाही' म्हटलं, तरी जग हिला हिम्मतबहाद्दरांची सूनच म्हणणार आहे. हिला घरात घेतलंच पाहिजे. घराण्याची अब्रू हिच्याशी निगडीत आहे, निरुपाय आहे. मरेपर्यंत हिला घरात राहू देणं भाग आहे ! कारण ही लग्नाची आहे, हा विचार डोक्यात आला आणि त्यांनी दरवाजा उघडला. त्यांनी तिचा हात धरून आत ओढलं अन् म्हणाले,

"मर तिकडं गोठ्यात !"

खरोखरच दीपा गोठ्यात गेली. तिच्या त्या दोन लाडक्या गायी हंबरत कान टवकारीत होत्या. वाड्यावरची गडीमाणसं जागच्या जागी चिप्प उभी होती. झुंजाररावांवरचा राग आता ते दीपेवर काढीत होते. उद्यापासून तो झुंजाररावांवरही निघणार होता.

साऱ्या गावात ही वार्ता पसरली. सारे हळहळू लागले. आता पूर्वीसारख्या जाळपोळी, खून, लुटालूट पुन्हा उसळणार, हेही दिसू लागलं.

दीपा दुसऱ्या दिवशी सकाळी घरात आली. वावरू लागली. सासऱ्याने चार तडाखे दिलेच. गुन्हा काय ? गुन्हा काही नाही. गुन्हा तिच्या बापाचा होता म्हणे ! हैबतरावांचा नोकरचाकरांना हुकूम सुटला, की तिच्याशी कुणी बोलू नका !

दोन दिवसांत पोरीचं रूप उतरलं. सासूरवास सुरू झाला. हैबतरावांच्या डोक्यात चक्रं फिरू लागली– झुंजाररावांचा सूड घेण्याची !

* * *

चार दिवस लोटले. परगावी गेलेले रावजीअप्पा परतले. त्यांना सारं समजलं. ते तडक वाड्यावर आले. आत गेले. भिंतीशी अंधारात दीपा बसली होती. पोर सुकली होती. अप्पांना पाहताच ती रडायला लागली. अप्पांनी तिच्या पाठीवरून हात फिरवला.

" अप्पा ऽ ! "

बाहेरून दरडावणी उठली. ते बाहेर आले. हैबतराव उग्रट सुरात म्हणाले,

" अप्पा, वैऱ्यांनी पुन्हा दावा मांडलाय ! नातीगोती संपलीत ! "

" कोण वैरी धनी ? "

" वेड पांघरू नका ! तुम्हाला सारं कळलेलं हाये. "

" वेड नाही ! पण झुंजाररावच ना ? "

" हां हां, त्योच हरामखोर ! "

दीपेच्या कानांवर निखारे पडत होते. ती उठून मागल्या चौकात गेली.

" धनी, झुंजारराव वैरी ? काय केलं त्यांनी ? कोणती हरामखोरी ? "

" त्यांच्या पापांची यादी देऊ ? "

" धनी, क्षमा करा, पण ही यादी आपणाला कुणी ...... ? "

" दहा पिढ्यांपासून यादी तयारच हाये ! भरच पडतीया ! पण झुंजाररावांनी दावेदारी मांडलीय. "

" धनी, आपण खातरी करून घेतली का ? "

" सुभेदार सलाबत रेहान, अमीन सुलतानराव यांच्या साक्षी खोट्या ? "

" तसं नाही धनी ! व्याहयांशी समक्ष बोलून जाब विचारला तर— "

" बस्स् ! आमची खातरी झालीया ! आता जाब पुसायचाय् तलवारीनं ! "

" तरी पण मी एकदा सावंगीला जाऊन येऊ का ? "

" जावा ! पर मग माघारी नका येऊ ! तकडंच ऱ्हावा ! "

अप्पा गप्पच झाले. आता काय बोलणार ?

" ह्यो हरामखोर झुंजारराव आमच्या नावानं दरबाराला तक्रारी लिहितोय ! पत्रं आम्ही ह्या डोळ्यांनी पाहिली. जातीने इजापुरास गेला. आमची देसमुखी बुडवायला टपलाय ! "

" धनी, तरीही मी म्हणतो, की आपण झुंजाररावांशी समोरासमोर बोलू ! "

" चोर समुरासमूर समदं खरं खरंच सांगील व्हय ? अप्पा, अमीन् आन् सुभेदार सवता गडावरल्या पिरावरली फुलं उचलून सांगत्यात त्ये खोटं ? "

" मग झुंजाररावांनाही देवावरली तुळशी-बेल आपण उचलायला सांगू ! "

" अप्पा, इमान शाबूत असंल तर आमच्या रेघेबाहीर जाऊ नका ! अन् जर जायचं असंल, तर ही निरोपाची पानसुपारी ! "

" नाही धनी, रेघेबाहेर जाणार नाही. ही माझी आठवी पिढी तुमच्या अन्नावर जगतीय. आता म्हातारपणी अवज्ञेचा डाग नसावा. आज्ञेबाहेर नाही सेवक. "

हैबतरावांनी त्याच रात्री पाचपन्नास स्वार घेऊन नारंदी ओलांडली, पण झुंजाररावांच्या फिरत्या स्वारांची मोठी थोरली टोळी चालून येताच हैबतरावांची टोळी माघारी फिरली. पळून आली ! तो राग निघाला दीपावरती !

चार दिवस उलटले. सर्जेराव घरी आला. हे सारं विचित्र दृश्य त्याला दिसलं. दीपाची ती गत पाहून त्याला अतोनात वाईट वाटलं, पण हैबतरावांच्या देखत तिच्याशी अक्षरही बोलण्याची त्याची हिम्मत नव्हती. संध्याकाळच्या अंधारात तो दीपेच्या जवळ गेला. तिच्या पाठीवर हात फिरवीत तो म्हणाला,

" दीपा, दाजींचा हट्टीपना तुला ठावा हाये. चार दीस निमूट सोस. मी फार मोठं काम करतोय देवाधर्माचं. भवानी आई येश देईल. समदं चांगलं हुईल. "

" तुमी काय बी काळजी करू नगा. मी सुखात हाये. "

दीपाने डोळे पुसले. तिने सर्जाकडे पाहिले. त्या नजरेत तिच्या काळजातले सारे भाव एकवटले होते.

हैबतरावांच्या जाचात दीपा दिवस काढीत होती. हैबतरावांच्या मनात जबर आकांक्षा ठाण मांडून बसल्या होत्या. झुंजाररावांच्या घरादाराची होळी पेटवायची ! सावंगीत घुसून झुंजाररावांची दाणादाण उडवायची ! ह्या आकांक्षांच्या पूर्तीसाठी काय करू अन् काय नको, असं त्यांना झालं होतं. त्यांचा स्वभाव चिडका झाला होता. एवढ्या तेवढ्या कारणावरून ते संतापत

होते. सर्जाला त्यांनी सावंगीस न जाण्याबद्दल बजावलं.

पुण्याच्या बाजूला शहाजीराजांचा मुलगा, बायको आणि दिवाण कारभारी हे काही तरी वेगळाच घाट घालीत आहेत, असं हैबतरावांच्या कानांवर आलं होतं. ते ऐकूनहि त्यांना संताप आला होता. बादशाहाच्या खाल्लेल्या अन्नाशी निमकहरामी करणारे हे लोक तोफेच्या तोंडी जातील, असे ते उद्‌गार काढीत होते. त्यांच्या मनात दोन विचार प्रभावाने उसळत होते. त्यांतील एक असा—आपल्या सर्जेरावाला हे असलं भोसल्यांसारखं विश्वासघाताचं आणि स्वामिद्रोहाचं वारं लागायच्या आतच विजापूरला बादशाहाच्या पदरी रुजू करायचं आणि त्याचं दुसरं लग्न लौकरात लौकर लावायचं. त्यांचा सर्जावर फार मोठा विश्वास होता. माझा मुलगा माझ्या डोळ्यांच्या धाकात आहे, याचा त्यांना फार आनंद आणि अभिमान वाटत होता. पण चिरंजीव रात्रीअपरात्री त्याच शिवाजीराजे भोसल्यांच्या टोळीत सामील झालेला आहे, याचा पत्ता नव्हता.

एके दिवशी बादशाहाकडून अचानक मानाची भरजरी वस्त्रे, मोत्याची कंठी व एक हजार होनांची थैली आली. तेलंगणात केलेल्या कामगिरीचा हा गौरव होता. सोबत एक पत्रही होतं. बादशाहाने लिहिलं होतं, की तुमच्या सरकारचाकरीचा हा गौरव पाठवीत आहोत. स्वीकार व्हावा. तुमच्याविषयी कोणी कितीही गैरसमजाचे लिहिले, तरी दरबाराचा गैरसमज होणार नाही. तुमच्या पुत्रास दरबारास पाठविणे.

झुंजाररावांनी केलेल्या कागाळ्यांचा उल्लेख अप्रत्यक्षपणे बादशाहांनी केलेला हैबतरावांनी रावजीअप्पांना वाचून दाखविला.

हैबतरावांना बळ आलं. बादशाही मानमरातब आला. त्यांनी ठरवलं, की सर्जाला विजापुरास दरबारात चाकरीसाठी पाठवायचं. त्यांनी सर्जेरावाला तो बोलून दाखवला. त्याने लगेच मोठ्या हिरीरीने 'हो हो' म्हणून तयारी दाखवली, पण मनातून मात्र तो नाराज होता.

झुंजाररावांचा काटा काढायचं त्यांच्या मनात होतंच. ते तयारी करीत होते. सर्जेराव देशमुखीच्या निरनिराळ्या गावांतली निरनिराळी कामं सांगून निसटत होता आणि पुण्याला जात होता! बापाला वाटत होतं, माझा पोरगा काय हुशार! कष्टाळू! स्वत: होऊन कारभारात लक्ष घालतोय. घरात दीपाचे हाल चालूच होते. मधूनमधून मारही बसत होता.

विजापूरला जाण्याची भानगड गळ्यात येत आहे, तरी आता काय करावं, हे विचारायला तो पुण्याला तिसरेच निमित्त सांगून गेला.

हैबतरावांनी त्याच रात्री दोनशे स्वारांची टोळी झुंजाररावांच्या मुलखावर सोडली, पण व्यर्थ! सारेच मार खाऊन परतले! झुंजाररावांच्या

सतत सावध असलेल्या स्वारांनी हा हल्ला परतवला. त्यांनी असा निर्धार केला होता, की हैबतरावांच्या गावांवर हल्ले करायचे नाहीत. ते आपले आहेत, पण त्यांचे हल्ले नारंदीच्या अलीकडे आपल्या गावांवर आले, तर ते मोडून काढायचे.

असे लागोपाठ पाचही दिवशी केलेले हल्ले झुंजाररावांनी मोडून पिटाळले. हैबतरावांचं सैन्य जास्त असूनही त्याला नारंदी कधीच ओलांडता आली नाही.

हैबतरावांनी आतापर्यंत सात–आठ वेळा हल्ले केले, पण प्रत्येक वेळी मारच बसला! नारंदी ओलांडता आली नाही, तर झुंजाररावांचा वाडा गाठून जाळणं कुणीकडं? प्रत्येक पराभव त्यांना उरी झोंबत होता. ह्या पराभवाचं उट्ट दीपेवर निघत होतं. बिचारी मार खात होती. अर्धपोटी राहत होती. अप्पांना ते पाहवत नव्हतं, पण धन्याच्या स्वभावापुढं इलाज नव्हता. ते चोरून–मारून येत. दीपाच्या पाठीवर हात ठेवीत अन् म्हणत,

"बाळ, यातूनही वाट निघेल. देव झोपलेला नसतो."

अप्पांच्या हातात एवढंच अन् तेही चोरून–मारून बोलण्याचंच बळ होतं, पण तेवढ्या ओलाव्यावरच ती काळ कंठीत होती. आपल्या नवऱ्याचाही आपल्यावर फार फार जीव आहे, या जाणिवेने या यातनांतही गोड संवेदना तिला सुखवीत होत्या.

सर्जेराव पुण्याहून पहाटेच्या अंधारात परतला. सर्जेरावाला आलेल्या विजापूर–दरबाराच्या निमंत्रणाचं काय करायचं, याचा खल लाल महालात झाला. त्यात ठरलं, की सर्जेरावानं विजापूरला जरूर जरूर जावं. दरबाराची जितकी बारीक माहिती मिळविता येईल, तितकी मिळवावी आणि एक महिन्याने परत यावे. तेवढाच अनुभव व माहिती पदरी पडेल.

सर्जेराव कळशाला आला. त्याने स्वत: होऊन हैबतरावांना म्हटलं,

"दाजी, मला दरबारात बाच्छावानं बोलविलं हाये ना! मंग कवा जायचं म्या?"

पोराचं वळण पाहून हैबतरावांना बरं वाटलं. ते म्हणाले,

"सर्जा, दरबारात जायचं म्हंजी रीतरिवाज ठाऊक व्हाया हवंत. म्या सुलतानरावाशी बोललोय. तू चार दीस गडावर न्हा. सुलतानराव समदं सांगतील, शिकवतील. आजच जा."

तेही सर्जाला नकोसं वाटलं नाही. तो जेवून समशेरगडावर गेला. सुलतान-रावाला भेटला. सर्जाने त्याला झुकून मुजरा केला. त्याने हसून त्याला म्हटलं,

"या या सर्जेराव!"

चार गोष्टी औरसचौरस झाल्या आणि सुलतानरावाने दरबारी रीत-रिवाजांचे गोडवे गायला सुरवात केली. सर्जारावाचं लक्ष त्याच्या बोलण्यापेक्षा अवतीभवती फिरत होतं. गडावर रात्री सर्जाचा मुक्काम होता. सदरेवरच तोंडावरून पटका घेऊन सर्जा झोपला. तिथं फक्त एकच समई तेवत होती. पलीकडेच गादीवर सुलतानराव झोपला होता. सर्जाला अजीबात झोप नव्हती, पण तो उगीचच झोपेचं सोंग करून हळूहळू घोरत होता !

थोडा वेळ गेला आणि सुलतानराव हळूच उठून बसला. तो कुणाची तरी वाट बघत असावा. थोड्याच वेळात एक सावली सदरेवर पडली. आवाज उमटत नव्हता. सर्जा घोरत होता. सुलतानराव हळूच उठला. त्या सावलीच्या मागोमाग तो शेजारच्या दालनात गेला. हे सर्जाने पाहिलं. तोही हळूच उठला आणि लपत–छपत भिंतीच्या कडेकडेने तो त्यांच्या मागोमाग गेला. शेजारच्या दालनात पूर्ण अंधार होता. सुलतानराव थांबला होता. तो कोणाशी तरी बोलत होता.

"काय खबर ?"

"धनी, तुम्ही हैबतराव आणि झुंजारराव यांच्यात लावून दिलेलं भांडण जोरात पेटलंय बघा ! आजच्या मध्यान्हीला बघा लईच भडका व्हनार हाये !"

"अस्सं ?"

"व्याही–व्याही झुंजत्यात, पर त्या पोरीचं हाल फुकटच हायेत !"

"कोणती रे पोरगी ?"

"दीपाबाई ! त्या आस्वलाची सून !"

"नशीब एकेकाचं !"

"पर धनी, पोरगी दिसायला कशी हाये बगा ! आक्षी चांदणी ! जंजिऱ्याला धाडली तर हजार होनाला विकली जाईल."

"वेडा का काय तू दौलू ? अरे जमंल तिथं छापा टाकावा. अन् येड्या, तिचा नवरा तिकडं सदरवेर झोपलाय ! घोरतोय !"

हे सारं सर्जाबा ऐकत होता. त्याच्या अंगाची लाही लाही होत होती अन् याच सुलतानरावाला हैबतराव देवमाणूस समजत होते. ही भांडणं याच माणसाने पेटवली, हे सर्जाने ऐकलं, पण त्यावेळी काहीही करणं शक्य नव्हतं. सर्जा झटकन् तेथून निसटला आणि आपल्या जागेवर जाऊन झोपला.

—त्याच रात्री हैबतरावांनी झुंजाररावांच्या मुलखावर जबर हल्ला चढवला. कोणालाही पत्ता लागू न देता, मशाली न घेता, सुमारे चारशे पायदळानिशी हैवतराव कूसगावच्या दाट रानात घुसण्यासाठी नारंदीत उतरले. तेथून सावंगी पाच कोसांवर होती. सावंगीचेच जाळूनपोळून पार तळपट

करावयाचे त्यांनी ठरविले होते. नारंदी ओलांडली.

कूसगावच्या दाट रानात शिरले आणि अर्ध्या तासात लढाईला एकदम तोंड लागलं! भयंकर कल्लोळ उडाला. जवळजवळ एक हजार स्वारांनी कूसगावचं रान वेढलं! त्या गराडचात हैबतरावांचं पायदळ सापडलं. जबर तडाखे बसू लागले. जवळजवळ दीडशे माणसं झुंजाररावांनी कैद केली. जखमी तर जवळजवळ प्रत्येकजण झाला. मेलीसुद्धा बारा–तेरा. खुद्द हैबतरावही कैद होण्याच्या बेतात होते. मोठ्या मुश्किलीने सुटले. उरले सुरले पळून गेले! हैबतराव पळाले!

हैबतराव घरी आले, तेव्हा ओळखू येत नव्हते. सारे कपडे फाटून गेले होते. ते चिडले होते. त्यांनी आरडाओरडा करून सारा वाडा दणाणून सोडला. आता सारी धार दीपेवर धरली जाणार होती. ते खरोखरच दीपेकडे वळले. त्यांनी तिला दंडाला धरून ओढीत एका अंधाऱ्या खोलीत नेलं. मारलं. नंतर बाहेरून दार लावून कुलूप ठोकलं.

हैबतरावांना रात्रभर झोप लागली नाही. प्रत्येक वेळी इतकी तयारी करूनही मार बसला. फजिती झाली. दुसऱ्या दिवशी ते अप्पांना म्हणाले,

"अप्पा, त्या झुंजाररावाचं शीर उडाल्याशिवाय हा दावा संपायचा न्हाई!"

"पण धनी, त्या पोरीचा काय दोष?"

"बोलू नका! वैरीण आहे ती! तिला तिच्या घरी हाकललं तर रातो-रात आली माघारी. म्हनं इथंच मरायचं! मरायचंय तर मर!"

––गडावर सर्जा मुद्दाम अज्ञान पांघरून राहिला होता. जितकी जास्तीत जास्त एकेक गोष्ट कळेल, तितकी तो मिळवीत, साठवीत होता. दरबारी रिवाजांचे धडे त्याला मिळत होते.

चार दिवसांनी तो घरी आला. पाहतो तो दीपा कोंडलेली! त्याला असह्य झालं ते; पण सारा राग त्याने झाकून ठेवला. हैबतराव शेजारच्या वाडीवर गेले होते. खोलीच्या किल्ल्या त्यांच्यापाशी असत. सर्जेराव त्या अंधाऱ्या खोलीच्या खिडकीशी आला. त्याने हळूच हाक मारली,

"दीपा!"

दीपा जमिनीवर पडली होती. तिचं सारं अंग ठणकत होतं. हाक ऐकताच ती अधीरतेने उठली. खिडकीशी आली. गजातून हात घालून सर्जाने तिच्या डोक्यावरून हात फिरविला. पदर फाटला होता. त्यातून केस बाहेर आले होते. तिने सर्जाच्या तळहातात आपलं तोंड झाकलं.

"दीपा –"

सर्जाचे तळवे आसवांनी भिजले.



कोंडमारा

" दीपा, तू आन् मी दोघंबी कैदीच झालोत. तू आत हायेस. मी बाहीर हाये. कोंडमारा दोघांचाबी ! पर दीपा, थोडं दीस थांब. ह्या हालातून तुला कायमचं सोडवतो. महाराजांनी ठरवलंय् – "

" कोन महाराज– ? "

" कुनाला सांगू नगस – काळजात ठीव ! "

" माझ्याशी येतंयच कोन बोलाया ! '

सर्जाने लालमहातली सारी स्वप्नं तिला सांगितली. ती भारावली. आनंदली. सारं दुःख विसरली. तिला सर्जाबाविषयी अभिमान वाटू लागला.

तेवढ्यात दाजींचा आवाज ऐकू आला. सर्जा तेथून निघून गेला. हैवतराव अंगणात पत्र वाचीत उभे होते. एक स्वार थैली घेऊन आला होता. सर्जाला बघताच हसून त्यांनी म्हटलं,

" सर्जा, कवा आलास गडावरून ? आरं आपली मंजी येतीय माहेरपनाला म्होरल्या पंधरावड्यात ! "

" खरंच ? "

" ही काय थैली ! "

हैवतरावांची मंजुळा नावाची पुतणी लांब तिकडे बंकापुरास सासरी होती. ती येणार म्हणून तिच्या सासरचं पत्र आलं होतं. फार वर्षांनी येत होती ती.

" तवर म्या इजापुरास्नं जाऊन येतो की ! "

" जा ! तयारी कर ! "



आधार

पण गडावरच्या मुक्कामात लक्षात आलेलं सुलतानरावाचं स्वरूप एकदा लालमहालात महाराजांना कळवावंच, असं त्याला फार वाटत होतं. हा सुलतानराव आपल्याच लोकांच्या घरच्या मुलीबाळी पळवून आणून गुलामांच्या व्यापाऱ्यांना विकतो, हे जर आताच हैबतरावांना सांगितलं तर — त्यांना खरंही वाटणार नाही. उलट डाव मात्र मोडेल. सर्जाने पुण्याला जायचं ठरवलं. नाव विजापूरचं, तयारी पुण्याची !

दोन माहीतगार व अत्यंत विश्वासू स्वार घेऊन सर्जाबा निघाला. दीपेच्या खिडकीशी तो डोकावून गेला.

हैबतराव जेवले आणि नांदुरखीच्या वाडीला गेले. तिथं काही तंटेबखेडे होते. जाताना दीपेच्या खोलीच्या किल्ल्या अप्पांच्या हाती देत हैबतराव म्हणाले,

" जे उरलं आसंल, त्ये तिला खायाला घाला. म्या सांजला परततो. "

हैबतराव गेले. अप्पांनी दीपाच्या खोलीचं कुलूप काढलं. कडी वाजताच ती दचकली. तिला वाटलं, दाजी आले ! पण दिसले अप्पा. त्यांनी जेवायचं ताट आणलं होतं. दीपा उद्गारली,

" अप्पा ! "

ती जमिनीवर बसलेली होती. उन्हाचा एक कवडासा तिच्याजवळ पडलेला होता. अप्पा जवळ गेले. तिच्या पाठीवर हात ठेवीत ते बसत बसत म्हणाले,

"बाळ, घे खाऊन!"

, "पोट भरलं आप्पा!"

अप्पांनी तिची समजूत करीत करीत तिचा हात आपल्या हातात घेतला. उन्हाचा कवडासा तिच्या तळहातावर आला. अप्पा हसले आणि तिच्या तळव्याकडे बघत म्हणाले,

"दीपे, भाग्यवान आहेस!"

ती खिन्नपणे हसली. तिने मूठ वळली. अप्पा म्हणाले,

"ह्या झाकल्या मुठीत सव्वा लाख आहेत!"

"अप्पा, तुम्ही जेवलात?"

"नाही! तू घे जेऊन!"

आपण जेवल्याशिवाय अप्पा जेवायला घरी जात नाहीत, हे तिला माहीत होतं. ती जेवली. अप्पा बोलत होते. जेवण झाल्यावर दीपेच्या खोलीला कुलूप घालताना त्यांचं मन पिळवटून निघत होतं.

* * *

हैबतरावांच्या सदरेवर त्यांची चार–सहा पदरची माणसं बोलत बसली होती. हैबतराव उद्वेगाने बोलत होते. पलीकडे अप्पा हिशोब लिहीत होते. पराभव कसा झाला, हाच हैबतरावांचा विषय होता. ते बोलत होते,

"इकती भरवशाची पटाईत मर्द नेऊनबी मार आम्हीच खातोय! पळून येतोय! तो झुंजाररावच शेर झालाया! समजंना मला, की कमी तरी काय पडतंय? आन कुठं पडतंय? आं?"

कुणी काहीच बोलेना, पण अप्पांच्या डोक्यात एकदम सणक उठली. ते घारेत म्हणाले,

"धनी, कसं यश मिळंल तुम्हाला?"

"आं? का वो अप्पा?"

"धनी, पुण्य कमी पडतंय! शाप, तळतळाट भोवतोय तुम्हाला!"

"शाप? तळतळाट? आन त्यो व कुनाचा?"

"तुमच्या घरच्या लक्षिमीचा! घरातली लक्ष्मी कोंडून ठेवलीत. तिला मारहाण करता. शिळंपाक खायला घालता. तिच्या अंगावर धड साडीचोळी नाही. तिच्या आत्म्याचा शाप भोवतोय तुम्हाला!"

"अप्पा ऽऽ!"



**कोंडवाडा संपण्यापूर्वी...**

हैबतराव भडकले. क्षणभर थांबले. लगेच उठले. आत निघाले. दणादणा पावलं वाजू लागली. ते ओरडले,

" अप्पा ! शाप—तळतळाट ! "

त्यांनी भराभरा दीपेच्या खोलीचं कुलूप काढलं. आत दीपा घाबरून बघत होती. त्यांनी तिच्या हाताला धरून बाहेर ओढत आणलं. ती अशक्त पोर, तिला झोकांडी मिळून ती भिंतीशी जाऊन पडली. जवळच कपडचालत्यांचा मोठ्ठा पेटारा होता. त्याचं झाकण हैबतरावांनी दण्णकन् उघडलं. आत जरीचे, रेशमी कपडे होते. दोन्ही हातांनी हाताला येतील ते कपडे काढीत अन् दीपेच्या अंगावर भिरकावीत ते ओरडत होते,

" तळतळाट ! अप्पा, नेस म्हणावं नेस ! "

हा एवढा ढीग दीपेच्या भवती उभा झाला. कपडे फेकीत ते पुटपुटत होते. पेटाऱ्याचं झाकण धाडकन् लावून ते लगेच बाहेर निघून गेले.

अप्पांनी दीपाला उठवलं. म्हणाले,

" पोरी, कोंडवाडा संपला ! "

——सर्जा पुण्यात होता. हैबतराव समजत होते, तो विजापुरात आहे ! अन् पुण्यात असं ठरलं होतं, की आणखी काही दिवस सर्जाने इकडंच असावं. सर्जाने लालमहालातल्या खलबतात समशेरगडावरची सारी हकीकत सांगितली. शिवबाला चीड आली. तो म्हणाला,

"तान्हाजी, जंजिऱ्याकडे घाटातून जाणाऱ्या लोकांवर गुप्तपणे पाळत ठेवा."

—दिवस उलटत होते. दीपेचं रूप पालटू लागलं. ती घरात वावरू लागली. सर्वांशी बोलू शकू लागली. वाड्यातली माणसं आनंदित झाली, पण हैबतराव मात्र तिच्याशी एका अक्षरानेही बोलत नव्हते. तिच्याकडे बघत-सुद्धा नव्हते. एकेक दिवस उलटत होता.

—गडावर सुलतानरावाच्या कानाशी दौलू बातमी सांगत होता,

"धनी, रहीमतपुराकडून एक मेना जांभूळखोऱ्याकडं आज सांजला येनार हाये. मेण्यात नाजूक कबूतर हाये. सुभेदार खूष होत्याल!"

"शाबास! कोण आहे मेण्यात?"

"नावगाव समजलं न्हाई!"

सुलतानरावाने लगेच आपले खास अरब हशम बोलावले. ते आले. कुर्निसात करून उभे राहिले. सुलतानराव दौलूला म्हणाला,

"दौलू, यांच्याबरोबर जा! पाळत ठेव. नेमका मेणा दाखव. तू मेण्या-बरोबर गडावर येऊ नको. हे मेणा घेऊन येतील. तू निघून जा!"

दौलू पुढं आणि शंभर पावलांचं अंतर राखून मागोमाग पंधरा-सोळा अरब-स्वार निघाले.

कऱ्हेरखिंडीत झाडाझुडपांत अरब आणि दौलू दबा धरून बसले. तासा-मागून तास जात होते. अखेर एक मेणा आणि आठदहा स्वार येताना दिसू लागले. मेणा ऐन खिंडीत आला आणि लपलेले अरब एकदम तुटून पडले. कल्लोळ उडाला. तलवारी खणाणू लागल्या. मेणा टाकून भोई पळाले, पण सारे कापले गेले. मेण्यातून किंकाळ्या उठत होत्या. मेण्याबरोबरचे झाडून सारे कापले गेले. मेण्यात दोन तरुण मुली होत्या. एक दासी दिसत होती. दुसरी मालकीण. मालकीण दिसायला सुरेखच होती.

अरबांनी दोघींनाही बाहेर काढलं. दोघी घाबरलेल्या होत्या. रडत होत्या. अरबांनी एकदम त्या दासीच्या पोटात तलवार खुपसली. किंकाळी फुटली. लगेच मृत्यू! भोयांनी दासीचं प्रेत मेण्यात ठेवलं आणि मेणा पेटवून दिला. भराभरा अवतीभवती पडलेली वाळकी लाकडं थोडी गोळा केली. मेण्यावर टाकली. ती तरुणी अतोनात आक्रोश करीत होती. अरबांनी तिच्या तोंडात बोळा घातला. हातपाय बांधले. वर बुरखा घातला. उचलली. घोड्यावर घातली. घोडे पिटाळले. दौलू आनंदित झाला होता. तो झपाट्याने दुसरा रस्ता धरीत होता.

—वालेकिल्ल्यावर रात्रीच्या अंधारात अरब दाखल झाले. त्यांनी ती मुलगी अत्तरमहालात आणली. ती बेशुद्ध झाली होती. तिला पाहताच

सुलतानराव चमकला. त्याने तिला ओळखलं. ती होती मंजुळा! हैबतरावांची पुतणी! तो क्षणभर गोंधळूनच गेला. आता? आता हिला ठार तरी मारलं पाहिजे; नाही तर गुलामांच्या व्यापाऱ्यांना तरी हिला दिलं पाहिजे. सुभेदाराकडे पाठवलं तर आज ना उद्या बोभाटा होईल. काय करावं ते त्याला समजेना. अखेर कडक बंदोबस्तात लौकरात लौकर हिला जंजिऱ्यास गुलामांच्या व्यापाऱ्याकडे रवाना करावं, म्हणजे चिंता नाही. दौलूने ही भलतीच शिकार दिली. तेवढ्यात त्याची नकळत टाळी वाजली. त्याला कल्पना सुचली. मंजुळेला कडक बंदोबस्तात बालेकिल्ल्यावर ठेवून तो चटकन् खलबतखान्यापाशी आला. त्याने एका विश्वासू अरबाबरोबर चिठ्ठी दिली व हैबतरावाकडे पिटाळले. चिठ्ठीत लिहिलं होतं, की गडावर ताबडतोब भेटायला या.

—घाईघाईने हैबतराव गडावर आले. खलबतखान्यात दु:खी चेहरा करून बसलेला सुलतानराव, हैबतराव येताच त्यांना मिठी मारून म्हणाला,

"घात झाला हैबतराव! तुमच्यावर दुर्दैवाने आणखी एक घाव घातला!"

"काय झालं?"

"कसं सांगू? तुमची मंजुळा माहेरी येणार होती ना? आता ती येणार नाही! ती येऊ नये हीच परमेश्वराची योजना असावी!"

"म्हंजी? का? काय झालं?"

"झुंजाररावांनी पाळत राखून कन्हेरखिंडीत रात्रीच तिला ठार केलं! मेण्यासकट पेटवून दिलं. इतर दहा माणसंही कापून काढली! पण ही बातमी मी दिली असं सांगू नका!"

हैबतरावांच्या अंगाचा भडका उडला. त्यांचे ओठ थरथरू लागले. त्यांच्या तोंडून शब्दच फुटेना. ते तसेच माघारा फिरले.

कन्हेरखिंडीत पडलेल्या प्रेतांची हैबतरावांनी विल्हेवाट लावली. मेणा जळून गेला होता. त्यातील प्रेतही न ओळखण्याइतकं जळालं होतं. त्याचे त्यांनी दहन केलं.

आधीच संतापलेल्या हैबतरावांच्या मस्तकात वणवा धगधगत होता. मंजुळेला सर्वांसकट झुंजाररावांनी मारलं, असा बोभाटा झाला. झुंजाररावांनाही कळलं. त्यांनी कपाळाला हात लावला.

ही बातमी पुण्यात सर्वांना समजली. सर्जेरावलाही समजली. तो पुटपुटला,

"असं कधी व्हयाचंच न्हाई! ही कायतरी दुसऱ्याचीच करनी हाये!"

सर्जा विचार करीत होता.

झुंझाररावांनी ताडलं, की आता खवळलेले हैबतराव सूडाला पेटणार!

त्यांनी आपल्या गावाशिवारांच्या रक्षणासाठी झाडून सारी मावळी माणसं उभी केली. गावं सावध ठेवली. दीड हजार मावळा तयार ठेवला.

हैबतरावांची तयारी चाललीच होती. त्यांनी गुप्तपणे ठिकठिकाणच्या आपल्या शिलेदारांना अमूक दिवशी तयार राहण्याचे इशारे पाठविले.

पुण्यात सर्जेराव बेचैन होता. तो लालमहालातून ' चार दिवसांत येतो, ' म्हणून सांगून निघाला. त्याने आपल्या बरोबरच्या दोघा जिवलग शिलेदारांनाही घेतलं. त्याच्या मनात धागेदोरे त्याने बरोबर लावले होते. मंजुळेच्या घातपाताची खरी बातमी एकाच माणसापाशी मिळेल. त्याच माणसाला गाठलं पाहिजे.

सर्जेरावाने रात्रीच समशेरगडाच्या दक्षिणेस असलेल्या जंगलात मुक्काम केला. कळवे घालून घोडी चरायला सोडली आणि गडाच्या पायथ्याशी तो दोघा साथीदारांसह पाळतीवर राहिला. चार-तास ते बसले होते. अखेर ते निराश झाले. इथं शिकार सापत नाही, म्हणून ते उठणार, इतक्यात पावलं वाजली. हे दबले. एक आकृती गडावरून उतरत होती. ती आकृती जवळ आली. सर्जाने ओळखलं की हाच ! सर्जाने घोंगडी सावरली. ती आकृती जवळ आली आणि सर्जाने आपली घोंगडी एकदम त्या आकृतीवर घालून तिचे तोंड दाबले. इतर दोघांनी हातपाय धरले. तिघांनीही उचलबांगडी केली आणि आणलं रानात.

घोंगडं काढलं. तो पकडलेला माणूस ओरडू लागला. दोघांनी धरलं होतं. सर्जाने चूड पेटवली. उजेडात चेहरा दिसला. तो होता दौलू !

सर्जाने त्याला मंजुळेचा ठावठिकाणा विचारला. तेव्हा त्याने साफ सांगितलं, मला काहीही माहीत नाही म्हणून ! पण पेटलेल्या चुडीचे चटके आणि आसुडाचे फटके मिळू लागताच सारं रामायण त्याने घडाघडा सांगायला सुरवात केली. मंजुळा गडावरती अत्तर महालात अरबांच्या पहाऱ्यात आहे, हे समजलं.

आसुडाच्या एकेका फटकाऱ्याने सुलतानरावाची, सुभेदार सिद्दी सलाबतची आणि खुद्द दौलूची सारी इतर पापं दौलूच्या तोंडून बाहेर पडली. दौलची पाठ सोलपटून निघाली. डोळे वटारीत सर्जाने दौलूला विचारलं,

" दौल्या, जगायचंय का मरायचंय ? "

" मायबाप, पाया पडतो ! "

तलवार म्यानातून काढीत सर्जाने विचारले,

" दौल्या, खरं सांग, न्हाई तर हात तोडीन. मंजुळेला कुठं ठिवायचं ठरवलंय सुलतान्यानं ? "

" सरकार, तुमच्या पायाशपथ खरं सांगतो. परवाच्या दिशी दसरा हाये.

दसऱ्याच्या दिशी दुपारी सुलतानराव मंजुळाला मेन्यात घालून जंजिऱ्याला पाठीवनार हाये."

"जंजिऱ्याला ? त्ये कशाला ?"

"गुलामांच्या दलालाशी आज सौदा झालाया. जंजिऱ्याला न्यायासाठी दलाल गडावर ऱ्हायलाय. तिला न्यायाचं आन तथं व्यापाऱ्यांना इकायचं."

"इकायचं ? भईन इकायची अक्कल सुचली ?"

संतापाच्या भरात सर्जाने दौल्याच्या पेकाटात इतकी भयंकर जोरात लाथ घातली, की त्याला ओरडवेनासुद्धा. तो आडवा पडला. खाली दगडावर त्याच्या कमरेला असलेलं काही जड जड वाजलं. सर्जाने ते ओढलं. ती थैली होती. त्यात सोन्याचे होन होते ! सर्जाने विचारलं,

"दौल्या, कुठून आनलंस हे सोनं ?"

"सरकार माझ्या वाटयाचं पैसं दलालानं मला दिलं, त्ये हायेत !"

आपल्या बहिणीच्या विक्रीचे हे धन आहे, ही कल्पनाच त्याला सहन होईना. त्याला असं वाटलं, की याचं मुंडकंच तोडावं ! मोठ्या प्रयत्नाने त्याने तलवार आवरली, पण आसुडाचे तडाखे मात्र त्याने त्याला लगावले.

"दौल्या, याद राख ! जर गडावरून मंजुळेचा मेना दसऱ्याला दुपारी उतरला न्हाई, तर तुझ्या खांडूळचा करंन बघ !"

"न-न-न्हाई जी. दसऱ्याला दुपारी मेना उतरंल !"

अनेक घरच्या लेकीसुना अशा पळवून आणून विकायचा सुलतानरावाचा धंदा असून, सुभेदाराकडेही त्याने आतापर्यंत लई पोरी धाडल्याचं दौल्याने सांगितलं. ही भयंकर पापं करणारा सुलतानराव जरब दाखवून आणि भुरळ घालून जांभूळखोऱ्यावर अम्मल गाजवीत होता.

सर्जेराव समशेरगडावर होता, तेव्हा त्याने दौलूचं आणि सुलतानरावाचं बोलणं चोरून ऐकलं होतं. तेव्हा याच दौल्याने सुलतानरावाला म्हटलं होतं, की दीपाबाई दिसायला चांदणीसारखी आहे. विकली तर हजार होनाला विकली जाईल ! ते सर्जेरावाच्या चांगलंच ध्यानात होतं. आता तर प्रत्यक्ष त्याची चुलत बहीणच विक्रीला निघाली होती. तो संतापला होता, पण साऱ्या गोष्टींची तड अगदी पक्क्या डावाने करायचं त्याने ठरवलं.

परवाच्या दिवशी दसरा होता. एक सबंध दिवस मध्ये जायचा होता. तोपर्यंत सारा डाव साधायचा होता. सर्जाने थोडा वेळ विचार केला. लगेच त्याने चुटकी वाजवली. त्याने दौलूला म्हटलं,

"चल रे !"

अन् आपल्या जोडीदाराला सर्जेराव म्हणाला,

"ह्या दौल्याला ह्याच जंगलातल्या म्हसोबाच्या देवळात ठेवू. उद्याचा

दीस तसाच देवळात ह्याला डांबून ठेवू. तू याच्यावर पहारा ठीव. मी गडाच्या वाटेवर गस्त घालतो. न्हाई तर गडावरून मंजुळेला उंद्याच तो हरामखोर घेऊन जाईल ! "

ठरलं. दौल्याला धड उभंसुद्धा राहवत नव्हतं, तरीही त्याला त्यांनी जंगलात दूरवर नेलं. खूप घनदाट झाडीत एक खोपटासारखं देऊळ होतं. आत अंधार होता. दौल्याला तिथं त्यांनी बसवलं. त्याच्या पहाऱ्यावर एकजण बसला.

सर्जेराव लगेच गडाच्या पायथ्याशी आला. त्याने दूर झाडीत घोडा बांधून ठेवला आणि एका झाडावर चढला. एका फांदीवर बसून तो गडाच्या वाटेवर पाळत धरून बसला. सारी रात्र उलटली. दिवस उगवला तो झाडावरून उतरला. त्याने घोड्याच्या पायांत कळवा घातला. त्याला चरायला सोडलं. अन् पुन्हा स्वतः दबून-लपून तो पाळतीवर बसला.

तिकडे म्हसोबाच्या देवळात दौल्या नशिबाला हात लावून बसला होता. सारं अंग ठणकत होतं. त्याच्या पहाऱ्यावरचा सर्जेरावाचा दोस्त समोरच ठाण मांडून बसला होता. घोडं बाहेर चरत होतं. त्या दोस्ताच्या पाठीशी भाकर–कांदा बांधलेला होता. तो त्याने दुपारी खाल्ला.

तो दिवस मावळला. रात्र झाली. सर्जेराव तसाच उपाशी पाळत करीत होता. साऱ्या दिवसात गडावरून खाली व खालून वर अनेक अरब व पठाण इसम ये-जा करीत असताना दिसले, पण मेणा किंवा डोली अजीवात दिसली नाही. मध्यरात्रीपर्यंत सर्जेराव तसाच पाळत करीत होता.

मध्यरात्र उलटली. सर्जेरावाने लगेच आपल्या घोड्यावर टांग टाकली व म्हसोबाच्या रानाकडे घोडा फेकला. तिथं दौलू मरगळून बसला होता. त्याच्या समोर सर्जेरावाचा सौंगडी बसला होता. सर्जेराव आल्याबरोबर तो उभा राहिला. सर्जेराव त्याला म्हणाला,

" उचल त्या दौल्याला अन् दे माझ्या पुढ्यात घोड्यावर ! "

दौलूला मारामुळे आणि भुकेमुळे खरोखरच उभे राहवत नव्हते. सर्जेरावाने त्याला घोड्यावर पुढ्यात आडवे घेतले. साथीदारही आपल्या घोड्यावर बसला. सर्जेरावानं घोड्याला टाच मारीत म्हटलं,

" चला ! "

घोडे निघाले. सर्जेरावाने घोडा सावंगीच्या रस्त्याला वळवला. रात्र चढत होती.

सावंगीत चिप्प शांतता होती. मारुतीच्या देवळात दिवा जळत होता. कुठं कुठं कुत्री वेटोळी घालून बसली होती, ती चाहूल लागून उठत होती. भुंकत होती. झुंजाररावाच्या वाड्यापाशी पहारा होता. दरवाजा बंद होता.

सर्जेराव वाड्याशी आला. घोडे थांबले. लगेच पहारेकरी हत्यारे सावरीत पुढं धावले. त्यांनी पुसलं,

" कोन हाये ? "

सर्जेरावाने एका पहारेकऱ्याला जवळ बोलावलं. तो आला. सर्जेरावाने त्याच्या कानात काही तरी सांगितलं. लगेच तो पहारेवाला मावळा दरवाजाशी गेला. काहीसा कुजबुजला. काही वेळ गेला आणि एकदम दरवाजा उघडला गेला. झुंजारराव दरवाजात उभे होते.

सर्जेराव पुढं गेला. त्याने झटकन् पुढं होऊन झुंजाररावांच्या पावलांना हात लावला व नमस्कार केला. उद्गारला,

" मामासाहेब–"

" यावं यावं सर्जेराव ! "

सर्जेरावाने आपल्या दोस्ताला खूण केली. झुंजाररावाच्या मागोमाग सर्जेराव वाड्यात गेला. ओटीवर गेला. झुंजारराव जरा वळले अन् म्हणाले,

" सर्जेराव, आमच्या व्याह्यांनी आमच्याशी वैर मांडलं. आमची बेअब्रू मांडली– "

" मामासाहेब, त्याच पायी म्या इकल्या राती आलो. दाजींच्या मनात इखार घालणारा खाटिक येगळाच हाये. त्यानंच समदा नास केला. "

" कोन ? "

" त्यो गडावरला सुलतानराव ! "

" न्हाई न्हाई जावई ! असं कसं व्हईल ? सुलतानरावाचा काय बी गुन्हा न्हाई. "

" न्हाई मामासाहेब, समदं सांगतो म्या. हा हाये साख्शीला ! आनरं त्या दौल्याला. "

झुंजारराव बघतच राहिले. सर्जेरावाने सारा इतिहास सांगितला. सुलतानराव आणि दौल्याचे सारे धंदे दौल्याच्याच तोंडून वदवले. मंजुळेला दगा करून ठार मारण्याचा आरोप हैबतराव झुंजाररावांवर घेत होते. त्यामुळे तर झुंजारराव अतोनात दुःखी झाले होते. त्यांना भय वाटत होतं, की बदला म्हणून हैबतराव दीपेला ठार मारतील की काय ! पण दौल्याच्या तोंडून जेव्हा मंजुळेची हकीकत झुंजाररावांनी ऐकला, तेव्हा मात्र ते थक्कच झाले. त्यांनी न कळत गडाकडे संतापलेल्या नजरेने पाहिलं. मंजुळा जिवंत आहे, हे ऐकून त्यांना आनंद झाला. ते म्हणाले,

" सर्जेराव, मला ठावा न्हवतं, ह्यो सुलतानराव असला उलट्या काळजाचा असंल. मंजुळाला गडात कोंडलंय काय त्येनं ? "

" जी मामासाहेब, उद्याच दसऱ्याच्या दिशी मंजुळेला मेन्यात घालूनशान

तिला जंजिऱ्याला रवाना करनार हाये ! ”

“ व्हय ? ”

“ जी ! ”

“ दावतोच त्येला ! ”

आणि मग सारी रात्र सासरेजावई एकांतात सारा डाव आखण्यात दंग झाले.

* * *

समशेरगडावरती बालेकिल्ल्यातल्या अत्तरमहालात मंजुळेला ठेवलेलं होतं. सबंध बालेकिल्ल्यावर अरब आणि पठाण यांच्याशिवाय इतर हशम नव्हते. नाही म्हणायला बालेकिल्ल्याच्या दरवाजावर इतर हशम असत, पण तेही एकूण एक हबशी होते. खुद्द अत्तरमहालाला अरबांचा गराडा होता. महालाच्या जाळीदार झरोक्यातून तिला दूरवर असलेलं कळसा गाव दिसत होतं. तिला पकडून गडावर आणलं, तेव्हा ती बेशुद्धच होती. शुद्धीवर आली तेव्हा तिला एकदम भवताली तीन-चार हबशी बायका दिसल्या. कुणी तिच्या डोळ्यांना पाणी लावीत होतं. कुणी वारा घालीत होतं. मंजुळा घाबरून गेली होती. ती सारखी नजर फिरवीत भवती पाहत होती. तेव्हा एक हबशीण म्हणाली,

“ बेटी, घबरावो मत ! ”

तिला त्या स्त्रीने दूध दिलं. मंजुळा ते पिईना; तेव्हा मात्र त्या साऱ्या बायकांनी तिला धरून जबरदस्तीने पाजलं.

मंजुळाला सारं सारं आठवू लागलं. आपण मेण्यात होतो. एकदम हल्ला आला. कापाकापी करीत हल्लेखोरांनी मेण्यावर झडप घातली. आपल्याला बाहेर ओढलं. आपल्याला एकदम भोवळ आली, पण हल्लेखोरांतील एक माणूस तिने ओळखला आणि ती शुद्धीवर आली, तेव्हा हबशी बायकांच्या गराड्यात, एका प्रचंड महालात एका मंचकावर आहोत, असं तिच्या लक्षात आलं. ती रडू लागली. उठायचा यत्न करू लागली, पण हबशी बायकांनी तिला मंचकावरच दाबून धरलं. तिला कळून चुकलं, की आपण कोणा तरी बादशाही सरदाराच्या कैदेत पडलो आहोत. ती रडतच होती. भिरभिरी सभोवार नजर फिरवीत होती. तेवढ्यात तिला एका कोपऱ्यात हाताची घडी घालून उभा असलेला एक माणूस दिसला. तिने ओळखलं. ती दातओठ खाऊन मोठ्याने ओरडली, “ सुलतानराऽऽव ! शेवटी असा दावा साधलास ? वैऱ्या ऽ......”

सुलतानराव संथ पावलं टाकीत पुढं आला. तो हसत हसत मंजुळेला म्हणाला,

" मंजुळा, घाबरू नकोस ! काळजी करू नकोस ! तू आता अगदी सुखात पडशील ! तुझ्या सासरीमाहेरी नसेल इतकं सुख ! "

—आणि हसत हसत सुलतानरावाने मान वळवली आणि तो निघून गेला.

मंजुळेला कल्पनाही नव्हती हा सुलतानराव असा असेल याची. ती त्याला ' काका ' म्हणत असे. आपल्या माहेरच्या सर्वांवर मनापासून माया करणारा हा जिव्हाळ्याचा माणूस आहे, असंच ती समजत असे. पण आपल्यावर छापा घालणारा हाच सुलतानराव......तिला सुलतानरावाचा हल्ला करतानाचा आवेश आणि क्रूर चेहरा आठवला. पाठम्होऱ्या चाललेल्या सुलतानरावाला उद्देशून ती ओरडून म्हणाली,

" खाटका, काय करणार आहेस माझं ?"

" लिलाव ! "

मागे वळूनही न बघता हसत हसत सुलतानराव म्हणाला आणि निघून गेला.

मंजुळा संतापली होती, पण ती असहाय्य होती. डोकं आपटून जीव देण्याइतकंही स्वातंत्र्य तिला नव्हतं. ती रडत होती. झरोक्यातून दिसणारं जांभूळखोरं तिला दिसत होतं. आपलं होणार तरी काय, हे तिला समजत नव्हतं. ओरडणं ऐकायला त्या बायका आणि बाहेरच्या अरबांशिवाय भवती कुणीही नव्हतं. दोन दिवस गेले.

तिसऱ्या दिवशी सकाळी सुलतानरावाची हसत हसत येत असलेली आकृती तिला दिसली. तिचे डोळे संतापाने विस्फारले गेले. ती उभी राहिली. तेवढ्यात तिच्या कानांवर उद्‌गार पडला,

" ओहोहोऽ ! कितनी मुलायम ! खूबसूरत ! ऐ परी ! "

एक धिप्पाड सिद्दी दोन्ही हात उंचावीत पुढं पुढं येत बोलत होता.

मंजुळा सुलतानरावाच्या अंगावर धावली पण तिला त्या हबशिणींनी धरलं. तेवढ्यात एक तिसरा चेहरा मंजुळेला दिसला — दौलू !

त्या खूष झालेल्या हबशाने एकदम सुलतानरावाला टाळी दिली. दौलूच्या चेहऱ्यावरही हसू फुटलं. सुलतानराव लगेच मंजुळेला म्हणाला,

" मंजुळे, काही काळजी करू नकोस पोरी. हे फार मोठे दलाल आहेत. तुला हे लवकरच नवं सासर मिळवून देतील ! "

मंजुळेच्या अंगाचा भडका झाला होता. ती फक्त सुलतानरावाच्या दिशेने थुंकत होती. थुः थुः थुः ! सुलतानरावाला त्याची काहीच पर्वा नव्हती, तो म्हणाला,

" दौलू, तुझा वाटा तुला आत्ताच मिळेल. परवाचा दसरा तू आनंदात

साजरा कर ! मंजुळे, तुझा दसरा यांच्याबरोबर जंजिऱ्याच्या वाटेवर ! परवाच्याच दिवशी...... "

रात्री दौलू आपली कमाई कमरेला खोचून गडावरून उतरला आणि पायथ्याच्या झाडीत त्याच्यावर एकदम झडप पडली......सर्जेरावाची !

* * *

दसऱ्याचा दिवस उगवला. मंजुळा त्या जाळीदार झरोक्यातून कळशाकडे बघत रडत होती. सुलतानरावाच्या नरडीचा घोट घ्यावासा वाटत होता तिला, पण ती पिंजऱ्यात करकचली गेली होती.

दिवस वर वर चढत होता. हैबतरावांनी दसऱ्याची देवपूजा आणि तलवारीची पूजा थाटात पार पाडली. दाराला तोरणं बांधली. ते आज विशेष आनंदात आणि उत्साहात दिसत होते. दीपा आतल्या दालनात वावरत होती. ती सारं बघत होती. हैबतरावांचा उत्साह आणि त्याच वेळी रावजीअप्पांचा उतरलेला चेहरा तिच्या नजरेतून सुटला नव्हता. तिने एकदा विचारलंही त्यांना–

" अप्पा, कशाची काळजी करताया तुम्ही ? "

" छे ! कुठं, कधी ? "

" अप्पा, तुमचं तोंड उतरलंय् ! "

" वेडी आहेस पोरी ! "

अप्पा हसले, पण ते त्यांचं हसणंही तिला खरं वाटलं नाही. तिला सर्जेरावाची तर सततच आठवण होत होती. तिला सर्जेरावाचं फक्त एकच वाक्य सतत आठवत होतं –

" दीपा, मी फार मोठ्ठं काम करतोय बघ. देवाचं, धर्माचं...... "

दीपेच्या कपाळीची कोठडी सुटली आणि हैबतरावांनी तिला मारहाण बंद केली, तेव्हापासून ती घरात वावरू–फिरू लागली होती, पण हैबतरावांच्या समोर मात्र ती येत नव्हती. चुकून जरी ती समोर दिसली तरी हैबतराव कपाळाला आठ्या घालीत, तोंड फिरवीत असत. मग बोलणं तर दूरच.

दसऱ्याच्या दिवशी सकाळीच हैबतरावांनी अप्पांना हाक मारली,

" अप्पा ! अप्पाजी ! "

" धनी ! "

" अप्पा, ही किल्ली ! जामदारखान्यातून सारे दागदागिने काढून त्या तुमच्या लक्षिमीच्या अंगावर घाला ! तेवढ्यानं उनंदुनं न्हाया नगं उगीच! "

हैबतरावांच्या काळजातला सारा मनसुबा अप्पांना माहीत होता. ते दच-

कले. त्यांचा चेहरा एकदम खरकला. ते मुकाट किल्ली घेऊन उठले. जामदारखान्यातून त्यांनी दागिने काढले आणि दागिन्यांचे ताट दीपापुढं नेऊन म्हणाले,

"मुली, आज दसरा......"

दीपा हसली. तिने ताट हाती घेतलं. तिनं अप्पांच्याकडे पाहिलं. अप्पा गंभीर–उदास होते. ती त्यांना काही विचारणार तेवढ्यात अप्पा हसले अन् म्हणाले,

"तू लक्ष्मी ह्या घरची!"

दीपा ताट घेऊन देवघरात गेली. पायांतल्या तोडयापासून नथेपर्यंत सारे दागिने तिने अंगावर घातले. खरोखर ती लक्ष्मीसारखी दिसू लागली. तिने आरशात पाहिलं, पण लगेच बाजूला झाली. खिडकीशी आली. तिचं लक्ष गेलं पुण्याच्या दिशेला. तिला आठवण होत होती सर्जेरावाची. ती उगीचच पदर सावरीत मनाशी पुटपुटली.

"ह्ये सारं तुमच्यासाठी आन् तुमचाच ठावठिकाना न्हाई!

सकाळपासूनच हैबतरावांच्या वाड्यावर अतिशय वर्दळ सुरू होती. स्वतः ते कुणाकुणाच्या कानाशी काहीतरी कुजबुजत होते. शिलेदारांची धावपळ चालू होती.

दुपारची जेवणं झाली. हैबतराव आपल्या सदरेवर बसले. वाड्यापुढच्या मैदानात स्वारशिलेदारांचा जमाव जमू लागला.

–समशेरगडाच्या बालेकिल्ल्याचा दरवाजा उघडला गेला. सहा-सात अरब स्वार दरवाजातून बाहेर पडले. मागोमाग एक हबशी घोडेस्वार बाहेर पडला. त्याच्या मागोमाग एक मेणा घेतलेले चार हबशी बाहेर आले. मेण्याच्या मागोमाग पाच-सहा आणखी अरब स्वार बाहेर आले. मेण्यापुढं असलेल्या हबशी स्वाराने एकवार मागे वळून हात वर केला. दरवाजाच्या बुरुजावर उभ्या असलेल्या सुलतानरावाने हसून हात वर केला.

मंजुळेचा मेणा जंजिऱ्याच्या वाटेला लागला.

–दुपारचा सूर्य पश्चिमेला कलला. हैबतरावांच्या वाड्यापुढं हजार–बाराशे मावळी शिलेदार जमा झाले. जो तो आपसात कुजबुजत होता.

सदरेवर अप्पा सचिंत उभे होते. हैबतराव उठले. ते हसत होते. त्यांनी कमरेला शेला गुंडाळला. डोक्यावर पागोटं चढवलं. मिशांच्या कल्ल्यांवरून त्यांनी मुठी फिरवल्या आणि हसत म्हणाले,

"अप्पा!"

"धनी!"

"अप्पा, बोलवा तुमच्या लक्षिमीला म्हणावं. चल बांध तलवार! म्हन म्हनावं, येशवंत व्हाल म्हनून!"

अप्पा थरकले. ते गप्पच राहिले. त्यांचा चेहरा व्याकुळ झाला. हंबतरावांनी ओळखलं. त्यांचे डोळे मोठे झाले. आवाज चढला. म्हणाले,

" अप्पा, तुम्हीच म्हणाला व्हता, की घरच्या लक्षिमीचा शाप आम्हाला बाधतोय म्हनून. तिला कोंडलं, खायला, ल्यायला धड दिलं न्हाई, म्हनून आम्हाला झुंजाररावाशी झुंजताना अपेश आलं. व्हय ना ? "

" होय धनी ! "

" मंग त्याच दिसापून आम्ही तिला मोकळं केलं. तिच्या अंगाला धक्का लावला न्हाई. खायाल्याया मालकिनीसारखं पुरवलं. आज आम्ही झुंजार-रावाची सावंगी मातीला मिळीवनार आहोत. झुंजाररावासकट त्याच्या घरच्या समद्यांच्या मुंडक्यांची माळ करून कळश्याच्या वेशीला बांधनार आहोत. माझ्याशी वैर मांडून माझी मंजुळा मारली त्या सैतानानं. सूड घेनार हाये मी आज. बोलवा तुमच्या त्या लक्षिमीला, ये म्हनावं बाहीर ! तलवार माझ्या कमरेला बांधून म्हन मला, ' येशवंत व्हाल, येशवंत व्हाल ' म्हनून ! जा, जा अप्पा !

अप्पा मुकाट घरात निघाले. दीपा आतल्या चौकापलीकडच्या देवघरात होती. तिला चाहूलही नव्हती, की आपला सासरा आपलं सारं माहेर कापून काढायला फौज घेऊन निघालाय ! तिला वाटत होतं, की मामंजी दस-ऱ्याच्या शिलंगणाला निघायच्या तयारीत आहेत ! राती परत येतील शिलं-गणाचं सोनं घेऊन ! मग ओवाळायचं त्यांना !

अप्पा देवघरात आले. दीपा देवापुढं रांगोळी घालीत होती. सारं बळ एकवटून अप्पा हसत हसत आले अन् येत येत म्हणाले,

" दीपाबाई, अग पोरी, बसलीयस काय ? ऊठ, तुझा सासरा शिलंगणाला निघालाय. ऊठ, ती देवापुढची तलवार घे. बांव त्यांच्या कमरेला ! खोळां-बली स्वारी. "

" अगबाई, खरंच की अप्पा ! "

" वेंवळी ! आटप ! "

दीपा उठली. देवापुढच्या चौरंगावर तलवार ठेवलेली होती. तलवारीवर फुलांची रास होती. तिची पूजा केलेली होती. शेजारीच तिचं म्यान होतं. म्यानाचे वंद आणि गोंडे चौरंगावरून लोंबत होते. दीपाने हळदी-कुंकवाची कोयरी घेतली. तलवारीला अन् देव्हाऱ्यातील भवानीला हळद-कुंकू वाहिलं. स्वतःच्या भाळी लावलं आणि तिने मुठीत हात घालून तलवार उचलली. फुलांच्या घोळातून तलवार वर आली. तिने म्यान डाव्या हाती घेतलं. तल-वार म्यानात घातली. ती आपल्या मस्तकाला टेकवली आणि ती बाहेर निघाली.

बाहेर सदरेच्या कमानीत हैबतराव उभे होते. त्यांच्या अवतीभवती त्यांचे मानकरी शिलेदार उभे होते. बाहेर अंगणात ताशे, रणहलग्या आणि शिंगं वाजत होती. लोकांची गजबज होती.

दीपा एक चौक ओलांडून सदरेकडे येत होती. तिच्या पायांतली जोडवी अन् मासळ्या वाजत होत्या. भरजरी पैठणीचा घोळ तिच्या दोन्ही पावलांत रुळत होता. कमरेवर कमरपट्टा झगमगत होता. डोक्यावरचा पदर पुढं सरकवीत ती पुढं आली. हैबतरावांच्या जवळ आली. तलवारीच्या म्यानाचे बंद सासऱ्याच्या कमरेला बांधण्यासाठी तिने हाती घेतले. ती जवळ आली अन् तेवढ्यात हैबतराव म्हणाले,

" अप्पा, तुम्ही सांगितलंयत का हिला आम्ही कुठल्या स्वारीवर निघालो आहोत ते ? – न्हाई ? न्हाई सांगितलंत ? सांगा सांगा तिला, की झुंजाररावासवट समद्या घरादारातली मुंडकी तोडून आनायला निघालो आहोत आम्ही ! म्हन म्हनावं, " येश घेऊन या ! येशवंत व्हा ! म्हन ! "

दीपाने ते ऐकलं. तिच्या डोळ्यांपुढं काजवे चमचमायला लागले. तिच्या छातीत धस्स झालं. तिच्या कपाळावर घर्मबिंदू चमकू लागले. हात थरथरू लागले. डोळ्यांत पाणी गोळा झालं. ती केविलवाण्या मुद्रेने हैबतरावांकडे बघू लागली. आपलं सारं माहेर उद्ध्वस्त करण्यासाठी सासरा प्रचंड बळ घेऊन निघालाय आणि आपल्याला म्हणतोय,

" म्हन, येश घेऊन या ! येशवंत व्हा ! "

दीपाकडे बोट करीत आणि अप्पांकडे बघत हैबतराव गर्जत होते.

दीपाचे ओठ थरथरत होते. आसवं ओघळत होती. आपल्या माहेरची सारी माणसं तिच्या डोळ्यांपुढं येत होती. — अन् तेवढ्यात तिला एकदम आठवण झाली. झुंझाररावांची मूर्ती तिच्या डोळ्यांपुढं नकळत आली. तिला बापाचे ते शब्द आठवले –

" दीपा, पोरी, आता तू आधी सून हायेस हिम्मतबहाद्दरांची. मंग लेक हायेस झुंझाररावाची. तुझ्या सासरची तू लक्षिमी हायेस. त्या घरासाठीच सारं काही करायचं. जगायचं, मरायचं त्या घरासाठी...... "

बापाचे शब्द तिला आठवले. तिची मान नकळत ताठ झाली. मी आधी सून आहे या घरची. मग एखाद्या सणासुदीला माहेरच्या खणा-नारळाची मी मानकरीन आहे! मला जगायचंय, मरायचंय याच घरासाठी! याच घरासाठी !

दीपाने लगेच हैबतरावाच्या कमरेला तलवार बांधण्यासाठी पाऊल पुढं टाकलं. ती निश्चयी स्वरात म्हणाली,

" मामंजी, येशवंत व्हा ! येशवंत व्हा ! येश घेऊन या ! "

तिने हैबतरावांच्या कमरेला तलवार बांधली. दीपाकडे न बघताच ते हात

वर करीत मोठ्याने गरजले,

" मल्हारी मार्तंडाचाऽऽऽ "

" येळकोऽऽट ! येऽऽळकोऽऽट !

साऱ्या शिलेदारांनी साथ दिली. वाद्यं कडाडू लागली. दिशा धुंद झाल्या. दीपा एकदम वळली. ती आत धावतच सुटली. थेट देवघराकडे. आता तिच्या काळजाचा बांध फुटला. ती ढसढसून रडू लागली. धावता धावता तिचा पदर डोक्यावरून ढळला. तिने हुंवरडा फोडला,

" आईऽ आवाऽ आत्याऽ "

वाद्यांच्या व गर्जनांच्या कल्लोळात तिच्या हाका हवेतच विरल्या. ती देवघरात आली आणि देव्हाऱ्यापुढं येताच तिने देव्हाऱ्याचे पुढचे दोन्ही खांब दोन्ही हातात धरून तो देव्हाराच गदगदा हलवला ! आत असलेल्या देवांच्या मूर्ती जागेवरून ढळल्या.

" आई जगदंबे ! काय मांडलंय तू ह्ये ? म्या काय पाप केलं, माझ्या माहेरच्यांनी काय पाप केलं ? सांग, सांग ! "

अन् दीपा देव्हाऱ्याच्या पुढ्यात डोकं ठेवून ढसढसा रडू लागली.

हैवतराव घोड्यावर स्वार झाले. अप्पाही आपल्या घोड्यावर स्वार झाले. पोरीचा कोंडवाडा, मार आणि उपासमार चुकविण्यासाठी धन्याला आपण म्हटलं, की लक्ष्मीचा शाप आणि तळतळाट तुम्हाला बाधतोय; म्हणून तुम्हाला यश मिळत नाही. त्या वेळी दीपाचे हाल थांबले, पण आपल्या धन्याने हा मनसुबा योजला. आपण करायला गेलो एक; पण ह्या वेळी घडतंय् भलतंच. धनी निघालेत झुंजाररावाचं तळपट करायला ! अप्पा मुकाट्याने चालले होते.

— मंजुळेचा मेणा रस्त्याला लागला होता. समशेरगड आता दिसेनासा झाला होता. भोई मेणा पळवीत होते. गुलामांचा दलाल आणि अरब स्वार भोयांच्या वेगाने आपली घोडी चालवीत होते. गडापासून चार कोसांवर असलेल्या घारजाईच्या रानात मेणा आला. जंगल दाट दाट होत चाललं. हे जंगल कोसभर पसाऱ्याचं होतं. जंगल संपलं, की डोंगराळ वाट लागत होती. उंच उंच पहाडातून घाट जात होता. घाट फार मोठा. तो उतरून गेलं, की कोकण. मग सरळ चाळीस कोस चालून गेलं, की मुरूड जंजिरा. तीन दिवसांची वाटचाल होती. गुलामाच्या त्या हबशी दलालाने ठरवलं होतं, की सूर्य मावळायच्या आत जंगल पार करून घाटाच्या जवळ असलेल्या धनगरवाडीत पोहोचायचंच. तो स्वतःवर आणि सुलतानरावावर फार खूष झाला होता. कारण सौदा फारच झकास जमला होता. तो विचारांच्या तंद्रीत चालला होता.

घारजाईच्या जंगलात मेणा निम्मं अंतर काटून आला. भवती दाट झाडी होती. पाखरं फडफडत होती. वाऱ्याने पानं वाजत होती आणि—

—— एकदम शीळ वाजली. मागोमाग भराभर असंख्य शिळांचे आवाज शिरारले ! दलाल आणि ते अरब एकदम चपापले. ते भराभरा भवती पाहू लागले. दलाल भोयांना ओरडला,

" जल्दी करो ! दौडो ! "

मेण्याचा वेग वाढला. आवाज कुठून येताहेत ते समजेना. माणसांची खूणही दिसेना. शिळांचे साद आणि प्रतिसाद उठतच होते आणि एकदम गर्द झाडांच्या फांद्यांवरून घडाघडा उड्या पडल्या ! शे-सव्वाशे मावळे पटापटा उड्या टाकीत मेण्याकडे धावत येत होते. त्यांच्या हातात नागव्या तलवारी होत्या. दलाल आणि अरब मोठ्याने ओरडू लागले. त्यांनी तलवारी उपसल्या. घोडे थबकले. तेवढ्यात चार-पाच उड्या झाडावरून पडल्या त्या नेमक्या अरब स्वारांच्या मानगुट्यांवरच ! आरडाओरड्याने ते जंगल दणाणलं. किंकाळ्या उठल्या. तलवारी खणाणू लागल्या. चार-पाच अरबांचे मुडदे तर ताबडतोबच पडले.

भोयांनी मेणा खाली ठेवला. ते घाबरून हात जोडून उभे राहिले. अरबांच्या चिंधड्या उडाल्या. दलालाचं मुंडकं उडालं. एका मराठ्याने मेण्याकडे धाव घेतली. मेण्याचा पडदा वर उडवला. त्याने आत डोकावून पाहिलं. तो आनंदला आणि मोठ्याने ओरडून म्हणाला,

" मामासाहेब, डाव फत्ते झाला ! मेण्यात मंजुळाच हाये ! "

" सर्जेराव, शाबास, शाबास ! तुमच्यामुळं पोर सुटली. भवानी पावली! " झुंजारराव मेण्याशी येत म्हणाले. मेण्यात मंजुळा होती. तिचे हातपाय बांधलेले होते. तोंडात बोळा होता. ती रडत होती. सर्जेरावाने प्रथम तिच्या तोंडातला बोळा काढला. ती एकदम आनंदाने ओरडली,

" सर्जादादा —— "

" मंजुळे, आता सुटलीस. भ्या न्हाई. "

त्याने तिचे हातपाय सोडले. तिला बाहेर काढले. तिला परमावधीचा आनंद झाला. आपण सुटू असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. सर्जाने तिला एकही प्रश्न विचारला नाही. तो झुंजाररावांना म्हणाला,

" मामासाहेब, आता तडख चला. ह्यो मेना आन् ह्ये भोई येत्याल माघारी. नाहीतर मरत्याल हथंच. त्ये काय बी करनात का. आपन मंजुळेला घेऊन परतू. घोडी काढू. "

" व्हय व्हय सर्जेराव ! तसंच तसंच ! "

रानात आत दूर जराशा अंतरावर त्या सर्वांनी आपली घोडी बांधली होती. ती भराभरा सोडून आणली. अरबस्वारांची घोडी शिवाय होतीच. एका घोड्यावर मंजुळा स्वार झाली. आता बोलायला सवड नव्हती.



**नायकिणीच्या माळावर...**

झुंजाराव, सर्जेराव, मंजुळा आणि सारे मावळी स्वार भरधाव दौडत सुटले.

—— हैबतराव आपली फौज घेऊन सावंगीच्या रोखाने चालले होते. नायकिणीच्या माळावरून नारंदी ओलांडायची आणि येसगाव, धारगाव वगैरे मारून काढीत थेट सावंगीत घुसायचं, असा हैबतरावांचा बेत होता. ते नायकिणीच्या माळाकडे चालले होते.

नायकिणीच्या माळावरच्या उंचच उंच पिंपळावर हैबतरावाचा एक टेहळ्या आधीपासूनच टेहळणी करीत होता. त्याला खूप दूरवरचं दिसत होतं अन् त्याला एक टोळी दौडत येताना दिसली. तो टेहळ्या भराभरा खाली उतरला. खाली घोडा उभा होता. तो झटकन स्वार झाला आणि हैबतरावांच्या येत असलेल्या फौजेकडे दौडत सुटला. हैबतराव नजीक आले होते. टेहळ्या दौडत आला. तो हैबतरावांच्या जवळ जाऊन थडकला. हैबतरावांनीच पुसलं,

" काय खबर ? "

" धनी, घोडेस्वारांची येक टोळी नायकिनीच्या माळाकडे दौडत येतीया! झुंजाररावाचीच आसंल ती ! "

" आसं ? चला, अप्पा, दौडा ! "

सारी फौज दौडत सुटली. तलवारी म्यनातून बाहेर पडल्या. नायकिणीच्या माळाकडे लगाम ताणले गेले होते. हैबतराव आघाडीला होते. झाडंझुडपं ओलांडीत त्यांचा घोडा नायकिणीच्या त्या विशाल माळावर आला. ते समोर पाहतात तो–हैबतराव थबकलेच ! त्यांनी लगाम खेचला. समोर उभी होती अवघी शे-सवाशे स्वारांची टोळी अन् आघाडीला उभे होते झुंजाराव—सर्जेराव—आणि...आणि एक तरणी पोरगी ! ते न्याहाळून बघू लागले. समोरच्या झुंजाररावाच्या फौजेत कुणाचीही तलवार म्यानाबाहेर निघालेली नव्हती. हैबतराव थबकले होते. तेवढचात त्यांच्या कानांवर त्या पोरीच्या तोंडची हाक ऐकू आली,

" काका ऽ ! काका ऽ ! "

हैबतराव अधिकच गोंधळले. ती पोरगी दौडत पुढं येत होती. झुंजारराव आणि सर्जेरावही पुढं येत होते. अप्पाही गोंधळले होते. ते निरखीत होते. ते एकदम म्हणाले,

" धनी, आपली मंजुळा ! मंजुळा ! "

" मंजुळा ? "

झुंजाररावांनी मंजुळेला ठार मारलं, अशीच त्यांची आतापर्यंतची खात्री होती, पण समोरून खरोखर मंजुळाच येत होती. ते अगदी भांबावून गेले. मंजुळा जवळ आली. तिने एकदम घोडयावरून उडी घेतली. ती धावतच हैबतरावांकडे आली. हैबतराव खाली उतरले. मंजुळेने त्यांना मिठी मारली. हैबतरावांच्या तोंडून शब्दच फुटेना. त्यांच्या हातात नागवी तलवार तशीच होती. त्यांच्यासमोर अवघ्या चार-पाच हातांवर झुंजारराव हसत उभे होते. शेजारीच सर्जेराव होता. हैबतराव आलटून पालटून सर्वांकडे बघत होते. वेडयासारखी त्यांची गत झाली होती. सर्जेराव तेवढचात म्हणाला,

" दाजी, आपली मंजी जिवंतच होती. तुमच्या लाडक्या सुलतानरावानं– मंजे, सांग, तूच सांग तुझी कथा. "

आणि मंजुळेने आपली हकीकत मराभर सांगितली. तेवढचात तीन-चार स्वार दौडत आले. दौलूला घोडयावर घालून तिथं आणलं होतं त्यांनी. त्याला पाहताच मंजुळा संतापली. तिनं म्हटलं,

" काका, ह्या मेल्यानं सुलतानरावाला साथ देऊन माझे धिंडवडे काढले ! "

चित्रासारखे स्तब्ध झालेले हैबतराव झुंजाररावाकडे बघत होते. झुंजारराव म्हणत होते,

" व्याही, तुमच्याशी वैर म्या कसं करीन ? बाच्छावाकडं मी कागाळी कराया नव्हतो गेलो. म्या विजापुराला गेलो हुतो, आमच्यातली दहा गांव



**लक्ष्मीच्या उंबरठ्यावर...**

सर्जेरावांच्या नावानं इनाम करून घ्यायला ! "

हैबतरावाच्या हातातली तलवार गळून पडली. एखादा निर्जीव पुतळा उभा असावा, तसे ते उभे होते अन् एकदम ते धावले. त्यांनी झुंजाररावांना मिठी मारली.

" झुंजारराव, म्या हे काय केलं आजवर ? "

" व्याही, झालं गेलं, संपलं ! "

" झुंजारराव आधी, घरला चला. माझी दीपा घरी रडत असंल. म्या गाढवपना केला. छळलं पोरीला. झुंजारराव, चला आधी–"

तेवढ्यात अप्पा हसून म्हणाले,

" धनी, शिलंगणाचं सोनं लुटल्याशिवायच घरी जायचं ? छे छे ! तसं कसं ? "

नायकिणीच्या माळावरच शिलंगण झालं. वाद्यं दणदणली. हैबतराव अधीर झाले होते दीपाऊला भेटायला. स्वारी कळशाकडे वळली. ओरडत, गर्जत, वाजत !

–दीपाऊ देवघरात बसून रडत होती. तिची खात्री होती, की थोड्या तासांतच आपल्या माहेरची वाताहत झालेली समजणार ! संपणार माहेर ! दिवस मावळला तरी ती देवापुढं डोकं टेकून रडतच होती.

अन् वाद्यांचा, शिंगांचा आणि जयजयकारांचा आवाज हळूहळू उमटू

लागला. वाढू लागला. चढू लागला. जवळजवळ येऊ लागला. कळशाच्या वेशीत आवाज उठू लागला. आवाज हैबतरावांच्या अंगणात आला. सारा वाडा दणाणून घुमू लागला. दीपा जास्तीच रडू लागली. माहेर संपलं ! माहेर संपलं !

तेवढ्यात अप्पा लगबगा देवघरात आले. तिला रडताना पाहून ते चुटक्या वाजवीत म्हणाले,

" दीपाऊ, दीपा, अग ऊठ ! तुझ्या सासऱ्याला केवढा जय मिळाला ! आस्मानी फत्ते झाली ! ऊठ, ओवाळायला चल ! "

" अप्पा ऽ ! " तिला हुंदका आवरेना, " अप्पा, तुम्हीसुद्धा निर्दय झालात का हो ? "

" शू: ऽऽऽ ! बोलू नकोस ! दसऱ्याचा दिवस, लक्ष्मीची वेळ. स्वारी दाराशी आलीय विजयी होऊन अन् तू रडतेस ? तू लक्ष्मी आहेस ह्या घरातली. चल ओवाळायला ! "

—आणि दीपाला झुंजाररावांचे ते शब्द पुन्हा आठवले—

"पोरी, तू आधी सून आहेस हिम्मतबहाद्दरांची, मग लेक आहेस झुंजाररावांची............

दीपा एकदम शांत झाली. तिने निरांजन पेटवलं. ओवाळायचं ताम्हन घेऊन ती निघाली. ती कमालीची शांत आणि गंभीर झाली. डोक्यावरचा पदर पुढं ओढून, ज्योतीला हाताचा आडोसा करून ती निघाली. अप्पा मागोमाग होतेच. बाहेर जल्लोष चालू होता. वर न बघता खाली मान घालून दीपा ओवाळायला पुढं आली. कुंकवाच्या करंड्यात तिनं आंगठा बुडवला आणि तिने वर पाहिलं— ! ती गोंधळून गेली. हैबतराव आणि झुंजारराव हसत हसत शेजारी उभे होते. दोघांच्यामधून डोकावत खट्याळपणे हसत होता सर्जेराव. त्याच्या शेजारी होती मंजुळा. दीपेचा स्वत:च्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. तिचा चेहरा धड नव्हता हसत, धड नव्हता रडत. हैबतराव तिला म्हणाले—


" दीपाऊ, ववाळ ववाळ ! माझ्या भाग्याच्या सूनबाई, ववाळ ! "

दीपाऊने त्यांना ओवाळलं. तिच्या ताम्हनात आपट्याची पानं आणि आपल्या बोटातील सोन्याची अंगठी टाकीत टाकीत हैबतराव म्हणाले,

" शिलंगणाचं सोनं घ्ये ! "

• • •

| | |
|---|---|
| लालमहाल | प्रतापगड |
| पन्हाळगड | राजगड |
| पुरंदर | आग्रा |
| लेखक<br>ब. मो. पुरंदरे<br>रा ज हं स | मूल्य<br>प्रत्येकी रुपये दोन<br>प्र का श न, पु णे. |



# दिग्दर्शक सत्यजित रे

"आता हे पत्र वाचा." माझ्या हाती एक पत्र देत ख्यातनाम पार्श्वगायिका स्वरश्री लता मंगेशकर म्हणाल्या. मी ते पत्र घेतलं नि मोठ्या उत्सुकतेनं वाचू लागलो. इतर चाहत्यांच्या पत्राप्रमाणंच तेही त्यांच्याच एका चाहत्याचं पत्र होतं. मघापासून मी त्यांच्या समवेत बसून त्यांच्या छोट्या–मोठ्या चाहत्यांची हृदयस्पर्शी पत्रं वाचीत होतो. त्यांनी आपल्यापाशी जतन करून ठेवलेला काही निवडक पत्रांचा अनमोल ठेवा आज माझ्यापुढं मोकळा केला होता.

गावोगावच्या, देशोदेशींच्या अनेक चाहत्यांचं आपल्या आवडत्या गायिकेविषयीचं त्या पत्रांतून ओसंडून जाणारं असीम प्रेम पाहून माझं तर हृदय भरून आलं होतं. लताताईंच्या जागतिक लोकप्रियतेची नि जनमनावरील पकडीची मूर्तिमंत साक्ष ही पत्रं पटवीत होती. माझ्या हाती त्यांनी मोठ्या उत्सुकतेनं दिलेलं पत्र अशाच सामान्य चाहत्यापैकी असेल, अशी माझी कल्पना होती. पण त्या पत्रातील मजकूर मी जसजसा वाचू लागलो, तसतसं हे पत्र सामान्य चाहत्याचं निश्चित नाही, याची मला खात्री पटत होती.

लताताईंनी पाठविलेल्या पत्राला ते उत्तर होतं. त्यात त्या पत्रलेखकानं लिहिलं होतं...... "आपल्याला कदाचित खरं वाटणार नाही, पण मीदेखील आपला एक चाहता आहे. आपला सुरेल आवाज अनेकदा मला उत्साह देतो. आपली गाणी मी मोठ्या आवडीनं ऐकतो, म्हणूनच माझ्या एका आवडत्या पार्श्वगायिकेला भेटण्यात मला अत्यानंदच होईल. मी मुंबईला येताच सर्वप्रथम आपली भेट घेईन......" त्या पत्राच्या खाली वळणदार अक्षरांत सही होती–सत्यजित रे! जागतिक कीर्तीचे निर्माते, दिग्दर्शक व वास्तववादी चित्रपटांचे जनक श्री. सत्यजित रे याचं ते पत्र होतं.

"लताताई, आपण पण श्री. सत्यजित रे यांच्या चाहत्या दिसता ?" मी ते पत्र परत त्यांच्या हाती देत उत्सुकतेनं विचारलं.

"वा, अभिजात कला अंगी वसत असलेल्या भारतातील या जगत्मान्य थोर

# आणि

# स्वरश्री लता मंगेशकर

लेखक : वसंत भालेकर

कलावंतावर कोण प्रेम करणार नाही ? भारतीय चित्रपटकलेचा झेंडा जागतिक क्षेत्रात उंचावणाऱ्या, एकाहून एक सरस आणि सकस असे कलात्मक चित्रपट सादर करणाऱ्या, प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या आत्मविश्वासाच्या जोरावर आपलं इच्छित ध्येय गाठणाऱ्या व धंदेवाईक चित्रपटांचा सरळसोपा राजमार्ग सोडून ध्येयवादाचं कंकण हाती बांधून, काटयाकुटयांनी भरलेली, पावलोपावली अडचणींच्या दगडधोंडयांनी ठेचाळण्यास लावणारी नवी पाऊलवाट मळणाऱ्या या भारताच्या सुपुत्राबद्दल मला अभिमानच वाटतो. " लताताई मोठ्या उत्साहानं बोलून गेल्या.

" लताताई, श्री. रे यांच्याशी आपला परिचय असेल नाही ? " मी त्यांच्याकडून



आम्ही

आजही

स्वतः काही एक न करता

पूर्वजांनी केलेल्या

कामगिरीचे पोवाडे

गातच जगतो आहोत....

श्री. रे यांच्याविषयी आणखी काही ऐकायला मिळेल, या उद्देशानं त्यांना प्रश्न केला.

## पहिली भेट

" हो, आहे ना ! हे पत्र आल्यानंतर, ते मुंबईला आल्यावर त्यांची माझी पहिली भेट काहीशी घाईगर्दीत झाली. संगीत–दिग्दर्शक श्री. हेमंत कुमार यांच्या ' बीस साल बाद ' या चित्रपटाच्या प्रकाशन समारंभानिमित्त मुंबईच्या लोटस चित्रपट-गृहात त्यांची माझी ही पहिली भेट झाली. त्या दिवशी खरं म्हणजे माझ्या अंगात ताप होता, पण आपल्या आवडत्या कलावंताची भेट होणार, या आनंदातच मी त्या दिवशी त्या शितल चित्रपटगृहात उपस्थित राहिले होते. आमचं बोलणं फारसं झालं नाही, पण त्यांच्या मोजक्या बोलण्यातील आपुलकी व आस्था चांगलीच जाणवली. खरं सांगू, त्या माणसाच्या चेहऱ्यावर कला ओसंडत असल्याचा मला भास झाला. प्रथमदर्शनी ते मला काहीसे घमेंडखोर वाटले, पण प्रत्यक्षात ते तसे नाहीत. करारी निग्रहीपणा आणि मनात येईल ते करून दाखविण्याची जिद्द त्यांच्या ठायी दिसली मला. अशा या स्वभावामुळेच मला वाटतं, त्यांनी प्रतिकूल परिस्थिती-वर मात करून आपलं इच्छित ध्येय गाठलं असावं. त्यामुळंच आज 'वास्तवते, तुझं नाव सत्यजित रे,' असं म्हणणं भाग पडत आहे." लताताईंच्या आवाजात यावेळी वेगळाच जोश जाणवला.

"आपणाला बंगाली भाषा अवगत असल्यामुळे त्यांच्या चित्रपटांचा चांगला आस्वाद घेता येत असेल नाही ? "

" बंगाली भाषा मला समजते म्हणून मला त्यांच्या चित्रपटातील संवादांची मजा चाखता येते, हे खरं, पण बंगाली अवगत नाही म्हणून त्यांचे चित्रपट समजत नाहीत, असं थोडंच आहे. तुम्हाला येतं का बंगाली ? नाही ना ? तरी तुम्ही आवडीनं पाहताच की नाही त्यांचे चित्रपट ? काही अडलं आहे का तुमचं त्यामुळं ? अहो, त्यांच्या प्रत्येक चित्रपटाची हाताळणीच अशी आहे, की त्यात बोलण्याला महत्त्व फार कमी. त्यांचे चित्रपट भावनेनं फार बोलतात. भावनेची भाषा चोखंदळ प्रेक्षकाला चटकन समजते."

## त्यांचा कॅमेरा बोलतो

" चित्रपटाची कथा कॅमेऱ्याच्या माध्यमातूनच फुलली पाहिजे, हे ते जाणतात. कॅमेऱ्याचं महत्त्व त्यांना पटलं आहे. आवश्यक तेथेच त्यांची पात्रं बोलतात. एरवी त्यांचा कॅमेराच प्रत्येक प्रसंग बोलका करतो. हा कॅमेरा पण केवळ यांत्रिक पद्धतीनं फिरत नाही. त्यांच्या छायालेखनालाही भावनांचा ओलावा असतो. त्यांच्या चित्रांत भावनेला महत्त्व अधिक. कोणती गोष्ट कुठं हवी हे त्यांना चटकन् कळतं, त्यामुळं मानवी स्वभावाचं यथार्थ चित्रण करीत त्यांचा कॅमेरा फिरतो. केवळ यांत्रिक करामत करून दृश्य निर्जीव करणं त्यांना पसंत नाही. तशी कॅमेऱ्याची करामत

आमच्या अनेक हिंदी चित्रपटांतूनही दिसते. पण त्यांचा कॅमेराही बोलत असतो. थोडक्यात सांगू का ! त्यांची चित्रं सारखी बडबडत राहत नाहीत. हवं तेवढं नि हवं तेथेच बोलायची त्यांना त्यांच्या जनकानं चांगली सवय लावली आहे." काहीशा मिस्किलपणाने हसतच त्या उद्गारल्या.

"श्री. रे यांच्या कोणत्या चित्रपटांनी आपल्याला अधिक भारावून टाकलं ?" मी फिरून चर्चेला प्रारंभ केला.

"त्यांच्या पाथेर पांचाली या पहिल्याच चित्रानं मी इतकी भारावून गेले, की या महान कलाकाराला मी मनोमन दंडवतच घातले. वास्तवतेचं स्थान चित्रपटात काय असतं, हे त्या वेळी कळलं मला. श्री. रे यांची जबर निरीक्षणशक्ती, बारीक-सारीक गोष्टींवरही विशेष लक्ष पुरविण्याची त्यांची वत्ती पाहून भारावून गेले मी. त्यांच्या चित्रातलं असं एकही दृश्य आढळणार नाही, की ते केवळ घ्यायचं म्हणून घेतलं गेलं आहे. त्या प्रत्येक दृश्यामागे विशेष परिश्रम असल्याचं चटकन लक्षात येतं.

"पाथेर पांचालीनंतर अपराजितो, अपूर संसार, अभिजान, जलसा घर, महानगर, कापुरुष-ओ-महापुरुष आणि चारुलता आदि त्यांची जवळजवळ सर्वच चित्रं मी पाहिली आहेत. त्या प्रत्येक चित्रानं मला आगळाच आनंद दिला आहे."

**जीवनाचा आरसा**

"श्री. रे यांची कला किती उंच झेप घेऊ शकते. वास्तवेतेचं दुसरं टोक कसं गाठू शकते हे पाहायला मिळालं आहे मला. या चित्रपटातील कित्येक प्रसंगांतून कलेविषयी तळमळ, ध्यास व एक विशिष्ट ध्येय दृष्टीसमोर ठेवून सतत कलेची सेवा करीत असल्याची जाणीव होते. श्री. रे यांचे कार्य योजनाबद्ध आहे. ते स्वतः निष्णात दिग्दर्शक आहेत, तद्वत् कल्पक चित्रकार आहेत. छायालेखन व संकलन या महत्त्वाच्या कलाही त्यांना अवगत आहेत. शिवाय संगीताचं उत्तम ज्ञान आहे. त्यांचं पेपरवर्क अगदी तंतोतंत असतं नि मुख्य म्हणजे उघड्या डोळ्यांनी त्यांनी जगात वावरण्याची स्वतःला सवय लावून घेतली आहे. त्यामुळं ते जे जे पाहतात, ते ते चटकन् मनात साचवून ठेवतात. त्यामुळंच बंगालचं अगदी वेगळं व वास्तवपूर्ण दर्शन त्यांच्या चित्रांतून घडतं. त्यांच्या चित्रांत आपल्या जीवनाचा आरसा पाहायला मिळतो. आपल्या जीवनातील अनेक सुख-दुःखाचे प्रसंग आपण पाहत आहोत, असं वाटतं."

"बंगाल ही त्यांची जन्मभूमी व कर्मभूमीदेखील. बंगालचा परिसर त्यांनी बालपणापासून अगदी जवळून पहिला. त्यातील दारिद्रय, गरिबी, श्रीमंती, ऐषआरामी जीवन, मध्यमवर्गाच्या अनेक समस्या यांचा त्यांनी नीट अभ्यास केलेला असल्यामुळे आपल्या परिचित वातावरणाला आपण पडद्यावर अधिक न्याय देऊ शकू, असं त्यांना वाटत असल्यानं त्यांच्या प्रत्येक चित्रपटाची पार्श्वभूमी बंगाल हीच आहे. म्हणूनच मला वाटतं, त्यांच्या चित्रपटांतील प्रत्येक प्रसंग अधिकाधिक सजीव,

अधिक सचेतन होत असावा.

"त्यांच्या पाथेर पांचाली याच चित्रपटातील कितीतरी हृदयस्पर्शी प्रसंग वानगी-दाखल दाखविता येतील. त्यातील दुर्गाच्या मृत्यूचा प्रसंग तर काळजाला जाऊन भिडतो. ही दुर्गा एकदा एक माळ चोरते. त्या वेळी तिच्या आईनं तिला खूप मारलेलं असतं. परंतु दुर्गाच्या निधनानंतर ते घर सोडून जाताना जेव्हा तिच्या भावाला –हरिहरला–नारळाच्या एका करवंटीत ती माळ सापडते तेव्हा ती चटकन उचलून घेतो व मागील दारच्या तळ्यात ती फेकून देतो. मृत्यूनंतर तरी आपल्या लाडक्या बहिणीला चोरीचा कलंक लागू नये, हा हेतु त्यामागं असतो. तळ्यातलं शेवाळं तेव्हा दुभंगतं व पूर्ववत होतं. जणू निसर्गानंही मृत दुर्गाचा तो गुन्हा झाकून टाकला.

"दुर्गाच्या निधनाच्या प्रसंगाच्या वेळी विविध वाद्यांची लय वाढवून जो करुण रस निर्माण केला आहे, तो हृदयाच्या तारा पिळवटून टाकतो. आपल्याकडे अशा प्रसंगाच्या वेळी रडारडच अधिक ऐकू येते. या चित्राचे संगीतकार श्री. रविशंकर यांच्याही कलाचातुर्याची चमक या दृश्यात पाहायला मिळतेच.

"या चित्रातील म्हाताऱ्या आजीचा त्रागा तर मोठा गमतीदार पण तितकाच वास्तव वाटतो. घरावर, कुटुंबावर, कुटुंबातील प्रत्येक माणसावर आपला ताबा असावा, असं म्हाताऱ्या मंडळींना नेहमीच वाटत असतं, पण प्रत्यक्षात तसं कधी व कुठं घडतच नाही. त्यांचं फारसं कुणी ऐकतच नाही. या आजीची अवस्थाही काहीशी तशीच आहे. कुटुंबातली सगळीजणंच तिच्याकडं दुर्लक्ष करतात. त्यामुळं तिचा त्रागा खूपच वाढतो. साध्या दोन हिरव्या मिरच्या खायला मिळाव्या म्हणूनदेखील तिला कोण आटापीटा करावा लागतो. ही म्हातारी केव्हा मरते ते कुणाला कळत पण नाही. पण त्या प्रेताच्या तोंडावर तेव्हा दोन माशा बसलेल्या दिसतात. श्री. रे यांच्या दांडग्या निरीक्षणशक्तीचं खरंखुरं दर्शन घडतं अशाच प्रसंगातून. या म्हातारीच्या–इंदरआजीच्या–भूमिकेसाठी त्यांनी चुन्नीबालासारखी एकेकाळी चित्र–पटांतून कामं करणारी, पण आज गलितगात्र झालेली जख्खड म्हातारीच निवडून त्यांनी आपलं अर्धअधिक यश निश्चित केलं. कारण चुन्नीबालाच्या व इंदरआजीच्या स्वभावधर्मात साम्य खूपच. त्यामुळं साहजिकच अभिनयात जिवंतपणा आला. गरिबी यथार्थ दर्शविणारा या चित्रातील आणखी एक प्रसंग म्हणजे मिठाईच्या नुसत्या वासानं सुख मानणारी दुर्गा व हरिहर ही मुलं. त्यांना तसं पाहून टचकन् पाणी येतं.

"या चित्रातील कुटुंब घर सोडून जातं तेव्हा रिकाम्या घरात वळवळत असतो एक साप. रिकाम्या घरात साप राहतो, अशी जी म्हण आहे, तिचं प्रत्यंतर यावेळी येतं.

"पाथेर पांचालीचा शेवट कुटुंब घर सोडून जातं असा आहे, तर अपराजिताची सुरवात आगगाडीच्या आगमनानं करण्यात आलेली आहे. श्री. रे यांची दोन चित्रांची दुवा साधणारी ही सुरवात मला तरी मोठी कल्पनापूर्ण वाटली.

" अपूर संसारमधील अपू आपल्या पत्नीचं पत्र वाचतो, हा प्रसंग मनाला गुदगुल्या करून जातो. त्या वेळची त्याची एकंदर हालचाल मोठी मजेदार वाटते. त्याहीपेक्षा अपूची पत्नी अपर्णा बाळंतपणासाठी माहेरी जाते, त्या वेळचा रेल्वे-स्टेशनवरील प्रसंग तर फारच बहारीचा आहे. पतिपत्नीच्या स्वभावदर्शनाचं चांगलंच दर्शन घडतं तेव्हा. गाडी सुटेपर्यंत ती दोघं एकमेकांकडे नुसती पाहत राहतात व गाडी सुटताच अपर्णाला आपल्या पतीला काय काय सांगावं, याची चटकन् आठवण होते व मग ती भराभर एक एक गोष्ट सांगू लागते. घरी लवकर येत जा, फडताळात लोणचं आहे, ते घ्या. वेळेवर जेवत जा. एक का दोन, अनेक सूचना ती आपल्या नवऱ्याला करीत असते. गाडी दूर दूर निघून जाते, पण तिचं आपलं बोलणं चालूच असतं. असंच वास्तव जीवनात अनेकदा घडतं बघा. "

## आरती, नरसिंग, चारुलता

" महानगरमधील नायकाची–सुब्रता मुजुमदारची–पत्नी आरती जेव्हा नोकरी करू लागते, चार पैसे मिळवू लागते, तेव्हा तिच्या घरात जो बदल होतो, तोही असाच वास्तव जीवनाचं यथार्थ दर्शन घडविणारा. सुब्रता व आरती यांना आरतीची सासू एकत्र जेवायला वाढते व त्यांचे जे कौतुक करते, ते घरच्या कर्त्यासवरत्या मंडळींचं महत्त्व पटवून जाणारं. या चित्रात ओष्ठ-शलाकेचा (लालीचा) उपयोगही असाच परिणामकारक आहे. आरतीच्या स्वभावात, राहणीमानात हळूहळू होणारा बदलच यातून दृग्गोचर होत असतो.

" अभिजानमधील नरसिंग ड्रायव्हरचा बेछूटपणा व चारुलतातील चारुलताचा एकाकीपणादेखील असाच परिणाम साधून जातो. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या ज्या नष्टनीड या कादंबरीवरून चारुलताचा जन्म झाला आहे, त्या कादंबरीत चारुलताचा एकटेपणा गुरुदेवांनी आपल्या समर्थ लेखणीने चांगलाच रंगविला आहे. लेखकाला असे प्रसंग सरस वर्णन करून जिवंत करणं सहज शक्य असतं. चित्रपटात तशी काहीच सोय उपलब्ध नसते. दिग्दर्शकांची खरी कसोटी येथेच लागते. दिग्दर्शकाला थोडक्या वेळात येथे भरपूर काही दाखवायचं असतं. श्री. रे यांच्या दिग्दर्शन–चातुर्याची म्हणून या चारुलतेची मातबरी पटते. दुर्बिणीचा व पत्त्याचा उपयोग करून चारुलताचं एकटेपण परिणामकारकरीत्या चित्रित केलं आहे. श्री. सत्यजित रे यांची चित्रकला ही अशी आहे–त्यांच्या कल्पकतेचं, कल्पनाचातुर्याचं जागोजागी सुरेख दर्शन घडविणारी." लताताई काहीशा अभिमानानंच उद्गारल्या.

" श्री. रे यांच्या अलीकडच्या का–पुरुष–ओ महापुरुष या चित्रपटाबद्दल आपलं काय मत आहे ? " मी फिरून उत्सुकता दाखविली.

## का पुरुष......देवदास

" त्यातील महापुरुष हे चित्र मला विशेष आवडलं नाही. याहीपेक्षा अधिक परिणामकारकरीत्या बुवाबाजीवर आपल्याकडे कोरडे ओढण्यात आले आहेत. का

पुरुष हे चित्र मात्र मला खूप आवडलं. अत्यंत आटोपशीर असं कथानक, प्रत्येक प्रसंगाची सुरेख बांधणी व प्रसंग सजीव करण्यासाठी घेण्यात आलेले विशेष परिश्रम यांची यावेळी चांगलीच जाणीव होते.

"या चित्राची सारी उभारणीच देवदासमधील एका प्रसंगावर केली असावी, असा मात्र माझा कयास आहे. श्री. रे यांनी आपल्या या कथेची बीजं त्या चित्रपटातील पारू-देवदासच्या एका भेटीच्या प्रसंगातून उचलली असावी, असं मला वाटतं. कारण या दोन्ही चित्रांतील प्रसंग जवळजवळ सारखेच आहेत. लग्न ठरल्यावर पारू देवदासकडे येते नि सर्व लाजलज्जा सोडून माझं सर्वस्व तुझ्याच चरणी वाहण्यासाठी आले आहे, असंच तिला सांगायचं असतं जणू. देवदासमधील का पुरुष येथे जागा होतो. तो घाबरतो, तिला साथ देत नाही. पारू निघून जाते. नाइलाजास्तव दुसऱ्याची होते.

"का पुरुषची कथा या एकाच प्रसंगातून उदयाला आलेली असावी असं मला वाटतं. का पुरुषमधील असहाय्य नायिका अशीच आपल्या प्रियकराकडे येते. आपला हात धरण्याची त्याला कळवळून विनंती करते, पण दारिद्र्याला घाबरलेला नायक तिला साथ देत नाही. ती निघून जाते. दुसऱ्याशी संसार थाटते. त्यानंतर नायक तिच्या जीवनात येतो, पण ती त्याच्या प्रीतीला योग्य साथ देत नाही. देवदासमध्येही देवदास पारूला तिच्या लग्नापूर्वी अशीच काठी मारून आपल्या भेटीची जन्माची आठवण तिच्या कपाळावर उमठवून ठेवतो. अर्थात या दोन्ही चित्रपटांची जडण-घडण अगदीच वेगळी, पण केवळ एका प्रसंगातून एक वेगळीच सकस कलाकृती निर्माण करणाऱ्या श्री. रे यांचं मला विशेष कौतुक वाटतं."

"श्री. रे यांच्या चित्रपटातील संगीताबद्दल आपल्याला काय वाटतं ?"

## संगिताची कुरघोडी नाही

"वास्तवतेची कास धरणाऱ्या या महान कलावंताचं संगीतही असंच वास्तवतापूर्ण असतं. त्यांच्या कलाकृतीला ते चांगलं खुलवतं. चित्रातील प्रसंग अधिक बोलके करते. त्याच्या चित्रपट-कथेवर हिंदी चित्रपटातील संगीतासारखं त्यांचं संगीत कुरघोडी करीत नाही. कारण आवश्यक तेथेच ते स्वरांची मदत घेतात.

"महानगरच्या श्रेयफलकाच्या वेळी त्यांनी आपल्या संगीताच्या जोरावर प्रेक्षकांना कलकत्त्यासारख्या एका मोठ्या शहरात नेलं आहे. चित्रपटाच्या श्रेयफलकाच्या वेळीच ट्रॅमच्या पोलचा त्यांनी असा काही आवाज केला आहे, की त्या आवाजावरून चित्रपट पाहणाऱ्या आपणाला आता कुठलं तरी गजबजलेलं शहर पाहायला मिळणार आहे, असं वाटावं. श्री. रे यांनी आपल्या काही चित्रपटांसाठी श्री. रविशंकर यांच्याकडून संगीत घेतले होते. ही त्यांची निवड अतिशय योग्य होती, हे जगानंच ठरवलं आहे."

## मराठी टीकाकारांची अढी

" मराठी चित्रसृष्टीला काही हे असे वास्तववादी चित्रपटाचे प्रयोग नवे नाहीत, असं म्हटलं जातं. आपलं याबाबत काय मत आहे ?" लताताईंचा मराठीचा जाज्वल्य अभिमान ठाऊक असल्यानं मी त्यांना थोडंस छेडलं.

" अहो, मराठीत आधी वास्तवतावादी चित्रं निघाली किती ? आम्ही आजही स्वत: काही एक न करता पूर्वजांनी केलेल्या कामगिरीचे पोवाडे गातच जगतो आहोत. सावकारी पाश, मीठभाकर, चिमणी पाखरं यांसारखी काही चित्रं आमच्याकडं निघाली. 'सावकारी पाश' चा वास्तवतावादी चित्रपट म्हणून आज खूपच बोलबाला होत आहे; पण आमच्या अशा चित्रांतूनही थोडंफार भडक नाटय आढळतंच. आमच्याकडे एकदा नायकावर अगर नायिकेवर दु:खाचे डोंगर कोसळू लागले म्हणजे त्यांतच ती बापडी पुरती खचून जातात. वास्तव जीवनात असं होत नाही.

" श्री. रे यांची चित्रं शंभरटक्के वास्तवतेची कास धरूनच निर्माण झालेली असतात. गल्ल्याशी तडजोड करून त्यांनी कधीच आपल्या ध्येयाला मुरड घातलेली नाही. आपलं ध्येय, आपला मार्ग त्यांनी आधी निश्चित केला व त्या मार्गावरूनच चालायचं, त्यासाठी प्रसंगी कितीही हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या तरी त्या सहन करायच्या हे ठरवूनच त्यांनी चित्रनिर्मितीस प्रारंभ केलेला आहे, त्यामुळं त्यांच्या मनात जे असतं, त्याचेच पडसाद रजतपटावर उमटत असतात. उडाला तर पक्षी नि बुडाला तर बेडूक, अशी धरसोड वृत्ती त्यांची नाही.

" सभा-संमेलनांतून कलात्मक चित्रपटांच्या नुसत्या लांबलचक गप्पा मारून धंद्यासाठी ध्येयवादाशी तडजोड करीत बसण्याचं पाप श्री. रे यांच्या हातून कधीच झालेले नाही. मुळात म्हणजे आपण जे काही करणार त्याचे ते आधी नगारे पिटीत बसतच नाहीत. आधी केलं व मग सांगितलं, अशी त्यांची वृत्ती आहे. मराठी चित्रसृष्टीत असा प्रयत्न होतो आहे का ? आमच्या पूर्वजांनी मराठीत खूप काही तरी भव्यदिव्य करून ठेवलं आहे. मला ते मान्य आहे. त्याबद्दल रास्त अभिमानदेखील आहे; पण त्यात पुढं कितीशी भर पडली ? नावीन्याचा, वास्तवतेचा मागोवा कितीशा लोकांनी घेतला ? श्री. रे यांचे नवे प्रयोग आमच्या मराठीला परवडणार नाहीत. आधी आपण स्वत: जगू या व मग कलात्मक वास्तववादी चित्रपटाच्या गोष्टी करू या, असं मध्यंतरी कुणीसं मत व्यक्त केलं होतं. मला ते मान्य आहे. आपण धंद्यासाठीच चित्रपट निर्माण करायचे ना ? मग सत्यजित रे सारख्या माणसांशी स्वत:बरोबर किंवा इतर मराठी दिग्दर्शकाबरोबर तुलना करून त्यांना प्रत्येक वेळी कमी लेखण्याचा खटाटोप का केला जातो ? त्यांच्यापेक्षा आपल्या कलाकृती कशा श्रेष्ठ आहेत, असं पटविण्याची का खटपट होत आहे, हे मला काही कळत नाही.

" केवळ धंद्यासाठी वितरकांच्या तालावर नाचण्याचं तंत्र त्यांनी अवलंबिलं असतं,

तर त्यांची पाथेर पांचाली ही पहिलीवहिली कलाकृती केव्हाच पडद्यावर येऊन त्यांना त्यात चार पैसे पण मिळाले असते. परंतु त्यातून अवघ्या विश्वात कलात्मक वास्तववादी चित्रांचा झेंडा फडकविणारा आजचा थोर भारतीय कलावंत सत्यजित रे निश्चित आकाराला आला नसता !

" आज वितरकाच्या सांगण्याप्रमाणं आपल्या कलाकृतीत काय हवं ते कोंबणाऱ्या, पिटातल्या प्रेक्षकाला आवडते म्हणून सद्‌भिरुचीची चाड सोडून सवंग परंतु चविष्ट मसाला मिसळणाऱ्यांनी, केवळ चालतात, बऱ्यापैकी धंदा करतात, म्हणून ठराविक चाकोरीतील चित्रपट निर्माण करणाऱ्यांनी व वितरकांचा हैदोसधुल्ला घालण्यास अधिक मदत करणाऱ्यांनी, मला वाटतं, श्री. रे यांच्या वाटेला जाऊ नये हे उत्तम.

" श्री. रे आपल्या मार्गाने जात आहेत. त्यांचा मार्ग निश्चितपणे त्यांना आज फलदायी ठरला आहे. कीर्ती, वैभव व वास्तव-चित्रपटाचे जनक म्हणून नावही त्यांना मिळालं आहे, पण म्हणून आपण काहीतरी भव्यदिव्य, जगावेगळं करतो आहोत, या गुर्मीत त्यांनी इतरांना कधी तुच्छ लेखलं नाही. परवा त्यांना कुणीतरी विचारलं, की तुम्ही हिंदी चित्रपट का काढीत नाही ? त्यावर त्यांनी चटकन् उत्तर दिलं, " हिंदी ही आपली राष्ट्रभाषा आहे. भारतीय या नात्यानं ती शिकणं हे माझं कर्तव्य आहे, पण मी अद्यापि तिच्यावर प्रभुत्व मिळविलं नाही आणि ज्याचं आपल्याला ज्ञान नाही त्यात लुडबुड करणं आपल्याला आवडत नाही." श्री. रे यांची वृत्ती ही अशी आहे. यावेळी त्यांनी आजच्या हिंदी चित्रपटांच्या प्रेक्षकांच्या बिघडलेल्या अभिरुचीचा चुकूनही उल्लेख केला नाही.

" मला एक प्रसंग आठवतो. माझ्याजवळ त्यांनी चौकशी केली ती आमच्या शांतारामबापूंची ! त्यांचे चित्रपट आपणाला फार आवडतात, आपण ते आवडीनं पाहतो, असे ते म्हणाले. आमच्या मराठी मंडळींनी त्यांच्याबाबतीत अशी अढी बाळगण्यात काय अर्थ आहे. जग त्यांना श्रेष्ठ मानतं, त्यांची प्रशंसा करतं. जगातील असा एकही चित्रपटसमीक्षक नाही, की जो श्री. रे यांना वगळून पुढं जाईल. अशा वेळी एक भारतीय या नात्यानं आपण त्यांच्याबद्दल अभिमान बाळगायचा की आपल्यापेक्षा ते कमी कसे आहे, हे पाहत बसण्याचा वृथा प्रयत्न करायचा ? आणि तसं कमी लेखून, ते कमी थोडेच ठरणार आहेत ? देवानं त्यांना उदंड आयुष्य देऊन ठेवलं आहे. अहो, ज्याबद्दल अभिमान बाळगायचा त्याबद्दल ही मंडळी अभिमान बाळगीत नाहीत आणि सत्यजित रे यांचा नाहक तेजोभंग करायला निघाली आहेत."

## आमचा अभिमान कुठे आहे ?

" आमच्या संतश्रेष्ठांची, महाराष्ट्राच्या थोर विभूतींची हिंदी चित्रपट-निर्माते, उघड उघड बदनामी करीत असतात, ती ही मंडळी उघडया डोळयांनी पाहतात, त्यावेळी त्यांचा त्वेष, राग, मराठीचा जाज्वल्य अभिमान का जागृत होत नाही ? त्यांच्या अस्मितेला का डंख बसत नाही ? त्यावेळी त्यांची मनं त्वेषानं उफाळून

का येत नाहीत ? मध्यंतरी एका हिंदी निर्मात्यानं आमच्या ज्ञानेश्वरमहाराजांची उघड उघड बदनामी केली. सारं खोटं नाटक त्या चित्रात कोंबून आमच्या या ज्ञानाच्या माउलीला जादूगाराचं, प्रेमिकाचं नि रस्त्यावर गाणं म्हणत भीक मागत फिरणाऱ्या भिकाऱ्याचं स्वरूप दिलं. मुक्ताई माउलीला आधुनिक तरुणी बनवून तिच्या भुवया कोरल्या. डोळ्यांत काजळ भरलं. तिच्यावर कामुक वासना धरणारा एक राजादेखील दाखविला ! नमूताईला आजच्या हिंदी चित्रपटातील नायिके-प्रमाणं ज्ञानेश्वरमहाराजांवर लट्टू होऊन विरहगीतं गाणारी दाखविली. तिच्या सात्त्विक प्रेमाचं, श्रद्धेचं, विश्वबंधुत्वाच्या भावनेचं अक्षरशः खोबरं करून टाकलं! असा हा आमच्या एका थोर पुरुषाची उघड उघड बदनामी करणारा चित्रपट सेन्सॉर–संमत होतो आणि महाराष्ट्रातच त्याचे रौप्यमहोत्सव साजरे होतात, हा दैवदुर्विलास !

"अशा वेळी या चित्रपटाला बंदी घाला असा प्रयत्न आमच्या या मराठी मंड-ळींनी का केला नाही ? येथे अनेक बडी बडी मंडळी आहेत. सरकारदरबारी त्यांना मानाचं स्थानदेखील आहे, पण त्यांनी याबद्दल ब्र तरी तोंडातून काढला का ? सदैव मंत्र्यांच्या मेळाव्यात मिरवणाऱ्यांनी, ऊठसूठ माउलीच्या समाधीवर डोकं घासणाऱ्यांनी याबाबतीत आपली नापसंती का व्यक्त केली नाही ? सग-ळ्यांनी आमच्या या थोर पुरुषाची विटंबना उघड्या डोळ्यांनी पाहिली. इतर धर्मातील लोकांच्या श्रद्धास्थानाची विटंबना करून बघा, त्याचे काय परिणाम भोगावे लागतात ते. अहो, अशा वेळी केवढं वादळ उठलं पाहिजे होतं. निर्मात्याला चांगली अद्दल घडायला पाहिजे होती. सेन्सॉर–बोर्डालाही धडा शिकवायला हवा होता, पण तसं काही झालं नाही. उलट निर्मात्याचंच उखळ पांढरं झालं, त्याला आता दुप्पट अवसान येईल. मराठी मंडळींचा मऊपणा त्याला कळून चुकला. मराठी संतश्रेष्ठांच्या नावावर काहीही खपतं याची त्याला खात्री पटली. आता अशीच आमच्या इतर श्रद्धास्थानांची हिंदी पडद्यांवर विटंबना चाललेली उघड्या डोळ्यांनी पाहावी लागणार.

"अहो, ज्या मराठी चित्रपट-व्यावसायिकांच्या संमेलनात श्री. रे यांच्या नावानं नाहक आरडाओरडा झाला, त्या संमेलनात या चित्राच्या विरुद्ध साधा निषेधाचा ठराव तरी संमत व्हावा. पण छे, त्या वेळी आमची अस्मिता जागृत होत नाही. आम्हाला फक्त त्रास होतो दुसऱ्यांना श्रेष्ठ म्हटल्यानं.

"श्री. रे आपल्या संस्कृतीशी तरी अशी प्रतारणा करीत नाहीत. त्यांचा प्रांता-भिमान जबर आहे. त्यांनी आपलं बंगालीपण कधी सोडलं नाही, त्याला मुरड घातली नाही. त्यामुळं बंगाली संस्कृतीचं, आचारविचारांचं यथार्थ दर्शन ते आपल्या चित्रपटांतून सदैव घडवीत आले आहेत. श्री. रे याचं मोठेपण यांतच लपलेलं आहे !" लताताईंच्या बोलण्यात राग-त्वेष आवेगाने भरलेला होता.

"पण लताताई, तुम्ही तर त्या चित्रपटासाठी गायिला होता. तुमच्या सुरेल गळ्याचा त्यांना चांगलाच उपयोग झाला. निदान तुम्ही तरी अशा चित्रांना सहकार्य करायला नको होतं." मी काही खोचूनच त्यांना प्रश्न केला.

"खरं आहे तुमचं म्हणणं. पण मी गायिलं तेव्हा मला तरी कुठं माहीत होतं ? आम्हाला गाण्याच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी गीताच्या वेळेचा फक्त प्रसंग सांगितला जातो. पुढं या चित्रातून असं काही तरी भयंकर दाखविलं जाणार आहे, हे अगोदर माहीत असतं, तर मी त्या चित्रपटासाठी निश्चित गायिले नसते." पुन्हा लताताईंच्या बोलण्यात चीड जाणवली.

## राजा परांजपेही हवेत

"खरं सांगू का लताताई, एखाद्याचं श्रेष्ठत्व जेव्हा मनोमन पटतं, तेव्हाच अनेकदा त्यातून असूया निर्माण होते. हल्ली आपल्याकडे श्री. रे यांच्या चित्राशी आपल्या चित्रांची तुलना करीत बसण्याची सवयच झाली आहे आणि मग श्री. रे यांच्यापेक्षा आपली चित्रं श्रेष्ठ कशी, हे सिद्ध करण्यासाठी व्याख्यानं व मुलाखतींचा सर्रास उपयोग केला जात आहे, पण श्री. रे यांच्यासारखे योजनापूर्ण चित्रपट निर्मित करणारे मराठी चित्रपट-निर्माते हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेदेखील भरणार नाहीत. ते चित्रपटाच्या कथेवर, पटकथेवर जी मेहनत घेतात, पात्रांच्या स्वभाव-परिपोषासाठी जे श्रम घेतात, कलावंतांच्या अनुरूप निवडीसाठी त्यांची जी धडपड चालते, छायालेखनाचे नवे नवे प्रयोग करण्यासाठी त्यांची जी तळमळ चालते, त्यासाठी ते जे सतत वाचन-चिंतन करतात, तसं ते करणारा, अशी अफाट मेहनत घेणारा आपल्याकडे कुणी आहे का ? अशा वेळी आर्थिक टंचाईचा बागुलबोवा उभा केला जातो. मग आम्ही पण श्री. रे यांच्यापूर्वीच वास्तवतावादी चित्रपट निर्माण केले होते म्हणून ऊर बडविण्यात काय अर्थ आहे ? आज आपण काय करीत आहोत ते बोला !" मी माझ्या मनातील मळमळ व्यक्त करून मोकळा झालो.

"त्याचं काय आहे वसंतराव, मुळात तळमळ लागते. ज्या मराठी मंडळीजवळ ती आहे ती मंडळी काही तरी धडपड करीत आहेत. मराठीला राजा परांजपे जसे हवेत, तसे सत्यजित रेदेखील हवेत. लोकांची हलकीफुलकी करमणूक हवी, पण त्याचबरोबर त्यांच्या डोक्याला खाद्य हवं. आपला मराठी देश बुद्धिजीवींचा आहे. त्यांच्या मेंदूवर ताण पडेल असेही चित्रपट निघायला हवेत. पण सत्यजित रे हवे, असे म्हणून ते आकाराला येत नाहीत. एखादा रे अशा तळमळीतूनच आकाराला येतो. मग श्री. रे यांच्यासारख्या एखाद्या थोर कलावंतांचा आपण आदर्श ठेवला तर बिघडतं कुठं ? आता चाकोरीमधून चित्रनिर्मिती पुरे. आता येऊ द्या की आमच्या मराठी चित्रपटांना जरा उघड्या जगात !" लताताई मोकळेपणानं हसत म्हणाल्या. आमच्या चर्चेला तिथंच विराम मिळाला.

● ● ●

## आपल्या ठेवीवर आकर्षक व्याज

| बचत खातें | मुदत ठेवी | रिकरिंग डिपॉझिट (आवर्त ठेवी) |
| --- | --- | --- |
| ४% | जास्तीत जास्त ७ ५/८% मुदतीप्रमाणें | मुदत २४, ३०, ३६ महिने पर्यंत ६%+ एक आकर्षक बॉलपेन भेट |

M B

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

रजिस्टर्ड ऑफीस : ११७७ बुधवार पेठ पुणें २

5521

# भिंतीच्या तुंबड्या

## • नोकरी करणारी मांजरे

इंग्लंडातल्या एका डोकेबाज नगरपालिकेने गावातल्या उकीरड्यावरच्या उंदरांचा नायनाट करण्यासाठी अगदी अधिकृतरीत्या नऊ मांजरांना नोकरीवर ठेवले आहे व प्रत्येक मांजराला आठवड्याला १० शिलिंगांचा ' अन्नभत्ता ' चालू केला आहे. आयडियाची कल्पना एकदम झकास, पण तिच्यात काही ग्यानबाच्या मेखाही आहेत. कुठल्याही माणसालाच काय पण मूषकालाही पहिला प्रश्न पडेल तो हा, की उंदीर मारायचीच नोकरी, तर ' ऑफिस लंच ' मध्ये काय देणार ? शिवाय मारलेला उंदीर मांजराने खाल्ला तर नगरपालिकेची मालमत्ता ' हडप ' केल्याचा चार्जशीट त्या मांजरावर भरण्यात येईल काय ?

बरे, नगरपालिका म्हटली की वशिला आलाच. तेव्हा ही नऊ मांजरे नोकरीवर घेतली तेव्हा आणखी मांजरांचा इंटर्व्ह्यू घेण्यात आला, की फक्त ' समर्थाघरची मार्जारे ' च चिकटवण्यात आली ? आणि ही मांजरे इमाने इतबारे नोकरी करतात, की आपली कुठल्याही लोअर डिव्हिजन क्लार्कसारखी खुर्चीवर टोपी ठेवून कँटीन-मध्ये गप्पा छाटीत बसतात हे कसे कळायचे ? शिवाय पुढे मागे या मांजरांना प्रमोशन देण्याची वेळ येईल तेव्हा ते कशावर अवलंबून राहील ? उंदीर मार-ण्याच्या कौशल्यावर, की एखाद्या मांजराने वरिष्ठापुढे किती वेळा मुलायम आवा-जात म्याव् म्हटले व किती वेळा (अक्षरशः) लांगूलचालन केले यावर ?

माणसांच्या पुढे हे असले प्रश्न येणार, तर मूषकांच्या पुढे याहून गंभीर. एक तर त्यांना नॅशनल डिफेन्स फंड उभारून एकदम नऊ घंटांची ऑर्डर द्यावी लागणार. त्याहून कठीण म्हणजे एकेका मनीमावशीच्या गळ्यात एकेका घंटेचे लॉकेट या हिशेबाने " वेडात मराठे वीर दौडले सात " या धर्तीवर नऊ मूषक-वीरांचे ' सुइसाइड-स्क्वॉड ' तयार करावे लागणार. आणि हे नाहीच जमले तर या मांजर कारकुनांचे युनियन स्थापून त्यांना महागाई-भत्त्याच्या सबबीवर संपावर जायला उद्युक्त करू शकणारा मूषक लेबर लीडर लागणार. अशा या चिंताजनक परि-स्थितीत मला वाटते, उंदरांच्या दृष्टीने एकच आशेचा किरण आहे आणि तो म्हणजे कुठलेही स्वाभिमानी ( व क्वालिफाइड ) मांजर १० शिलिंगांच्या भिकार पगारावर फार दिवस टिकेल असे मला वाटत नाही. केवळ कामाचा अनुभव यावा म्हणून काही दिवस नगरपालिकीय उकीरडा फुंकला, की प्रत्येक मांजर दुसरीकडे अर्ज पाठवू लागेल असा माझा होरा आहे.

## ● ‘फॉर्मा’त आलेला जमाना


हल्लीचा जमानाच ‘फॉर्मा’त आलेला आहे यांत शंका नाही. सकाळी उठून पहावे तर कोणीही दारावरची घंटी वाजवतो अन् एखादा फॉर्म पुढे करून म्हणतो, रिकाम्या जागा भरा. कुठल्याशा एका ‘मराठी पण मधुर’ चित्रपटात तर एका धूर्त संपादकाने ‘माफी फॉर्म नं. ४’ छापूनच ठेवलेला दाखवतात आणि गंमत म्हणजे ही फॉर्मची लागण सगळ्या जगभर पसरलेली दिसते. परवा ऑस्ट्रेलियाच्या सरकारने व्हिएटनामच्या जंगलांत आणि दलदलीत लढणाऱ्या एक हजार ऑस्ट्रेलियन सैनिकांना एक फॉर्म भरायला पाठवला. त्यांतले काही मासलेवाईक प्रश्न असे होते– तिकडच्या नाइट-क्लबमध्ये प्रवेश-फी काय आहे? कॉकटेल-पार्टी द्यायची असेल तर काय खर्च येतो? रेस्टॉरंटमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या दारूच्या किंमती काय आहेत? नमुन्यादाखल काही मेनू-कार्डे पाठवावी. पुढे उलगडा झाला. की एम्बसी–स्टाफवाल्यांचा परदेश-भत्ता ठरविण्यासाठी जो फॉर्म वापरण्यात येतो, तोच परदेशी लढणाऱ्या सैनिकांना पाठविण्यात आला होता!

माणूस आणि कारकून यांतला मूलभूत फरक तो हा. व्हिएटनामच्या जंगलांत पॅरिसच्या हमरस्त्याइतके नाइट्-क्लब्स असण्याची शक्यता जरा कमीच, अशी ओझरती शंका तरी माणसाला आली असती, पण फॉर्मचा बंदा गुलाम असलेल्या कारकुनाला ती कशी येणार? व्हिएटनामच्या दलदलीत चिखलाच्या पाण्याइतकी शॅंपेन स्वस्त मिळणार नाही, असा माणसाने अंदाज केला असता. पण स्वत: अंदाज करील तो कारकून कसला? या फॉर्मपुत्राला आपले डोके चालविणे भागच पडल्यास तो फार तर फॉर्म परिपूर्ण करण्याच्या सदिच्छेने एखादा महत्त्वाचा पण चुकून राहून गेलेला प्रश्न त्यात टाकील. उदाहरणार्थ, डबक्यात बसून लढणाऱ्या त्या सैनिकांना तो विचारील– तुमचा फ्लॅट फर्निशड आणि सेल्फ-कन्टेन्ड आहे का?

## ● गुबगुबीत न्याय

कायदा आंधळा असतो—पण म्हणून काय झाले? कायद्याला म्हणजेच न्यायमूर्तींना न्यायदान करताना ज्या खुर्चीवर बसावे लागते ती टणक आहे का गुबगुबीत आहे, हे कळायला काही डोळ्यांची आवश्यकता नाही. लंडनच्या एका उपनगरात कोर्टातल्या खुर्च्या म्हणे इतक्या टणक आहेत, की अखेर न्यायाधीशांनी संप पुकारला–म्हणजे नगरपालिकेकडून मऊ खुर्च्या मिळेपर्यंत ते निषेधार्थ दिवसांतून दोन वेळा उभे राहणार आहेत. आहे का नाही जंमत? न्यायाधीशांनादेखील न्याय मिळत नाही या जगात. इंग्लिश न्यायदानाचा नि:पक्षपातीपणा सगळ्या जगात मशहूर आहे, पण आता त्याची ही कीर्ती डन्लॉपच्या रबरावर अवलंबून आहे, असे दिसते.


सुधाकर राजे





पंजाब नॅशनल
बँकेंत
तुमचा पैसा
सांभाळणारे हात
वाकबगार, तज्ज्ञ
सुकुशल असतात.

PR6530/Mar/Ad/1

## दुष्काळ निवारण यंत्रणा – ' महसूल खाते '



MANOOS (Fortnightly) : 1 Dec. 1965 : 30 Paise : Regd. No. B 9304




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर